बृहन्महाराष्ट्र मंडळ 2.0

BMM मराठी शाळा

# पुस्तक पाचवे




# विश्वभारती

## मराठी बोला वाचा लिहा

**बृहन्महाराष्ट्र मंडळातील मराठी मातृभाषा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी सचित्र कार्यपुस्तिका**

**विश्वभारती पुस्तक पाचवे**

मराठी भाषा कार्यपुस्तिका दुसरी आवृत्ती - २०२३
पहिली आवृत्ती - २०१४

**बृहन्महाराष्ट्र मंडळ २.० पुस्तक समिती**
**उत्तर अमेरिका**
**संपर्क:** shala@bmmonline.org

# <u>पुस्तकमालेविषयी मनोगत</u>

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या वतीने महाराष्ट्राच्या बाहेर राहणाऱ्या विद्यार्थ्यांना मराठी शिकवण्यासाठी उपयोगी अशी विश्वभारती पुस्तकमाला प्रकाशित करताना आम्हाला फार आनंद होत आहे.

या पुस्तकांचा सर्वाधिक उपयोग मराठी मातृभाषा असलेल्या परंतु अमराठी प्रदेशात राहणाऱ्या मुलांसाठी होईल अशी आमची धारणा आहे. भाषा ही एखाद्या संस्कृतीशी निगडित असते. मराठीसारख्या प्रादेशिक भाषेसाठी तर हे नाते अतिशय महत्वाचे आहे. त्यामुळे मराठी संस्कृतीशी रोजचा संपर्क नसलेल्या विद्यार्थ्यांना मराठी कसे शिकवायचे याचा विशेष विचार करावा लागतो. यासाठीच हा स्वतंत्र पाठ्यपुस्तकांचा खटाटोप.

कोणतीही भाषा शिकण्यासाठी आवश्यक कौशल्ये असतात - आकलन, बोलणे, वाचणे आणि लिहिणे. भाषाकौशल्यांची ही उतरंड या क्रमानेच असावी असे आम्हाला वाटते. त्यानुसार भाषेचे आकलन सर्वात महत्वाचे आहे. मराठी मातृभाषा असलेल्या मुलांना घरात मराठी ऐकायला मिळणे अतिशय महत्वाचे आहे. त्यानंतर त्यांना मराठीत बोलायला प्रोत्साहन दिले पाहिजे. त्यानंतर येते वाचन आणि लेखन.

असे असताना आम्ही वाचन आणि लेखनासाठी उपयुक्त पुस्तके तयार करण्यावर भर का दिला? तर संवादांमध्ये विविधता आणण्यासाठी, नवीन शब्दसंपदा आणि निरनिराळे वाक्येप्रयोग मुलांना शिकवण्यासाठी वाचनाशिवाय गत्यंतर नाही. वाचनातून आपण निरनिराळ्या प्रसंगांना सामोरे जातो. नवीन शब्द आणि वाक्येरचना शिकतो. म्हणून वाचनावर भर असलेला हा अभ्यासक्रम आम्ही विकसित केला आहे. परंतु या अभ्यासक्रमाचा वापर करताना शिक्षकांनी हे भान ठेवणे आवश्यक आहे की याचा वापर करून मुलांना जास्तीत जास्त बोलायला उद्युक्त केले पाहिजे.

प्रस्तुत पाठ्यपुस्तकांमध्ये अनेक प्रकारचे धडे समाविष्ट करण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. त्यात काल्पनिक कथा (fiction) आहेत, माहितीपर उतारे (non-fiction) आहेत. नाटुकल्या आहेत. बडबड गीते आहेत, तसेच कविता आहेत. या सर्वांचा उद्देश विद्यार्थ्यांना अनेक विषयांशी निगडित शब्दसंपदा देता यावी असा आहे. निरनिराळ्या परिस्थितींचा वापर करून व्याकरणाचे प्रयोग शिकवणे हा आहे. वर्गात विद्यार्थ्यांशी गप्पा मारण्यासाठी विषय पुरवणे हा आहे. परंतु धड्यातली माहिती घोकून पाठ करून घेणे हा मात्र आमचा उद्देश मुळीच नाही. त्यामुळे शिक्षकांनी हे धडे तशा प्रकारे वापरू नयेत. विद्यार्थ्यांनी हे धडे पूर्णतः वाचावेत परंतु प्रश्नपत्रिकांमध्ये धड्यांतील माहिती किंवा पाठांतरावर भर दिला जाऊ नये अशी आमची अपेक्षा आहे. पुस्तकामालेतील प्रत्येक धडा शिकवायला साधारणत: ६० ते ९० मिनिटे लागतील अशी आमची अपेक्षा आहे.

आम्ही पहिली ते पाचवीच्या पुस्तकांची पहिली आवृत्ती प्रकाशित करीत आहोत. या वर्गांमध्ये <u>**प्रवेश**</u> घेण्यासाठी आमच्या साधारण अशा अपेक्षा आहेत. (This is a prerequisite).

पहिली: सोपे मराठी संभाषण समजते. मराठी अक्षर ओळख अपेक्षित नाही. पुस्तकातील अभ्यासक्रम ५ ते ७ वर्षांच्या विद्यार्थ्यांसाठी अनुरूप आहे.

दुसरी: मुळाक्षरे आणि बाराखडी वाचता येणे अपेक्षित आहे. पुस्तकातील अभ्यासक्रम ७ ते ९ वर्षांच्या विद्यार्थ्यांसाठी अनुरूप आहे.

तिसरी: जोडाक्षर वाचन अपेक्षित आहे. पुस्तकातील अभ्यासक्रम ९ ते ११ वर्षांच्या विद्यार्थ्यांसाठी अनुरूप आहे.

चौथी: मराठी वाचनात सहजता अपेक्षित आहे. पुस्तकातील अभ्यासक्रम ११ ते १३ वर्षांच्या विद्यार्थ्यांसाठी अनुरूप आहे.

पाचवी: मराठी वाचन, लेखन आणि संभाषणात सहजता अपेक्षित आहे. शब्दांचे अर्थ आणि त्यांचा योग्य उपयोग करणे अपेक्षित आहे. पुस्तकातील अभ्यासक्रम १३ वर्षांवरील विद्यार्थ्यांसाठी अनुरूप आहे.

उत्तर अमेरिकेतील अनेक गावांमध्ये गेली कित्येक वर्षे मराठी शाळा चालू आहेतच. परंतु २००७ मध्ये फिलाडेल्फिया येथे भरलेल्या बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या परिषदेत या सर्व शाळांना एका छत्राखाली आणण्याच्या विचाराला चालना मिळाली. सर्व शाळांसाठी एकसंध अभ्यासक्रम तयार करण्याच्या कामाची मुहूर्तमेढ रोवली गेली. श्रीमती सुनंदा टुमणे यांनी या अभ्यासक्रमाचा आराखडा तयार केला. प्रस्तुत पुस्तकमाला त्याच अभ्यासक्रमावर आधारित आहे. पाचवीच्या या पुस्तकात प्रत्यक्ष साहित्य लिहिण्याचे काम वसुंधरा पर्वते, वृंदा पित्रे, कोमल चौककर, दीप्ति पंडित, आणि सुनंदा टुमणे यांनी केले आहे. पुस्तकांचे मुखपृष्ठ केले आहे मंगेश पारकर यांनी. याव्यतिरिक्त या पुस्तकमालेसाठी विद्यार्थ्यांपासून ते पालकांपर्यंत अनेक मराठी प्रेमींचा हातभार लागला आहे. त्या सर्वांचे आम्ही मनःपूर्वक आभारी आहोत. तसेच अनेक नामवन्तांच्या काही कविताही आम्ही या मालेच्या निमित्ताने मुलांसमोर ठेवल्या आहेत. त्यांचे आणि त्यांच्या प्रकाशन संस्थांचे (रोहन प्रकाशन, नवनीत प्रकाशन, पॉप्युलर प्रकाशन) आम्ही जाहीर आभार मानतो.

विद्यार्थ्यांना वाचायला रोचक वाटतील, त्यांच्या कल्पनेला चालना देतील आणि उत्सुकता वाढवतील असे धडे लिहायचा आम्ही प्रयत्न केला आहे. मराठीचा अभ्यास हा कंटाळवाणा न वाटता मजेदार कसा होईल याचा विचार केला आहे. हे करताना भाषेशी तडजोड न करता जास्तीत जास्त सकस मराठी द्यायची भूमिका आहे. अर्थात ही अतिशय अवघड उद्दिष्टे आहेत आणि ती सर्वार्थाने साध्य झालेली नाहीत याची आम्हाला पुरेपूर जाणीव आहे. त्यामुळे हे काम पूर्ण झाले नसून ही फक्त सुरुवात आहे असे आमचे मत आहे. या कामात सुधारणा करण्यासाठी सर्व शिक्षक, पालक आणि मराठी प्रेमींची आम्हाला मदत हवी आहे. आपल्या सूचना आम्हाला अवश्य कळवा. आम्ही त्यांचा पुढील आवृत्यांमध्ये निश्चित उपयोग करू.

विश्वभारती पुस्तक समिती


बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका

# अनुक्रमणिका

अनुक्रमणिका ........ 5
१- आकडेमोड ........ 7
२ –मोठ्या संख्या ........ 11
३-वाक्प्रचार ........ 15
४- पाऊस ........ 22
५- प्रदूषणाचे प्रकार ........ 25
६-प्रदूषण निवारण ........ 28
७-श्रावण मासी हर्ष मानसी ........ 31
८-सुपरमॅन राहुल !!! ........ 33
९-मराठी महिने व तिथी ........ 36
१०-मंगल देशा ........ 37
११-जैसलमेर -सोनेरी वाळवंटाचे गाव ........ 39
१२-आजारपणातील मौज - (लघु निबंध) ........ 43
१३-सायंकाळची शोभा ........ 45
१४-खजिना ........ 47
१५-सारांश लेखन ........ 51
१६-वृत्तपत्र बातमी ........ 54
१७-मेपलचे झाड ........ 56
१८-झुळूक मी व्हावे ........ 60
१९-एक श्लोकी रामायण ........ 63
२०–पसायदान ........ 64
२१–संत ज्ञानेश्वर ........ 66
२२–संत तुकाराम ........ 70
२३–रवींद्रनाथ टागोर ........ 73
अवांतर वाचन ........ 76
२४-मतदान ........ 76
२५-भारत - प्रांत आणि भाषा ........ 79


२६-भारतीय खेळ - भारतीय कला ........ 83
२७-महाराष्ट्र इतिहास-भूगोल ........ 87
२८-वाचन आणि श्रवण ........ 90
परिशिष्ट – मुळाक्षरे ........ 101
परिशिष्ट - बाराखडी ........ 103
परिशिष्ट - जोडाक्षरे ........ 106
परिशिष्ट - विभक्ती प्रत्यय ........ 107
परिशिष्ट – जोडशब्द ........ 111
परिशिष्ट-समानार्थी आणि विरुद्धार्थी शब्द ........ 112
परिशिष्ट – विरामचिन्हे ........ 113
परिशिष्ट – उच्चार ........ 115
परिशिष्ट – आकडे ........ 117

# १- आकडेमोड



भारताच्या सुपर कॉम्पुटर, शकुंतलादेवी यांच्या अलौकिक गणित कौशल्याची कीर्ती जगप्रसिद्ध आहे. त्या क्षणार्धात प्रचंड मोठी आकडेमोड करून दाखवत असत!

आकडेमोड म्हणजेच अंकांचा वापर. आपण सगळे दररोज अंक वापरत असतो. जगाच्या पाठीवर अनेक भाषा बोलल्या जातात पण सर्वांना समजणारी व जोडणारी अशी ही एकमेव अंकांची भाषा.






शिलालेख -पूर्वकालीन गणती दाखवणारे खडकांचे अवशेष

हजारो वर्षांपूर्वी गुहेत राहणारा मानवदेखील गणित करत होता! जवळपास पस्तीस हजार वर्षांपूर्वीपासून मानव हिशोब ठेवत असल्याचे पुरावे आढळतात. प्राण्यांच्या हाडांवर व दगडात रेघा कोरून मोजणी केली जात असे. पाळलेले प्राणी, केलेल्या शिकारी, याची नोंद; त्याशिवाय दिवस-रात्रीचे चक्र, ऋतू, चंद्राच्या कला, भरती, ओहोटी यावरून माणूस कालगणनेचा हिशोब ठेवू लागला. नंतर पेरणी, शेती, धंदा, व्यवसाय, सैन्य, लोकसंख्या या सर्वांच्या मोजणीसाठी अंकांच्या पद्धती निर्माण झाल्या.

विभिन्न देशात विविध अंक पद्धती आढळून आल्या आहेत. उदाहरणार्थ : रोमन, इजिप्शियन, नेटिव्ह अमेरिकन, आफ्रिकन, चिनी आणि अर्थात भारतीय!








आर्यभट- भारतीय खगोलशास्त्र संशोधन केंद्र (IUCAA), पुणे

प्राचीन भारत गणित शास्त्रात अग्रेसर होता. गणितात शून्याची कल्पना व डेसिमल पद्धतीचे श्रेय, इसवी सन ५०० मध्ये होऊन गेलेल्या गणितज्ञ व खगोलशास्त्रज्ञ आर्यभटाला जाते. अंकगणित, बीजगणित व भूमिती या गणिताच्या शाखांचा त्याचा सखोल अभ्यास होता. तर आज जगभर सर्वत्र वापरले जाणारे हिंदू-अरेबिक अंक भारत देशातूनच उगम पावले.

इसवी सन १२०० मधे, लिओनार्डो फिबोनाची याने हे अंक युरोपात आणले तेव्हा अनेकांनी त्याला विरोध केला. पूर्वापार चालू असलेली रोमन पद्धती सोडायला लोक तयार नव्हते. पण हळूहळू ही आधुनिक अंक पद्धती रूढ झाली. इसवी सन १६०० पासून हिंदू-अरेबिक अंक सर्वत्र वापरले जाऊ लागले.

आपल्या दैनंदिन आयुष्यात अंकांनी अतूट जाळे विणले आहे. लहान असो वा मोठे, आपल्या दुनियेत अंकांचे स्थान अग्रगण्य आहे. मोठ्यांचा कोणताही व्यव्यसाय- अर्थतज्ञ, शास्त्रज्ञ, संगणक तज्ञ, अभियंता, शिक्षक, वैमानिक, डॉक्टर, गायक, उद्योजक इत्यादी अंकांशिवाय करता येणे अशक्य आहे.



तुम्ही दिवसभरात आकडे कसे वापरता?

शाळेत जाताना बसचा नंबर, लंच घेताना पिन नंबर, पुस्तक वाचताना अनुक्रमणिका तर खेळाच्या मैदानावर वेळ आणि अंतराचा अंदाज घेताना, व्हिडीओ गेममध्ये स्कोर ठेवताना, लिंबू सरबत किंवा केकसाठी साहित्य मापून घेताना असे लहानांच्या विश्वातही अंक जिथेतिथे उपयोगी पडतात.






अंक जणू गणिती भाषेची मुळाक्षरे आहेत. ही भाषा कोणत्याही भाषेपेक्षा प्राचीन आणि खऱ्या अर्थाने जागतिक भाषा आहे.

**नवीन शब्द: (वाक्यात उपयोग करा.)**

अग्रेसर- आघाडी,श्रेष्ठ
अग्रगण्य- मुख्य, प्रमुख
अलौकिक- असामान्य
इसवी सन- A.D.
प्राचीन- पूर्वीचे, जुनेपुराणे
रूढ- सर्वमान्य
विभिन्न- वेगवेगळे, निरनिराळे
विविध- अनेक तऱ्हा, अनेक प्रकार
सर्वत्र- सगळीकडे
क्षणार्धात- क्षणाच्या आत

| **समानार्थी शब्द** | **विरुद्धार्थी शब्द** | **जोड शब्द** |
|---|---|---|
| दुनिया- विश्व- जग | दिवस- रात्र | जवळपास |
| प्रचंड - मोठी | प्राचीन- आधुनिक | हळूहळू |
| मोजणे- मापणे | अशक्य- शक्य | जिथेतिथे |

© BMM Marathi Shala eBook Team 

**स्वाध्याय:**

**१. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

अ) मानवाने हिशोब ठेवल्याचे पुरावे किती जुने आहेत?

आ) प्राचीन भारतीय गणितज्ञ कोण आणि ते कशासाठी प्रसिद्ध आहेत?

इ) हिंदू-अरेबिक अंक युरोपमध्ये कोणी व केव्हा आणले?

ई) गणिताला जागतिक भाषा असे का म्हटले आहे?

उ) तुम्ही रोजच्या आयुष्यात अंकांचा उपयोग कसा करता? तीन उदाहरणे द्या.

**२. वरील धडा वाचून सारांश लिहा.**

**शिक्षकांसाठी..**

• **समाविष्ट अभ्यासक्रम:** Non-fiction genre, Reading and Group discussion

आकडे कुठून आले? आकड्यांचे महत्त्व काय?

वाचन/आकलन, प्रश्नोत्तरे, सारांश लेखन, समानार्थी, विरुद्धार्थी शब्द

• **सूचना:**

१. या धड्याच्या आधारे उपसर्ग व प्रत्यय असलेले शब्द शिकवा.
उपसर्ग:
अग्र- अग्रलेख
सर्व- सर्वत्र, सर्वश्रुत, सर्वजण
प्रत्यय:
भर- जगभर, दिवसभर, रात्रभर

२. धड्यावर आधारित विषयावर गट चर्चा घ्या. निबंध लेखन घ्या.
अंकांचे महत्त्व व उपयोग
तुम्ही मोठे झाल्यावर कोण होणार? का? (धड्याच्या आधारे व्यवसायाची नावे शिकवा.)
तुम्हाला गणित विषय आवडतो का?( का आवडतो/ का नाही आवडत)

# २ –मोठ्या संख्या

आपल्याला कधीकधी टी.व्ही., वर्तमानपत्रात किंवा इतर वाचनात मोठ्या संख्या आढळतात.

**वादळामुळे २ लाख अंधारात**
**५० लाखांची लॉटरी!**
**मुंबई शहराची वाढती लोकसंख्या आता -दीड कोटीच्या घरात!**
**स्टॉक एक्स्चेंज घसरल्यामुळे १ कोटी रुपयांचे नुकसान**

ह्या वाक्यांचा अर्थ कळण्याकरता, मोठ्या संख्या समजणे व मोजता येणे आवश्यक असते. त्यासाठी खाली दिलेला तक्ता समजून घ्या.

| | | |
|---|---|---|
| १००० | एक हजार | One Thousand |
| १००००, | दहा हजार | Ten Thousand |
| १०००,००, | एक लाख | Hundred Thousand |
| १००००,००, | दहा लाख | llionOne Mi |
| १०००,००,००, | शंभर लाख (एक कोटी) | Ten Million |

आता लोकमत या वर्तमानपत्रातील बातम्या वाचून बघा.

लोकमत



## सोन्याच्या भावात आणखी घसरण

संजय सिंघ, नवी दिल्ली

नववर्षात सलग दुसऱ्या दिवशीही सोन्याच्या भावात घसरण झाली. शुक्रवारी सोन्याचा भाव ७५ रुपयांनी घसरून २७,०२५ रुपये प्रति १० ग्रॅम झाला.



## १९ लाख शेतकऱ्यांचे नुकसान?

गजानन मोहोड, अमरावती

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना शासनाकडून मदतीची गरज आहे. अमरावती भागातील १९ लाख ९४ हजार ६७२ शेतकऱ्यांचे पीक पाऊस कमी पडल्याने नष्ट झाले आहे.

तुम्हाला अशा मोठ्या संख्या वापरून बातमी लिहिता येईल का?

**नवीन शब्द: (वाक्यात उपयोग करा.)**

संख्या, लाख, कोटी, बातमी, वर्तमानपत्र

**स्वाध्याय:**

१. संख्या शब्दात लिहा.

१५,६७८

५०,३५,९८०

२. संख्या अंकात लिहा.

नव्वद हजार तीनशे चौऱ्याहत्तर

एक लाख सत्तावन्न हजार नऊशे अडुसष्ट

३. मोठ्या संख्या वापरून बातमी लेखन करा. बातमीच्या जोडीला चित्र काढा.

खालील शब्द गणिते सोडवा.

१. बाजारात टाटा नॅनो मोटारीची किंमत रु.२५,५९९ आहे. यावर, जर ६ % कर लागला तर, एकूण मोटारीची किंमत किती?

२. खंडाळा गावाची लोकसंख्या ७५,४३१ आहे.२०२० साली ही संख्या दसपट होणार आहे. २०२० साली खंडाळा गावाची लोकसंख्या किती असेल?

३. रामुशेटच्या दुकानात, दिवाळीला फटाके-रु. ३६,७८६ आणि फराळ-रु. ६३,७०० अशी विक्री झाली. कोणत्या वस्तूची जास्त विक्री झाली? फटाके आणि फराळ मिळून किती रुपयांची विक्री झाली?


४. खालील प्रश्नांसाठी सोबत दिलेला तक्ता पहा.

अ) २०१३ साली, अजिंठा लेणी पाहायला किती प्रवासी गेले?

आ) पुढच्या वर्षी अजिंठा लेणी पाहावयास आलेल्या प्रवाशांची संख्या २०१३ सालपेक्षा दुप्पट झाली तर पुढच्या वर्षी अजिंठा लेणी पहावयास किती प्रवासी येतील?

इ) प्रतापगडाला किती प्रवाशांनी भेट दिली?

ई) कोणत्या प्रेक्षणीय स्थळी सर्वांत कमी प्रवासी होते?




**शिक्षकांसाठी..**

**• समाविष्ट अभ्यासक्रम:**

मोठ्या संख्यांची ओळख, शब्द गणिते, बातमी वाचन.

**• सूचना:**

या धड्याच्या आधारे हजार ते लाखापर्यंतचे अंक शिकवा. बातमीलेखनाच्या आधारे मोठ्या संख्यांचा वापर आणि वाचन शिकवा.

# **३-वाक्प्रचार**

वाक्प्रचार म्हणजे idioms. वाक्प्रचाराचा शब्दशः अर्थ न घेता, त्यात दडलेला अर्थ समजून घ्या. वाक्ये कशी परिणामकारक बनतात ते बघा. वाक्प्रचार वापरले की वाक्याला उठाव येतो.

**खाली दिलेले संवाद, उतारे वाचा आणि वाक्प्रचार कसा वापरला आहे ते बघा.**

१) सोना: आई, मला जेवायला दे ना लवकर.

आई: अग हो ! देते. हे बघ मी करतच आहे ना स्वयंपाक ?

सोना: दे ना लवकर. **माझ्या पोटात कावळे ओरडत आहेत**.

आई: घे ! झाल्या गरम गरम पोळ्या. बस जेवायला.

२) बाबा: हे बघ ! मी तुझ्यासाठी काय आणलंय ते.

साहिल: बघू काय आहे?

बाबा: तुला एक छान शर्ट आणलाय बघ.

साहिल: हं. मला नाही आवडला रंग.

बाबा: अरे ! **नाक कशाला मुरडतोस?** मला नव्हते माहित, तुला हा रंग आवडत नाही ते.

३) आई: अरे प्रणव, झाला का तुझा अभ्यास? एक आठवडा सुट्टी होती ना? मग इतक्या उशिरा का बसलास अभ्यासाला? रविवार रात्रीचे साडे दहा वाजले.

प्रणव: मला सुट्टी एन्जॉय करायची होती. मी रोज थोडा थोडा केला. आता उरलेला करतो.

आई: तरी मी तुला **दाताच्या कण्या करून सांगत होते**, शनिवार पर्यंत संपव. ऐकले नाहीस माझे. उद्या उठायला उशीर करू नकोस म्हणजे झाले.

४) मंथरा: राणी कैकयी, तुम्ही जर मध्ये नाही पडलात तर राजा दशरथ रामालाच राजा बनवेल. मग भरत राजा होणार नाही. आणि राम त्याला अयोध्येबाहेर पाठवेल.

कैकयी: नाही मंथरा, राम असे कधीच करणार नाही.

मंथरा: पण असे झाले तर तुम्ही काय कराल? मी सांगते, तुम्ही ते वर मागून, भरतालाच राजा बनवायला सांगा. असे करून मंथरेने राणीचे **कान फुंकले** आणि दशरथ राजाने रामाला वनवासाला पाठवले.

५) सप्टेंबर ११, २००१ : आजच्या ठळक बातम्या. World Trade Center वर विमान आपटून, ट्रेड सेंटर पडल्याची **<u>बातमी वाऱ्यासारखी पसरली</u>**. त्यामुळे, लोक सुन्न झाले, आणि पटापट न्यू यॉर्क मधील आपल्या नातेवाईकांना व मित्रांना फोन करू लागले.

## वाक्प्रचार आणि अर्थ

| | |
|---|---|
| १) पोटात कावळे ओरडणे – खूप भूक लागणे<br>२) नाक मुरडणे – नापसंती दाखवणे<br>३) दाताच्या कण्या करणे – पुन्हा पुन्हा सांगणे<br>४) कान फुंकणे – मनात भरवून देणे<br>५) वाऱ्यासारखी पसरणे – लगेच सर्वत्र होणे<br>६) मनात मांडे खाणे – स्वप्न रंगवणे<br>७) कामातून जाणे – पूर्ण बिघडणे<br>८) हातावर तुरी देणे – फसवून पळून जाणे<br>९) हरभऱ्याच्या झाडावर चढवणे – खोटी स्तुती करणे<br>१०) अंगाची लाही होणे--अतिशय राग येणे<br>११) धडा शिकवणे – अद्दल घडवणे, शिक्षा करणे. खोड मोडणे<br>१२) कुरकुर करणे – तक्रार करणे<br>१३) धूम ठोकणे – पळून जाणे, पसार होणे<br>१४) हायसे वाटणे – बरे वाटणे<br>१५) कंबर कसणे – सज्ज होणे, तयार होणे, सिद्ध होणे<br>१६) बेत पक्का करणे – नक्की करणे<br>१७) हातचा मळ- सहज घडणारी गोष्ट<br>१८) दाद देणे --स्तुती करणे | १९) पांघरूण घालणे – दोष लपवणे<br>२०) आरोळ्या ठोकणे – मोठमोठ्याने ओरडणे<br>२१) गाशा गुंडाळणे--निघून जाणे<br>२२) कामाचे चीज होणे – काम सफल होणे, सार्थक होणे<br>२३) खजील होणे / मान खाली घालणे – शरम वाटणे, लाज वाटणे<br>२४) माशा मारणे – काहीही उद्योग न करणे<br>२५) चेहरा उतरणे – दु:खी, निराश होणे, हिरमुसणे<br>२६) नाकावर राग असणे--खूप लवकर राग येणे<br>२७) रंगून जाणे – गुंग होणे, भान हरपणे, तहान भूक विसरणे, मग्न होणे |

## वाक्प्रचार आणि अर्थ .....

| | |
|---|---|
| २८) तोंडात बोट घालणे-- अतिशय आश्चर्य वाटणे<br>२९) डोके खाजवणे – आठवण्याचा प्रयत्न करणे<br>३०) डोळे उघडणे-- पश्चाताप होणे<br>३१) ढुंकून न पाहणे / कानाडोळा करणे – दुर्लक्ष करणे<br>३२) डोळ्याचे पारणे फिटणे – एखादे दृश्य बघून अत्यानंद होणे<br>३३) डोळे मोठे करणे – रागावणे, डोळे वटारणे | ३४) नजर खिळणे – एका जागी दृष्टी स्थिर होणे, एकटक बघणे<br>३५) पोटाला चिमटा घेणे- अर्धपोटी राहणे<br>३६) डोके खाणे – त्रास देणे<br>३७) जीवाचे रान करणे – खूप कष्ट घेणे<br>३८) बोटावर नाचवणे-- आपण म्हणू तसे करायला लावणे<br>३९) अंग काढून घेणे--जबाबदारी टाळणे |

**वरील वाक्प्रचारांचा अर्थ समजून घ्या आणि सोप्या वाक्यात उपयोग करा.**

**स्वाध्याय:**

**१ .जोड्या जुळवा:**

| वाक्प्रचार | योग्य अर्थ अक्षर | अक्षर | अर्थ |
|---|---|---|---|
| १. हातावर तुरी देणे | ई | अ. | तक्रार करणे |
| २. अंगाची लाही होणे | | आ. | आपण म्हणू तसे करायला लावणे |
| ३. कुरकुर करणे | | इ. | खूप कष्ट घेणे |
| ४. बोटावर नाचवणे | | ई. | फसवून पळून जाणे |
| ५. हायसे वाटणे | | उ. | अतिशय राग येणे |
| ६. कंबर कसणे | | ऊ. | पसार होणे |
| ७. धूम ठोकणे | | ए. | बरे वाटणे |
| ८. जीवाचे रान करणे | | ऐ. | सज्ज होणे |

**२. खाली दिलेल्या उताऱ्यात कोणता वाक्प्रचार वापरू शकतो ते ओळखा व नवीन वाक्ये तयार करा.**

उदा: (तोंडात बोट घालणे)
१. जादुगाराची अदृश्य करण्याची जादू बघून लोकांना अतिशय आश्चर्य वाटले.

वाक्प्रचार : तोंडात बोट घालणे.

नवीन वाक्ये: जादुगाराची अदृश्य करण्याची जादू बघून लोकांनी तोंडात बोट घातले.

(हायसे वाटणे , बेत पक्का करणे, हातचा मळ, आरोळ्या ठोकणे, हातावर तुरी देणे)

१) उन्हाळयाच्या सुट्टीत कुठे जायचे, ह्यावर बराच विचार केला. शेवटी आम्ही अमेरिकेच्या पश्चिमेला जायचे नक्की केले.

वाक्प्रचार

२) मी गाडीतून चाललो होतो आणि माझ्या मागे एक पोलीस आला असे मला वाटले. मी घाबरलो आणि गाडी बाजूला घेतली. पण बघतो, तर काय ! तो पुढे गेला. मला कळले की तो माझ्या मागे येत नव्हता. मग मला बरे वाटले.

वाक्प्रचार

३) काल मला एक माणूस भेटला. तो म्हणाला की त्याची आई आजारी आहे, आणि त्याला पैशाची गरज आहे. मी त्याला पैसे दिले पण मला नंतर कळले की त्याने अशा रीतीने बऱ्याच लोकांना फसवले होते.

वाक्प्रचार

४) होळीच्या दिवशी मुले, 'होळी रे होळी, पुरणाची पोळी, राक्षसाच्या पोटात बंदुकीची गोळी' असे मोठमोठ्याने ओरडत फिरत होती.

वाक्प्रचार

५) मायकल फेल्प्स हा पोहण्यात इतका पटाईत आहे, की पन्नास मीटर  तर तो सहज पोहू शकतो.

वाक्प्रचार

**३. खाली वाक्प्रचारांच्या अर्थासाठी ३ पर्याय दिले आहेत. त्यातील योग्य अर्थाचा पर्याय निवडा.**

| | |
|---|---|
| १. रंगून जाणे<br>अ. चित्र रंगवणे<br>ब. गुंग होणे, भान हरपणे, मग्न होणे<br>क. चित्र काढणे | २. माशा मारणे<br>अ. खूप काम करणे<br>ब. हाताने डास मारणे<br>क. काहीही उद्योग न करणे |
| ३. पांघरूण घालणे<br>अ. दोष लपवणे<br>ब. गादीवर चादर घालणे<br>क. चादर धुणे | ४. गाशा गुंडाळणे<br>अ. sleeping bag गुंडाळणे<br>ब. निघून जाणे<br>क. बुटाची नाडी बांधणे |
| ५. कामाचे चीज होणे<br>अ. दुधाचे चीज तयार होणे<br>ब. काम सफल होणे, सार्थक होणे<br>क. दुधाचे ताक होणे | ६. खजील होणे<br>अ. खाज येणे<br>ब. लाज वाटणे, शरम वाटणे<br>क. जखम होणे |

**शिक्षकांसाठी..**

- **समाविष्ट अभ्यासक्रम:**

वाक्प्रचार वापरून वाक्ये कशी बनवता येतात हे सांगा. हे वाक्प्रचार मोठ्या प्रमाणात वापरले जातात. काही इंग्रजी वाक्प्रचारांबद्दल चर्चा करा, जसे: Spread like wildfire, To teach a lesson, Under the weather, Spill the beans.

- **सूचना:**

या धड्याच्या आधारे नवीन शब्द आणि वाक्प्रचार शिकवा. विद्यार्थ्यांना वाक्प्रचार वापरून संभाषण किंवा दोन तीन ओळींची गोष्ट सादर करायला सांगा.

© BMM Marathi Shala eBook Team 

## ४- पाऊस

पावसाच्या धारा येती झरझरा
झांकळलें नभ, वाहे सोंसाट्याचा वारा



रस्त्याने ओहोळ जाती खळखळ
जागोजागी खाचांमध्ये तुडुंबले जळ



ढगावर वीज झळके सतेज
नर्तकीच आली गमे लेवुनिया साज

झोंबे अंगा वारे काया थरथरे
घरट्यांत घुसूनिया बसली पाखरें

हर्षलासे फार नाचे वनीं मोर
पानांतून हळूं पाहे डोकावून खार
पावसाच्या धारा डोईवरी मारा
झाडांचिया तळी गुरे शोधिती निवारा



नदीलाही पूर लोटला अपार
फोफावत धांवे जणू नागीणच थोर

झाडांची पालवी चित्ताला मोहवी
पानोपानी खुलतसें रंगदार छबी

थांवला पाऊस उजळे आकाश
सूर्य येई ढगांतून, उधळी प्रकाश

किरण कोंवळे भूमीवरी आले
सोनेरी त्या तेजामध्यें वस्तुजात खुले



सुस्नात जाहली धरणी हांसली,
वरुणाच्या कृपावर्षावाने सन्तोषली

कवियत्री :शांता शेळके

**नवीन शब्द: (वाक्यात उपयोग करा.)**

झांकळणे, तुडुंब, सतेज, झोंबणे, अपार, फोफावणे, चित्त, छबी, संतोषणे

**स्वाध्याय:**

**१. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

अ) पाऊस पडतो तेव्हा आकाश कसे दिसते?

आ) कवियत्रीने विजेचे आणि पूर आलेल्या नदीचे वर्णन कसे केले आहे?

इ) पाऊस पडत असताना प्राणी आणि पक्षी काय करतात?

ई) पाऊस पडल्यामुळे धरती कशी दिसते?

**२. खालील शब्दांना समानार्थी शब्द लिहा.**

| | | | |
|---|---|---|---|
| नभ | | जळ | |
| डोई | | चित्त | |
| धरणी | | वरुण | |
| काया | | हर्ष | |
| छबी | | भूमी | |

**३. खालील शब्दांना विरुद्ध अर्थी शब्द लिहा.**

| | | | |
|---|---|---|---|
| पाऊस | | प्रकाश | |
| हर्ष | | फार | |
| हळू | | कोवळे | |

**४. खालील शब्द वाचून असे इतर अर्थपूर्ण शब्द लिहा.**

झरझरा, थरथर, खळखळ

**५. तुम्हाला पावसात भिजायला आवडते का? पाऊस आल्यावर तुम्हाला काय करावेसे वाटते ते १० वाक्यात लिहा.**

**शिक्षकांसाठी..**

• समाविष्ट अभ्यासक्रम:

व्याकरण, शब्दसंपत्ती, वृतपत्र बातमी आणि निबंध लेखन, हवामान आणि नैसर्गिक आपत्ती, वाचन आणि प्रश्नोत्तरे.

• सूचना:

या धड्याच्या आधारे समानार्थी, विरुद्ध अर्थी शब्द शिकवा. नवीन शब्दांचा अर्थ समजावून सांगा आणि हे शब्द  वापरून वाक्ये बनवा. या विषयाचा वापर करून मुलांना लेखनासाठी प्रोत्साहन द्या. पाऊस पडणे किंवा न पडणे ह्यामुळे काय नैसर्गिक आपत्ती ओढवू शकते ह्याची चर्चा करा.

खालील YouTube Video पहा. असे हवामानाचा अंदाज सांगणारे उपकरण घरी बनवता येईल, हा Storm Glass मुलांना बनवायला सांगा. हा उपक्रम मुलांनी पालकांच्या किंवा शिक्षकांच्या सहाय्यानेच करावा, एकट्याने करू नये.

https://www.youtube.com/watch?v=3cWpo5BoahA

## ५- प्रदूषणाचे प्रकार

**शिक्षिका:** आज आपण प्रदूषण आणि त्याचे प्रकार याबद्दल बोलूया. वातावरणात सजीवांना हानिकारक पदार्थ मिसळणे या क्रियेला किंवा वातावरणातील हानिकारक बदलांना प्रदूषण म्हणतात. प्रदूषणामुळे जागतिक तापमानात वाढ होते. प्रदूषणाची महत्त्वाची उदाहरणे कोणी सांगू शकेल का?

**रीमा:** अशुद्ध पाणी म्हणजे जल प्रदूषण, अशुद्ध हवा म्हणजे वायू प्रदूषण, मोठा आवाज म्हणजे ध्वनी प्रदूषण आणि जमिनीची हानी म्हणजे जमीन प्रदूषण.

**शिक्षिका:** शाब्बास ! आता मला जल प्रदूषणाची उदाहरणे व माहिती कोण सांगेल?

**तन्मयी:** मोठमोठ्या कारखान्यातून वेगवेगळे पदार्थ त्यांच्यावर पुरेशी प्रक्रिया (treatment) न करता पाण्यात सोडल्याने पाणी प्रदूषित होते. म्हणजेच ते पिण्यायोग्य राहत नाही किंवा मासे आणि अन्य जलचरांसाठी सुरक्षित राहत नाही. तसेच नदीत किंवा तलावात पिशव्या, बाटल्या, अशा काही plastic च्या गोष्टी पाण्यात टाकल्याने माशांची वाढ होत नाही आणि मासे मरतात.



**शिक्षिका:** अगदी बरोबर. २०१० च्या Gulf Coast च्या BP oil spill बद्दल तुम्ही सर्वांनी ऐकले असेलच. पाण्यात तेल मिसळल्यामुळे जलचरांचे प्रचंड नुकसान झाले. आता मला वायू प्रदूषणाची उदाहरणे कोण सांगेल?



**अक्षय:** धूर व कारखान्यातून बाहेर पडणारे वायू हवेत मिसळल्याने वायू प्रदूषण होते. कार्बन मोनॉक्साईड हा विषारी वायू हवेत मिसळल्यास ते धोकादायक असते. तसेच आपण गाडीतून प्रवास करतो. त्या गाडीतून जो धूर बाहेर पडतो, तो धूर सुध्दा हानिकारक असतो. काही लोक सिगरेट

ओढतात. त्यामुळे त्यांना तर त्रास होतोच, पण वायू प्रदूषणामुळे इतर लोकांनाही त्रास होतो.

**शिक्षिका:** छान माहिती सांगितलीस, अक्षय. तुम्हाला माहित आहे का? जगातील सर्वात मोठे disaster १९८४ साली भारतातील भोपाळ येथे झाले. Union Carbide च्या कारखान्यात स्फोट होऊन वायुगळती झाली. त्यात २५००० जणांचा मृत्यु व ४००,००० लोकांना इजा (injury) झाली. आता मला ध्वनी प्रदूषणाची उदाहरणे व माहिती कोण सांगेल?

**किमया:** यंत्रे, मोटारगाड्या, विमाने, आगगाड्या, बांधकाम (construction), घरात मोठ्या आवाजात लावलेले संगीत यामुळे ध्वनी प्रदूषण होते. याचा परिणाम बहिरेपण किंवा ऐकायला कमी येणे, याच बरोबर उच्च रक्तदाब, हृदयविकार असा होऊ शकतो. प्राण्यांवर देखील वाईट परिणाम होतात.



**शिक्षिका:** काय म्हणालीस? मला ऐकू नाही आले. जरा मोठ्याने बोल. ..................
नाही, नाही. मी मजा केली. मला व्यवस्थित ऐकू आले. आता ही झाली जल, वायू आणि ध्वनी प्रदूषणाची माहिती व काही उदाहरणे. अजून एक प्रकारचे प्रदूषण राहिले. जमीन प्रदूषण. कोण माहिती देईल?

**सानिका:** कोळशासाठी जेंव्हा डोंगराची शिखरं उद्ध्वस्त केली जातात, अति प्रमाणात कीटकनाशके वापरली जातात, झाडे तोडली जातात किंवा रासायनिक खते वापरली जातात त्यामुळे जमीन प्रदूषित होते. तसेच लोक अनावश्यक कचरा निर्माण करतात, त्यामुळे कचरा पट्ट्या (landfills) ओथंबून वाहत असतात. या सर्व गोष्टींचा परिणाम असा होतो की जमिनीवरील हानिकारक रसायने जमिनीत जिरतात. त्यामुळे पिके वाढत नाहीत, कीटक आणि प्राणी यांची वाढ होत नाही आणि जमिनीतील हानिकारक रसायने पुढे पाण्यात मिसळतात.

**शिक्षिका:** अगदी बरोबर. कळले का सगळ्यांना ? आपण आज चार प्रकारच्या प्रदूषणाबद्दल माहिती समजून घेतली. अजूनही काही प्रदूषणाचे प्रकार आहेत, पण हे झाले चार मुख्य प्रकार.

**नवीन शब्द:** उच्च रक्तदाब – High Blood Pressure

**नवीन शब्द: (वाक्यात उपयोग करा)**

| | | | |
|---|---|---|---|
| हानिकारक | Harmful | धोकादायक | Dangerous |
| अशुद्ध | Impure | रसायन | A chemical |
| कारखाना | Factory | परिणाम | Consequence |
| जलचर | Aquatic animals | कीटकनाशक | Pesticide |
| उद्ध्वस्त करणे | To ruin | हृदयविकार | Heart Disease |

**स्वाध्याय:**

**१. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

अ) प्रदूषण म्हणजे काय?

आ) प्रदूषणाचे कोणकोणते प्रकार या धड्यात सांगितले आहेत?

इ) जगातल्या मोठ्या वायू प्रदूषणाबद्दल माहिती सांगा.

ई) ध्वनी प्रदूषण कशामुळे होते आणि त्याचा परिणाम काय होतो?

**२. समानार्थी शब्द लिहा:.**

| | | | |
|---|---|---|---|
| जल | | धोकादायक | |
| वायू | | नुकसान | |
| ध्वनी | | सजीव | |

**शिक्षकांसाठी..**

•समाविष्ट अभ्यासक्रम:

वाचन/श्रवण, नवीन शब्द, प्रश्न-उत्तरे.

•सूचना:

या धड्याच्या आधारे प्रदूषणाच्या प्रकारांची मराठीत नावे मुलांना शिकवा. प्रदूषणाचे बाकी काही प्रकार यावर चर्चा करा. जसे: ॲसिड रेन, अति प्रकाशामुळे प्रदूषण.

# ६-प्रदूषण निवारण

**शिक्षिका:** आपण प्रदूषणाच्या पहिल्या धड्यात चार मुख्य प्रकारच्या प्रदूषणाबद्दल माहिती समजून घेतली. अशुद्ध पाणी म्हणजे जल प्रदूषण, अशुद्ध हवा म्हणजे वायू प्रदूषण, मोठा आवाज म्हणजे ध्वनी प्रदूषण आणि जमिनीची हानी म्हणजे जमीन प्रदूषण. आता प्रदूषण कसे कमी करायचे याबद्दल बोलूया. प्रदूषण निवारणाचे अनेक उपाय आहेत. मोठमोठे कारखाने आपापल्या परीने प्रदूषण कमी करायचे उपाय करतात. प्रत्येक राष्ट्राचे काही कायदे, नियम असतात, ज्यामुळे प्रदूषणाला आळा बसवता येतो. प्रदूषण कमी करायची जबाबदारी जशी कारखान्यांची आणि शासनाची आहे तशीच ती आपल्या सर्वांची पण आहे. आपण प्रत्येकाने घरात किंवा बाहेर काय केल्याने प्रदूषण कमी होईल ते मला सांगा.

**भार्गव:** सर्व प्रकारच्या प्रदूषणावर प्रभावी उपाय म्हणजे प्रतिबंधात्मक कृती (preventive actions).



**जय:** मोठ्या आवाजात ओरडू नका किंवा मोठ्याने गाणी लावू नका.

**प्रणव:** कचरा फक्त trash can मध्ये टाका. plastic, recycle bin मध्ये टाका. काही ठिकाणी ओला कचरा वेगळा केला जातो आणि त्याचे गांडूळ खत तयार करतात. ओल्या कचऱ्याची काही उदाहरणे अशी आहेत: काकडीची किंवा गाजराची साले, फ्लॉवर किंवा ब्रोकोलीची देठं, सफरचंदाची साले किंवा आंब्याची कोय.

**अनिश:** पाण्याचा वापर जरुरीपुरताच करा. बागेला पावसाचे साचवलेले पाणीच वापरा. नदीत किंवा समुद्रात plastic टाकू नका. खोलीतून बाहेर जाताना दिवे बंद करा.

**नयन:** बागेत आणि शेतात (farm) केमीकल्स आणि pesticide कमी प्रमाणात वापरा किंवा organic खते वापरा.



**अनया:** घरून मैत्रिणीकडे जाताना जमले तर सायकल वापरा किंवा चालत जा. carpool करा. हायब्रीड किंवा इलेक्ट्रिक गाड्या वापरा. शाळेत जाण्यासाठी बसने प्रवास करा.

**अवनी:** विमानाचा आवाज कमी होण्यासाठी जेट इंजिन मध्ये

सुधारणा,यंत्राची चांगली निगा (maintenance), आवाज रोखणारे barriers असे उपाय अमलात आणा.



**ईशा:** सिगरेट ओढणे हानिकारक असते. धुरामुळे कर्करोग होऊ शकतो. एवढेच नव्हे तर जवळच्या लोकांच्या तब्येतीवर परिणाम होतो. त्यामुळे सिगरेट ओढणाऱ्या व्यक्तींपासून लांब राहा.

**शिक्षिका:** अरे वा !! आपण अशा कितीतरी गोष्टी रोज केल्या तर प्रदूषण कमी होईल. तुम्ही बरीच माहिती आत्ता दिलीत. फारच छान ! म्हणजे प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रतिबंध (prevention) हा सर्वात मोठा चांगला उपाय आहे. मग लक्षात ठेवून ह्या सगळ्या गोष्टी कराल ना?

**सर्व विद्यार्थी:** हो SSSSS !!

**शिक्षिका:** शाब्बास !!!

**नवीन शब्द: (वाक्यात उपयोग करा)**

| | | | |
|---|---|---|---|
| आळा | Restriction/Control | प्रभावी | Effective |
| शासन | Government | गांडूळ | An earthworm |
| जबाबदारी | Responsibility | कर्करोग | Cancer |

**स्वाध्याय:**

**१. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

अ) सर्व प्रकारच्या प्रदूषणावर कोणता प्रभावी उपाय आहे?

आ) ओल्या कचऱ्याची काही उदाहरणे द्या .

इ) शाळेत बसने प्रवास केला तर काय होईल?

## २. जोड्या जुळवा:

| क्रिया | क्रमांक | उपाय |
|---|---|---|
| carpool करणे | | १. जमीन प्रदूषण प्रतिबंध |
| हळू आवाजात गाणी ऐकणे | | २. जल प्रदूषण प्रतिबंध |
| ओला कचरा वेगळा टाकणे | | ३. ध्वनी प्रदूषण प्रतिबंध |
| नदीत plastic टाकू नका | | ४. वायू प्रदूषण प्रतिबंध |

**शिक्षकांसाठी..**

- **समाविष्ट अभ्यासक्रम:**

  1. वाचन/श्रवण प्रश्न-उत्तरे, नवीन शब्द.

- **सूचना:**

  या धड्याच्या आधारे प्रदूषण निवारण यासाठी अजून काय उपाय करता येतील याची चर्चा करा.

# ७-श्रावण मासी हर्ष मानसी

श्रावण मासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहिकडे,क्षणात येते सर सर शिरवे क्षणात फिरुनि ऊन पडे



वरति बघता इंद धनुचा गोफ दुहेरि विणलासे
मंगल तोरण काय बांधले नभोमंडपी कुणी भासे

झालासा सुर्यास्त वाटतो,सांज अहाहा तो उघडे
तरु शिखरावर उंच घरावर पिवळे पिवळे ऊन पडे

उठती वरती जलदांवरती अनंत संध्याराग पहा



सर्व नभावर होय रोखिले सुंदरतेचे रुप महा

बलाकमाला उडता भासे कल्पसुमांचि माळचि ते
उतरुनि येती अवनीवरती ग्रहगोलचि की एकमते

फडफड करुनि भिजले अपुले पंख पाखरे सावरती
सुंदर हरिणी हिरव्या कुरणी निजबाळांसह बागडती

खिल्लारे ही चरती रानी गोपही गाणी गात फिरे
मंजूळ पावा गाई तयांचा श्रावण महिमा एकसुरे

सुवर्ण चंपक फुलला विपिनी रम्य केवडा दरवळला
पारिजातही बघता भामा रोष मनीचा मावळला

सुंदर परडी घेऊनि हाती पुरोपकंठी शुद्धमती
सुंदर बाला या फुलमाला रम्य फुले पत्री खुडती
देव दर्शना निघती ललना हर्ष मावे ना हृदयात
वदनी त्यांच्या वाचून घ्यावे श्रावण महिन्याचे गीत

कवी: बालकवी

**नवीन शब्द: (वाक्यात उपयोग करा.)**
मानसी, शिरवे, गोफ, भासे, खिल्लारे, रोष, ललना

**स्वाध्याय:**

१. श्रावण महिन्यातील निसर्गावर निबंध लिहा.
२. वरील कवितेत कोणकोणत्या पक्षी, प्राणी आणि फुलांचे वर्णन आहे? त्यांची चित्रे गोळा करा.

**शिक्षकांसाठी..**

**• समाविष्ट अभ्यासक्रम:**

व्याकरण, शब्दसंपत्ती, निबंध लेखन, आकलन आणि प्रश्नोत्तरे.


**• सूचना:**

या धड्याच्या आधारे विशेषणे शिकवा. नवीन शब्दांचा अर्थ समजावून सांगा आणि हे शब्द वापरून वाक्ये बनवा.

शिक्षिकांनी प्रथम स्वतःच कविता तीन-चार वेळा वाचावी. तिला चाल लावावी. सुंदर चालीवर हाताने ठेका धरून शिक्षिकांनी मुलांना कवितेची एकेक ओळ म्हणून दाखवावी आणि मुलांना आपल्या बरोबर म्हणायला सांगावे. विद्यार्थ्यांनी कविता म्हणायला सुरवात केल्यावर त्यांच्या उच्चारांवर लक्ष ठेवावे. कविता शिकवताना तिचा आशय व भाषिक सौंदर्य या दोन्ही अंगांचा विचार करावा. नंतर एकेक कडवे घेऊन त्याबाबत मुलांना विचार करायला सांगावा. अर्थ समजावून सांगावा. नंतर शिक्षिकांनी मुलांना कवितेतले वेगळे वाटणारे शब्द लिहायला सांगावे. कविता म्हणताना आपल्या डोळ्यासमोर काय येते त्याची चित्रे काढावी. कवितेमधली स्थळे, जागा, भौगोलिक परिस्थिती मुलांना चित्रे, नकाशे दाखवून शिकवावी.

यमक जुळवण्याचा खेळ खेळावा. मुलांना जुळणारे शब्द शोधायला लावावे. सर्वांनी मिळून कविता करण्याचा प्रयत्न करावा. मुले कविता अधिक जाणिवेने वाचतात. कवितेतल्या खाचाखोचा, गमतीजमती त्यांना न सांगता समजू लागतात. कविता वाचायची, ऐकायची, आस्वाद घ्यायची गोडी लागते.

# ८-सुपरमॅन राहुल !!!



राहुल, राहुल, राहुल !!! असे राहुलचे मित्र ओरडत होते. आज राहुलचा बक्षीस समारंभ होता. त्याच्या आई बाबांना तर राहुलचे प्रचंड कौतुक वाटत होते. आणि सोनालीला तिचा दादा म्हणजे सुपरमॅनच वाटत होता. त्याला शाळेतून, डेस्टिन शहराच्या महापौरांकडून, रेड क्रॉस सोसायटी आणि अनेक संस्थेंकडून पुरस्कार मिळाले. बक्षीस स्वीकारताना नक्की काय झाले ते राहुल आठवू लागला.

समारंभानंतर तो मित्रांना सांगू लागला, “आपण सारखे आई बाबांना म्हणत असतो ना, किती तुमचे नियम!! पण हे सुरक्षिततेचे नियम पाळले तर आपल्यालाच फायदा आहे, असे माझ्या लक्षात आले.” पुढे तो सांगू लागला, “आम्ही घरातून फ्लोरिडाच्या गल्फ कोस्टवर डेस्टिनला जायला निघालो, तेंव्हा आईने पूर्ण घराची एक फेरी मारली. तिने हे सर्व तपासले:



√ हिटर, टी. व्ही, पंखे, दिवे, बंद आहेत ना.

√ गॅस, पाण्याचे नळ बंद आहेत ना.

√ दारे, खिडक्या बंद आहेत ना.

आणि मग security alarm set करून आम्ही निघालो.

मग आम्ही सगळे गाडीत बसलो आणि डेस्टिनला पोहोचलो. रस्त्यावर पाळायचे सर्व नियम आम्ही पाळले.

√ गाडीचा पट्टा (Seatbelt) लावला.

√ Speedlimit आणि Traffic Signal चे नियम पाळले.

√ गाडीत जोरात गाणी लावली नाहीत.

√ गाडी चालवणाऱ्याने सेलफोनवर text केले नाही.

√ दर दोन तासांनी आलटून पालटून गाडी चालवली.

√ खायला थांबलो, तेंव्हा सोनालीने आईचा हात धरला. पार्किंग लॉटच्या दोन्ही बाजूला बघून मगच पुढे गेलो.

√ सोनाली लहान असल्यामुळे आईने तिला बजावले, “परक्या लोकांपासून सावध / दूर रहा.”

ज्या दिवशी पोहोचलो, त्या संध्याकाळी आम्ही सायकली भाड्याने घेतल्या आणि तासभर एक चक्कर मारायला निघालो. सायकली चालवताना आम्ही हे नियम पाळले:



√ हेल्मेट घातले.

√ सायकल चालवायची जी वेगळी लेन असते, त्या लेनमधूनच सर्वजण सायकली चालवत होतो.

√ सायकल चालविताना दोन्ही हात handle bar ठेवले.

√ रहदारीचे सर्व नियम पाळले.



मग आम्ही दुसऱ्या दिवशी समुद्रात पोहायला गेलो. तो खूप छान दिवस होता. तिकडची पांढरीशुभ्र वाळू आणि निळेशार पाणी. आम्ही खेळायला चेंडू पण नेला होता. पाण्यात पोहताना कोणकोणती काळजी घेतली पाहिजे ते मी सर्वांना सांगितले.

√ पाण्यात एकटे पोहू नका.

√ Rip current मध्ये अडकलात तर sideways जायचा प्रयत्न करा. किनाऱ्याकडे पोहायचा प्रयत्न करू नका. ......



तेवढ्यात मला पाण्यातून एक हात बाहेर आलेला दिसला. मी आई बाबांना सांगता सांगताच जोरात त्या हाताच्या दिशेने पोहत गेलो. जवळ गेल्यावर कळले, की एक छोटी मुलगी पाण्यात बुडत होती. तिचा पाय एका पाण्यातील वेलीत अडकला होता, आणि तिला तो सोडवता येत नव्हता. मी पट्कन तिचा आधी पाय सोडवला, आणि मग तिला घेऊन किनाऱ्यावर आलो. तिचे आई बाबा तिकडे होतेच. तो पर्यंत तिथे जमा झालेल्या लोकांपैकी एक डॉक्टर होते. त्यांनी त्या मुलीला तपासले, आणि ती ठीक आहे, असे सांगितले. सर्वांनी माझे कौतुक केले. त्या डॉक्टरांनी मला बाजूला घेऊन सांगितले, “तुला जर दोन मिनिटांचा उशीर झाला असता, तर काही खरे नव्हते.” रेड क्रॉसचा लाइफगार्डचा course मी केला होता, त्यामुळे मला फायदा झाला.

**नवीन शब्द: (वाक्यात उपयोग करा)**

| | | | |
|---|---|---|---|
| महापौर | Mayor | तपासणे | To check |
| सुरक्षितता | Safety | भाडे | Rent |

**स्वाध्याय:**

**१.खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

अ) तुम्ही शाळेत कोणते नियम पाळता, ते लिहा. (प्रयोगशाळेतील नियम सुध्दा लिहा)

आ) कॅम्पिंगला गेलात तर काय काळजी घ्याल  ते ८ ते १० वाक्यात सांगा.

इ) तुम्ही घरात कोणते सुरक्षा नियम पाळता ते लिहा.

**शिक्षकांसाठी..**

**• समाविष्ट अभ्यासक्रम:**

वाचन/श्रवण प्रश्न-उत्तरे, इतर काही सुरक्षा नियम असतील तर चर्चा करा.

**• सूचना:**

या धड्याच्या आधारे नवीन शब्द वापरून वाक्ये बनवा.


# <u>९-मराठी महिने व तिथी</u>

कालनिर्णय बघा आणि कोणत्या महिन्यात कोणत्या तिथीला दिलेला सण साजरा केला जातो याची यादी करा.

| **सण / महत्वाचा दिवस** | **मराठी महिना व तिथी / तारीख** | **सण महत्वाचा / दिवस** | **मराठी महिना व तिथी / तारीख** |
|---|---|---|---|
| संक्रांत | | महाराष्ट्र दिन | |
| नाग पंचमी | | गणेश चतुर्थी | |
| गुढी पाडवा | | लक्ष्मी पूजन | |
| वट पौर्णिमा | | दसरा | |
| नारळी पौर्णिमा | | होळी | |
| भाऊबीज | | गोपाळ काला / दहीहंडी | |

**** तारीख फक्त संक्रांत आणि महाराष्ट्र दिन ह्या दोन दिवसांसाठीच लिहा.**

# १०-मंगल देशा




मंगल देशा ! पवित्र देशा ! महाराष्ट्र देशा !
प्रणाम घ्यावा माझा हा श्री महाराष्ट्र देशा

राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा
नाजूक देशा, कोमल देशा, फुलांच्याही देशा

अंजनकांचन करवंदीच्या काटेरी देशा
बकुळफुलांच्या प्राजक्ताच्या दळदारी देशा
भावभक्तीच्या देशा आणिक बुद्धीच्या देशा
शाहिरांच्या देशा, कर्त्या मर्दांच्या देशा

जे ध्येय तुझ्या अंतरी
निशाणावरी, नाचते करी
जोडी इहपरलोकांसी
व्यवहारा परमार्थासी
वैभवासी वैराग्यासी



जरिपटक्यासह भगव्या झेंड्याच्या एकचि देशा
प्रणाम घ्यावा माझा हा श्री महाराष्ट्र देशा ॥



अपार सिंधुच्या भव्य बांधवा, महाराष्ट्र देशा
सह्याद्रीच्या सख्या, जिवलगा, महाराष्ट्र देशा
पाषाणाच्या देही वरिसी तू हिरव्या वेषा
गोदा, कृष्णा, भीमा तुझिया ललाटिंच्या रेषा
तुझिया देही करी प्रतिष्ठा प्रथम प्राणांची
मंगल वसती जनस्थानिंची श्रीरघुनाथांची
ध्येय जे तुझ्या अंतरी..... ॥२॥

कवी: गोविंदाग्रज

**नवीन शब्द: (वाक्यात उपयोग करा.)**
राकट, कणखर, ध्येय, ललाट

**स्वाध्याय:**

१. महाराष्ट्र देशासाठी कोणकोणती विशेषणे वापरली आहेत?
२. वरील कवितेत कोणकोणत्या नद्या आणि पर्वताचे वर्णन आहे? त्यांना नकाशात शोधा.
३. वरील कवितेत कोणकोणत्या फुलांचे वर्णन आहे? त्यांची चित्रे गोळा करा.

**शिक्षकांसाठी..**

- **समाविष्ट अभ्यासक्रम:**
  व्याकरण, शब्दसंपत्ती, वाचन आणि प्रश्नोत्तरे.
- **सूचना:**
  नवीन शब्दांचा अर्थ समजावून सांगा आणि हे शब्द वापरून वाक्ये बनवा.
  शिक्षिकांनी प्रथम स्वतःच कविता तीन-चार वेळा वाचावी. तिला चाल लावावी. सुंदर चालीवर हाताने ठेका धरून शिक्षिकांनी मुलांना कवितेची एकेक ओळ म्हणून दाखवावी आणि मुलांना आपल्या बरोबर म्हणायला सांगावे. विद्यार्थ्यांनी कविता म्हणायला सुरवात केल्यावर त्यांच्या उच्चारांवर लक्ष ठेवावे. कविता शिकवताना तिचा आशय व भाषिक सौंदर्य या दोन्ही अंगांचा विचार करावा. नंतर एकेक कडवे घेऊन त्याबाबत मुलांना विचार करायला लावावा. अर्थ समजावून सांगावा. नंतर शिक्षिकांनी मुलांना कवितेतले वेगळे वाटणारे शब्द लिहायला सांगावे. कविता म्हणताना आपल्या डोळ्यासमोर जे येते त्याची चित्रे काढावी. कवितेमधली स्थळे, जागा, भौगोलिक परिस्थिती मुलांना चित्रे, नकाशे दाखवून शिकवावी.

यमक जुळवण्याचा खेळ खेळावा. मुलांना जुळणारे शब्द शोधायला लावावे. सर्वांनी मिळून कविता करण्याचा प्रयत्न करावा. मुले कविता अधिक जाणिवेने वाचतात. कवितेतल्या खाचाखोचा, गमतीजमती त्यांना न सांगता समजू लागतात. कविता वाचायची, ऐकायची, आस्वाद घ्यायची गोडी लागते.

# ११-जैसलमेर -सोनेरी वाळवंटाचे गाव

एके दिवशी चहा पितापिता सहज गप्पा सुरू झाल्या की भारतात किती विविधता आहे. कुठे डोंगर, कुठे घनदाट रान, कुठे समुद्रकिनारा तर कुठे वाळवंट. तेव्हा लक्षात आले की आपण ह्या देशात राहून वाळवंट कधी बघितलेच नाही. मग काय! झाली प्रवासाची तयारी सुरु. टॅक्सी, हॉटेलचे आरक्षण करणे आणि इतर तयारी. बऱ्याच हितचिंतकांनी सांगितले की रस्त्याने जाणे धोकादायक ठरू शकते कारण बऱ्याचदा रात्री वादळ होते. म्हणून आम्ही निमूटपणे रेल्वे मार्गाने जायचे ठरवले.



शेवटी निघायचा दिवस उजाडला. आम्ही जोधपूरहून संध्याकाळच्या गाडीने निघालो. सहप्रवाशांबरोबर गप्पाटप्पा सुरु झाल्या. धावत्या गाडीच्या बाहेर बघण्याची मजाच काही वेगळी होती. बरीच हरणे, मोर, नीलगाय, असे वेगळेवेगळे प्राणी दिसत होते. पिसारा फुलवलेल्या मोराला पाहून तर माझ्या आनंदाला सीमाच राहिली नाही. जशी रात्र झाली, तसे आम्ही सर्वजण जेवून खाऊन आपआपल्या जागी झोपलो. मला जाग आली आणि बाहेर बघते तर काय! गाडी नुसतीच उभी. मला वाटले इतक्या लवकर जैसलमेरला पोहोचलो की काय! खिडकीच्याबाहेर डोकावून पाहिले तर काही दिसेना. काही उत्साही प्रवाशांनी खाली उतरून गाडी का थांबली आहे ह्याचा शोध घेतला. बाहेर अतिशय जोराने वारे वाहत होते. लोक म्हणत होते "आंधी चल रही है". वादळामुळे रुळांवर वाळू साठली होती. त्यामुळे गाडी पुढे जाऊच शकत नव्हती. वाट बघण्याशिवाय दुसरा काही उपाय नव्हता. दोन तासांनी पहाट झाली. तेव्हा समजले की आपण वाळवंटात आहोत. शेवटी वादळ थांबले व गाडी पुढे धावू लागली.



आम्ही दुपारच्या वेळी जैसलमेरला पोहोचलो. भूक लागल्यामुळे काही सुचत नव्हते. हॉटेलवर पोहोचल्यावर जेवणाची व्यवस्था केली. त्यानंतर शहर बघायला बाहेर पडलो. जैसलमेरचा सोनेरी टुमदार किल्ला उठून दिसत होता. उन्हात किल्याचा रंग खरोखरच सोनेरी दिसत होता. वाळूच्या दगडांचे बांधकाम असल्यामुळे सर्व गाव जणू सोन्याने घडविले असल्यासारखे वाटत होते. म्हणूनच जैसलमेरला "सोनेरी गाव" अशी उपमा दिली आहे. तिथे राहणाऱ्या बायकांच्या रंगीत ओढण्या व पुरुषांचे रंगीत साफे (फेटे) पाहून त्या सुवर्णभूषणात रत्नेच भरली आहेत असे वाटत होते.

चार वाजता आम्ही टॅक्सीने ‘सम’ नावाच्या एका गावाकडे निघालो. तिथे वाळवंटाची शोभाच वेगळी होती. वाळूवर कोलांट्या उड्या मारायला फार मजा आली. असे वाटले की आपले लहानपण परत आले आहे. उंटावरचा फेरफटका पण एक वेगळाच अनुभव होता. सर्व काही सुंदर दिसत होते. सूर्यास्ताची वेळ झाली आणि मोहक बासरीचे नाद ऐकू आले. तिथे उंटांना गोळा करण्यासाठी उंटवाले बासरी वाजवतात. वाळवंटात रात्री थांबायची पण सोय होती.



आजूबाजूला एकही इमारत नाही आणि दिव्यांचा झगमगाट नाही. त्यामुळे निरभ्र आकाश, पौर्णिमेचा चंद्र आणि असंख्य तारे, असे मोहक दृश्य बघायला मिळाले. बराच वेळ आम्ही तारे मोजले, नक्षत्रे ओळखायचा प्रयत्न केला आणि मग तंबूत रात्र घालवली.



मी आतापर्यंत केलेल्या कॅम्पिंगपैकी हे सर्वात आगळे वेगळे व अविस्मरणीय कॅम्पिंग होते. ते सोनेरी गाव, तंबूत रात्र घालवणे, असंख्य तारे मोजणे, उंटावरचा फेरफटका, इतकी मजा वाळवंटात असू शकते ह्यावर विश्वासच बसला नाही. दुसऱ्या दिवशी आम्ही परत आपल्या हॉटेलवर आलो. परतीच्या रेल्वेच्या प्रवासात आम्ही सारे वाळवंटातील मजा आठवून एकमेकांना सांगत होतो.

**नवीन शब्द: (वाक्यात उपयोग करा).**

| | | | |
|---|---|---|---|
| विविधता | Variety | मोहक | Alluring |
| हितचिंतक | A well wisher | निरभ्र | Clear, Cloudless |
| टुमदार | Elegant | अविस्मरणीय | Unforgettable, Memorable |
| उपमा | To compare | झगमगाट | Splendor |

**स्वाध्याय:**

**१. खालील प्रश्न सोडवा:**

अ) वर्गात तुमच्या आवडत्या प्रवासाचे वर्णन तुमच्या मित्र-मैत्रिणींना सांगा.
आ) प्रवासात काय विसरलात व कशी फजिती झाली ते ५-१० वाक्यात लिहा.

**२. खाली दिलेली वाक्ये, विशेषणे वापरून कशी प्रभावशाली बनवता येतील ते लिहा:**

उदाहरण: मी सायकल चालवत असताना पडलो आणि मला लागले.
उत्तर: मी अंधारात सायकल चालवत असताना धाडकन् पडलो आणि मला भली मोठ्ठी जखम झाली.

अ) मी रात्री आकाशात चंद्र, तारे पाहिले.
आ) मी गाडीतून जाताना मोर बघितला.
इ) जैसलमेरचा किल्ला दिसत होता.

**३. प्रवास वर्णनात 'उंटवाले' हा शब्द आला आहे. उंटांची काळजी घेणारा म्हणजे उंटवाला. काही शब्दांपुढे 'वाला' हे जोडले, की त्या संबंधी उद्योग करणारा असा अर्थ होतो.**

| क्रिया | संबोधन |
|---|---|
| भाजी विकणारा | |
| फुले विकणारी | |
| फळे विकणारे | |
| इस्त्री करणारा | |
| टोपी विकणारा | |

**शिक्षकांसाठी..**

- **समाविष्ट अभ्यासक्रम:**
  वाचन/श्रवण, विशेषणे, एखादी गोष्ट कशी रंगवून सांगणे,
  **प्रश्न३** मध्ये दिल्याप्रमाणे विद्यार्थ्यांना '_____वाला',' _______वाली', '_______वाले' कधी वापरावे ते शिकवा.

- **सूचना:**
  या धड्याच्या आधारे प्रवासवर्णन करताना कोणते मुद्दे सांगायचे हे शिकवा.
  स्थळ, कोठे गेला व कधी गेला होता? काय पाहिले? काय अनुभवले? कसे वाटले? त्यावेळी तुमच्या मनात कोणत्या भावना आल्या? काय आवडले? काय नाही आवडले?

# १२-आजारपणातील मौज - (लघु निबंध)

'आजारपणातील मौज' हे नाव वाचल्यावरच तुमच्या मनाला धक्का बसला असेल नाही ? तुम्ही म्हणाल, “आजारपणात कसली आली मौज ?” पण थोडा विचार करून पाहा म्हणजे तुम्हाला ही पटेल की आजारपण म्हणजे खरेच वेगळी मजा असते.

एरवी किरकोळ आजार म्हणजे -- ताप येतो. शिंका येतात, डोके दुखते, जबरदस्त सर्दी होते. आजार म्हटले की नुसता वैताग ! आजारी पडणं म्हणजे नुसतं अंथरुणात पडून राहणं. बाहेर जाता येत नाही. मित्रांबरोबर खेळता येत नाही. कडू औषधाचे घोट गिळायला लागतात. कडू गोळ्या खायला लागतात. आपल्याला आवडेल ते खाता येत नाही. प्रत्येक बाबतीत नन्नाचा पाढा. आजारपण म्हणजे नुसती बंधने !

हे सगळे खरे असले तरी तुम्ही थोडा वेगळा विचार करून पाहा म्हणजे कळेल की आजारपणात किती मौज असते ती ! माझ्या सारख्या हायस्कूल मध्ये जाणाऱ्या मुलांना पटेल, किती मजा असते आजारपणात.

आजारी पडलं की सगळयात महत्वाची गोष्ट म्हणजे सकाळी लवकर उठून शाळेत जाण्याची कटकट नाही. तुम्हाला हक्काची सुट्टी मिळते. अंथरुणात आरामात पडून राहायचं, आवडती पुस्तके वाचायची, व्हिडिओ गेम खेळायचे आणि टी . व्ही . बघायचा म्हणजे केवढी मजा ! आई गरमा गरम सूप चमच्याने भरविते. बदामाची खीर देते. खिमटा मऊ भात भरपूर तूप व मेतकूट घालून देते. दुसरे म्हणजे आजारी असल्यामुळे कोणी रागावत देखील नाही, कोणी काम सांगत नाही. सगळेच तुमची काळजी घेतात. तुम्हाला काय हवं नको ते बघतात. सगळ्या प्रकारची फळे खाता येतात.

तुमचे मित्र, नातेवाईक सगळेच तुम्हाला भेटायला येतात. येताना फुलांचा गुच्छ आणतात, ‘लवकर बरा हो’ असे कार्ड पण देतात. नाना प्रकारची फळे आणतात. या काळात सगळेच तुमच्यावर प्रेम करतात. आणि मग तुम्हाला कळते की चुकीसाठी रागावणारे तुमचे आई आणि बाबा तुमच्यावर किती प्रेम करतात. त्यांना तुमची केवढी काळजी असते. या काळात ते तुमच्यावर फक्त प्रेमाचाच वर्षाव करतात. मग आता सांगा, आहे की नाही आजारपण म्हणजे मौज !

**खाली दिलेल्या विषयांवर निबंध लिहा:**

माझा देश, आवडता विषय, मी कोण होणार, मला काय वाटते, महाराष्ट्र, माझी मराठी शाळा.

**शिक्षकांसाठी..**

**समाविष्ट अभ्यासक्रम:**

निबंध म्हणजे (नि + बंध). शब्दांना बंधनात मांडणे. आपल्या विचारांची जुळवणी करणे. जसे एक एक फूल घेऊन दोऱ्यात ओवतो आणि हार करतो तसेच शब्दांना व वाक्यांना एकत्रित करणे. निवडक विचारांची केलेली मांडणी. विषयाची निवड, शब्दांचा वापर आणि सुसंगतपणे लिहिणे याला निबंध असे म्हणतात.

खालील निबंधाचे प्रकार --

हे सर्व प्रकार स्वतंत्र वेगवेगळे नसून ते एकमेकात मिसळलेले आहेत.

१) वर्णन२) कथा कथन ३) कल्पना ४) चिंतन ५) आत्मचरित्र

तसेच चर्चा , लघुनिबंध असे पण प्रकार आहेत.

**सूचना:**

या धड्यातील नवीन शब्द वापरून वाक्ये बनवा.

चौथीच्या e-book मध्ये **" पडू आजारी"** ही कविता आहे, तिचा संदर्भ द्या.

# १३-सायंकाळची शोभा



पिवळे तांबूस ऊन कोवळे पसरे चौफेर
ओढा नेई सोने वाटे वाहूनिया दूर ||

झाडांनी किती मुकुट घातले डोकीस सोनेरी
कुरणांवर शेतात पसरला गुलाल चौफेरी ||



हिरवे हिरवे गार शेत हे सुंदर साळीचे
झोके घेती कसे चहुकडे हिरवे गालिचे ||

सोनेरी मखमली रुपेरी पंख कितीकांचे
रंग कितींवर तऱ्हेतऱ्हेचे इंद्रधनुष्याचे ||

अशी अचल फुलपाखरे फुले साळीस जणु फुलती
साळीवर झोपली जणु का पाळण्यात झुलती ||



झुळकन सुळकन इकडुन तिकडे किती दुसरी उडती
हिरे, माणके, पांचू फुटूनी पंखची गरगरती ||

पहा पाखरे चरोनी होती झाडांवर गोळा
कुठे बुडाला पलिकडे तो सोन्याचा गोळा ||

कवी: भा. रा. तांबे

**नवीन शब्द: (वाक्यात उपयोग करा.)**

कुरणे, मुकुट, अचल, साळी, तऱ्हेतऱ्हेचे

**स्वाध्याय:**

१. सूर्यास्त आणि सुर्योदयाचे वर्णन करणारा निबंध लिहा.

२. शहरातील सायंकाळचे वर्णन करा.

**शिक्षकांसाठी..**

- **समाविष्ट अभ्यासक्रम:**

व्याकरण, शब्दसंपत्ती, वाचन आणि प्रश्नोत्तरे.

- **सूचना:**

नवीन शब्दांचा अर्थ समजावून सांगा आणि हे शब्द वापरून वाक्ये बनवा.

शिक्षिकांनी प्रथम स्वतःच कविता तीन-चार वेळा वाचावी. तिला चाल लावावी. सुंदर चालीवर हाताने ठेका धरून शिक्षिकांनी मुलांना कवितेची एकेक ओळ म्हणून दाखवावी आणि मुलांना आपल्या बरोबर म्हणायला सांगावे. विद्यार्थ्यांनी कविता म्हणायला सुरवात केल्यावर त्यांच्या उच्चारांवर लक्ष ठेवावे. कविता शिकवताना तिचा आशय व भाषिक सौंदर्य या दोन्ही अंगांचा विचार करावा. नंतर एकेक कडवे घेऊन त्याबाबत मुलांना विचार करायला लावावा. अर्थ समजावून सांगावा. नंतर शिक्षिकांनी मुलांना कवितेतले वेगळे वाटणारे शब्द लिहायला सांगावे. कविता म्हणताना आपल्या डोळ्यासमोर जे येते त्याची चित्रे काढावी. कवितेमधली स्थळे, जागा, भौगोलिक परिस्थिती मुलांना चित्रे, नकाशे दाखवून शिकवावी.

यमक जुळवण्याचा खेळ खेळावा. मुलांना जुळणारे शब्द शोधायला लावावे. सर्वांनी मिळून कविता करण्याचा प्रयत्न करावा. मुले कविता अधिक जाणिवेने वाचतात. कवितेतल्या खाचाखोचा, गमतीजमती त्यांना न सांगता समजू लागतात. कविता वाचायची, ऐकायची, आस्वाद घ्यायची गोडी लागते.

## १४-खजिना

ऋता युनिवर्सिटीमधून घरी आल्यावर घरभर आईला शोधत होती. बघितले तर आई तिच्या खोलीतील कपाटातून एक खोके बाहेर काढत होती. "आई, काय करतेस?" आई म्हणाली "अग, खजिना काढतेय"
"कसला खजिना? सिंदबादच्या सफरीसारखा?"
"जुन्या पत्रांचा खजिना. तुझ्या आजोबांची खूप आठवण आली , म्हटले त्यांची जुनी पत्रे परत वाचेन". ऋताला माहीत होते की आता आजोबा नाहीत. ते चार वर्षापूर्वी वारले होते.
पत्र !! आणि त्याचा खोका. ऋतासाठी हा खोका कोडे होते. आई सांगू लागली " आम्ही बेचाळीस वर्षापूर्वी पिट्सबर्गला आलो त्या काळी आजच्या सारखे सेल फोन, इंटर नेट वगैरे नव्हते. पत्र पाठवून एकमेकांचे कसे चालले आहे ते कळायचे. भारतातून नातेवाईकांचे पत्र आले की काय आनंद व्हायचा. पत्र प्रथम घाईघाईत वाचायचे, मग दुसऱ्या दिवशी सावकाश एक एक ओळ नजरेत साठवून वाचायची. नंतरच्या आठवड्यात त्याचे पारायण करायचे. भारताची पत्रे यायला महिना लागायचा. आत्याने बाबासाठी पाठविलेली राखी, राखी पोर्णिमा झाल्या नंतर मिळायची. "
ऋताला ती सर्व पत्रे पाहून गम्मत वाटली. कितीतरी निरनिराळी पोस्टाची भारतातील तिकिटे, मामाची जपान वरून आलेली पत्रे, सिंगापूरच्या मैत्रिणीची पत्रे व जुने फोटो. त्या पत्रावर त्या त्या देशाचे शिक्के. आई बोलत होती "पत्रातील शब्दामधून जवळीक वाटायची, प्रेम दिसायचे. ती माणसे आजही जणू काही आपल्याशी गप्पा मारतात असे वाटते." आई आठवणीच्या खजिन्यात दंग झाली होती.

नमुना १ श्री

दिल्ली -- १० मे २०१३

प्रिय बाबा आणि आई यांस,

साष्टांग नमस्कार,

मी काल येथे सुखरूप येऊन पोहोचलो. मला घ्यायला विनय मामा व मामी विमानतळावर आले होते. त्यांना बघून मला खूप आनंद वाटला. येथे हवा खूपच गरम आहे. मी विमानात घातलेला स्वेटर काढला. तहान पण लागली होती. मामीने ते ओळखले. तिने जवळ असलेली पाण्याची बाटली दिली. मला बजावून सांगितले की कोठेही बाहेरचे पाणी प्यायचे नाही. नाहीतर पोट बिघडेल. उद्या परत पत्र लिहीन -- म्हणजे पत्रासारखी ही डायरी. मला पत्र लिहायला आवडते.

तुमचा मुलगा

अनुज

---

नमुना २

वॉशिंग्टन, डी.सी.

ता.– सप्टे. २४, २०१२

प्रिय आत्यास, सप्रेम नमस्कार,

तुझ्या ६० व्या वाढदिवसाच्या शुभेच्छा. हे पत्र मी मुद्दाम तुझ्या भेटकार्डामध्ये लिहीत आहे. कसे वाटते तुला? साठ वर्ष म्हणजे -- आता तुझे केस पांढरे दिसतात का? दाताला कवळी बसविली का? हा, हा, हा ...

अग, गंमत केली तुझी. मला माहित आहे की तू अजूनही खूप छान दिसतेस. . अशीच आनंदात राहा. मजा मजा कर. मी यावर्षी तुझ्याबरोबर सायकलीवर ट्रेक करीन. मला पण माझ्या १६ व्या वाढदिवसाला आजोबा नवीन सायकल घेऊन देणार आहेत.

तुझी लाडकी भाची

तनया

नमुना ३

नमस्कार श्री. केदार सर,

मला तुमच्या क्रिकेटच्या टीम मध्ये भाग घ्यायचा आहे. मला टीम मध्ये नाव घालायला एक आठवडा उशीर झाला. कारण मला गेमला आणणार कोण, सोडणार कोण ते ठरत नव्हते. मला माफ करावे. मला क्रिकेट खूप आवडते आणि खेळ समजतो पण.  पहिल्या दिवशी संपूर्ण वर्षाची फी घेऊन येऊ का? तसे मला इमेल ने कळवावे. मी तुमच्या उत्तराची वाट पहात आहे.

धन्यवाद

आदित्य

---

<u>नमुना ४</u>

हॅलो साची,

काय चाललंय? तुला फोन केला पण तुझा सेल फोन बंद दिसतो. मला मेसेज पाठव. काल तुझ्याकडे माझे गणिताचे बाईंडर राहिले का? घरभर शोधले. पण मिळालेच नाही. आई म्हणते तू फक्त वह्या विसरतेस हे बरं. आपले घर नाही विसरत.

जोक मारते. हं आता तू मला हसू नको. चल, चल लवकर मला मेसेज पाठव. मला अभ्यास पूर्ण करायचा आहे. अच्छा, चलो .. बाय बाय

सीमा

---

**नवीन शब्द: (वाक्यात उपयोग करा)**

१. खालील शब्द वापरून वाक्ये लिहा.

खजिना -- ( अलिबाबा व चाळीस चोर, टायटॅनिक बोट)

सफारी -- (कुगर पार्क, प्राणी संग्रहालय)

पारायण -- ( पुस्तक पुन्हा वाचले)

नजरेत साठविणे -- (व्हिक्टोरिआ धबधबा, ग्रॅंड कॅनियन)

दंग होणे -- (गाणे ऐकताना, चित्र काढताना)

**स्वाध्याय:**

१. खालील विषयावर पत्र लिहा

अ) मी शाळेत येणार नाही कारण मला फ्लू झाला

आ) आजोबांच्या ७५ व्या वाढदिवसाच्या शुभेच्छा

इ) मित्रांना हालोवीनच्या पार्टीला बोलवा

**शिक्षकांसाठी..**

- समाविष्ट अभ्यासक्रम
    - पत्र लिहिताना खालील मुद्दे विचारात घ्यावे
    - तारीख, ठिकाण, अभिवादन
    - पत्र सरकारी कामाचे का घरगुती का मित्र/मैत्रिणीला
    - कोणता मजकूर लिहिणार, काय लिहिणार याचा विचार
    - घरगुती पत्रात भाषा मनमोकळी व खेळकर असावी
    - मजकुर मांडताना स्पष्ट शब्दात/वाक्यात लिहावा
    - शेवटी समारोप करून स्वत:चे नाव लिहावे

# १५-सारांश लेखन

एखादा मजकूर किंवा उतारा वाचल्यानंतर मोजक्या शब्दात त्याची माहिती सांगायची म्हणजे "सारांश लेखन".

त्या उताऱ्यातील आवश्यकच गोष्ट कमी शब्दात पण महत्वाचा मजकूर न विसरता सांगणे याला "सारांश" म्हणतात. कमीत कमी शब्दात काय सांगितले ते लक्षात घ्यावे. कदाचित उताऱ्यातील मजकूर स्वत:ला पटत पण नसेल, काही गोष्टींचे खूप लांब वर्णन केलेही असेल, तरीही मूळ मुद्दा काय आहे हे लक्षात घ्यावे.

उताऱ्याच्या १/३ सारांश लेखन असावे. उतारा दोन तीनदा वाचावा. काय नको आणि काय हवे हे ठरवावे. कुठेही कमी जास्त न करता, तुमच्या स्वत: च्या भाषेत उताऱ्यातील महत्वाची माहिती लिहावी.

**सोपे उदाहरण --**

केदार एखादे Harry Potter पुस्तक वाचतो. पुस्तक वाचून झाल्यानंतर त्याची बहीण विचारते "पुस्तक कशाबद्दल आहे?

केदार -- जादू आणि चेटूक करणारा मुलगा असतो. तो जादूटोणा करणाऱ्या शाळेत जातो. खूप गमती होतात. भीती वाटते पण मजा येते.

केदार पुस्तकाचा सारांश सांगतो. संपूर्ण पुस्तकात काय होते ते थोडक्यात बहिणीला सांगतो.

खालील उतारा वाचा. नमुना सारांश लेखन वाचा. -

गोष्ट ८० वर्षापूर्वीची आहे. जॉन रॉकफेलर यांची. सर्वांना माहीत आहे की जॉन रॉकफेलर हे अत्यंत श्रीमंत होते तसेच खूप प्रसिध्द आणि सर्वांना नेहमी मदत करणारे समाज सेवक पण होते. रॉकफ़ेलर यांची स्टंडर्ड ऑईल ही कंपनी होती.
एकदा काय झाले, त्यांच्या एका मॅनेजरने २ मिलिअन डॉलरची चूक केली. त्यामुळे कंपनीचे खूप नुकसान होणार होते. सर्वांना वाटले की आता त्या मॅनेजरला कामावरून काढून टाकणार. पण तसे झाले नाही. जॉन रॉकफेलरने एका वहीचे पान उघडले व त्यांत त्या मॅनेजरने कंपनीसाठी आतापर्यंत काय काय व किती चांगल्या गोष्टी केल्या याची यादी केली. त्याचे चांगले गुण कोणते, त्याने कंपनी साठी किती वेळा उत्तम निर्णय घेतले, कंपनी किती मोठी झाली ते लिहिले.
ती यादी संपल्यावर न रागवता मॅनेजरला बोलविले. जॉन रॉकफेलर म्हणाले "चूक तर होतेच पण ती सुधारायची कशी हे तुला माहीत आहे. तेव्हा तू काम चालू ठेव."

**सारांश –**

जॉन रॉकफेलर यांची स्टॅंडर्ड ऑईल ही कंपनी होती. त्यांच्या एका मॅनेजरने हिशोबात २ मिलिअन डॉलरची फार मोठी चूक केली. त्यामुळे कंपनीचे मोठ्ठे नुकसान होणार होते. परंतु रॉकफेलरने त्याला कामावरून न काढता त्याच्या पूर्वीच्या उत्तम कामाची आठवण ठेवून त्याला चूक सुधारण्याची परत संधी दिली.

**नवीन शब्द:**

सारांश synoposis

मोजके limited

मुद्दा center point

आवश्यक important

मजकुर text

जादूटोणा witchcraft

चेटूक wizard

## १. चूक का बरोबर ते सांगा.

अ) उतारा म्हणजे कविता असते.

आ) खूप वर्णन करून लिहिणे याला सारांश म्हणतात.

इ) सारांश लिहिताना तुमचे मत न मांडणे.

ई) मूळ मुद्दा काढून टाकणे.

उ) कमी शब्दात सारांश लिहावा.

## २. खालील उतारा वाचा. सारांश लिहा.

एकदा जयंत नारळीकर यांना त्यांचे प्रोफेसर फ्रेड हॉईलनी एक फार अवघड गणित सोडवायला दिले. "बघ, प्रयत्न कर. जमले तर सोडव. एकूण तसे कठीण आहे." जयंत नारळीकर अत्यंत हुशार व अभ्यासू विद्यार्थी होते. कोणतीही गोष्ट ते चिकाटीने पूर्ण करायचे. मित्रांनी त्यांना आग्रह केला की आपण बाहेर जेवायला जाऊ. मजा करू. त्यांनी नाही म्हटले. दुसऱ्या दिवशी जयंत नारळीकर यांनी सोडविलेले गणित प्रोफेसरांना दाखविले. गणित बरोबरच होते. ते नुसते सोडविलेच नव्हते पण त्यात नवीन शोध लावणारे गणित होते. पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षण च्या अभ्यासात नवीन शोध लावणारी माहिती होती. प्रोफेसर हॉईल व नारळीकर यांनी १९६४ मध्ये हा शोध जाहीर केला.

# १६-वृत्तपत्र बातमी

वर्तमानपत्रात अनेक प्रकारच्या बातम्या आपण वाचतो. समाजातील, देशातील व जगातील घटना, समस्या, खेळ, हवामान, इत्यादी याबद्दल आपल्याला महत्त्वाची माहिती मिळते.
बातमी लेखन तपशीलवार व आकर्षक पद्धतीने केले पाहिजे. असे लेखन करताना काही मुद्दे लक्षात घ्यावे- ठळक मथळा, बातमीदाराचे नाव, घटना स्थळ, दिनांक/वेळ, मुख्य बातमी/ घटना वर्णन, बातमीबद्दल अधिक माहिती/ व्यक्ती/ निष्कर्ष /शेवट.

खाली दिलेली बातमी वाचा.

## पुण्यात मुळा- मुठा नदीला महापूर

पुणे दि.१३ जुलै २०१६ बातमीदार- राजेश्री कोलारे

गेले दोन दिवस पुणे शहरात रात्रंदिवस पावसाची संततधार सुरु आहे. सखल भागात अनेक ठिकाणी पाणी साठले आहे. गटारे तुडुंब भरल्यामुळे, पाणी रस्त्यावरून वाहत आहे. त्यामुळे वाहने व ती चालविणारे चालक यांची फारच तारांबळ उडत आहे. पायी चालणाऱ्या नागरिकांची तर चांगलीच त्रेधा तिरपीट उडत आहे.

नदीच्या पाण्याने धोक्याची पातळी गाठल्यामुळे शहरात घबराट निर्माण झाली आहे. नदी काठावरील लोकांची घरे धोक्यात आहेत म्हणून तेथील वस्ती हलवण्यासाठी पोलीस प्रयत्न करीत आहेत. कित्येक घरामध्येही पाणी शिरले आहे म्हणून लोक आपापले सामान कसे वाचवावे ह्या काळजीत आहेत.

तरी पुराचे दृश्य पाहण्यासाठी डेक्कन, लकडीपूल इत्यादी ठिकाणी नागरिक गर्दी करीत आहेत. काही वर्षांपूर्वी झालेल्या महापुराची आठवण लोक विसरलेले नाहीत. त्यामुळे लोक एकमेकांना त्या आठवणी सांगताना दिसत आहेत.
काही दिवसांपूर्वी पाऊस पडावा म्हणून प्रार्थना करणारे लोक आता पाऊस कमी व्हावा म्हणून देवाची प्रार्थना करीत आहेत. विद्यार्थ्यांना शाळेत जाणे अशक्य असल्यामुळे, परीक्षा जवळ आल्या असूनही शाळा बंद ठेवणे भाग पडत आहे.

एकंदरीत ह्या अतिवृष्टीमुळे आलेल्या पुराचा तडाखा अनेक लोकांना बसल्यामुळे पुण्याचे नागरिक हवालदिल झाले आहेत.

**नवीन शब्द: (वाक्यात उपयोग करा.)**

संततधार- सखल- तपशीलवार- आकर्षक- निष्कर्ष- गटारे- तुडुंब- तारांबळ उडणे- त्रेधा तिरपीट उडणे.

- **समाविष्ट अभ्यासक्रम:**

  वाचन/श्रवण प्रश्न-उत्तरे, अव्यये, कियापद.

- **सूचना:**

  या धड्याच्या आधारे अव्यये शिकवा. क्रियापदे शिकवा. नवीन शब्द व क्रियापदे वापरून वाक्ये तयार करा.

# १७-मेपलचे झाड



आमच्या घरासमोर एक मोठे मेपलचे झाड आहे. ते वीस वर्षे जुने आहे. झाडाचा बुंधा मोठा आहे. झाडाच्या फांदीवरून खारी सरसर पळत असतात. या झाडाला उन्हाळ्यात खूप हिरवी पाने असतात. झाडाची सावली दाट पडते. एका मोठ्या फांदीला दोरीने टायर बांधून झोका केला आहे. मी झोक्यावर बसून उंच झोके घेतो. झाडाच्या फांदीवर चढायला मजा येते. उजवीकडील फांदीवर पक्ष्याचे घरटे पण आहे.

कॅनडा तसेच अमेरिकेच्या पूर्व आणि मध्य अटलांटिक प्रांतामध्ये मेपलच्या झाडांची जंगले आहेत. मेपलच्या झाडांचे अनेक प्रकार असतात. लाल मेपल, चंदेरी मेपल, मधुर साखरी मेपल, अमूर, जापनीज मेपल इत्यादी.



हेमंत ऋतुत थंडी सुरू झाली की पानगळीचे दिवस सुरू होतात. झाडांची पाने लाल गर्द, पिवळी, नारिंगी किंवा फिकट शेंदरी रंगाची होतात. सगळे रान जसे एखाद्या चित्रकाराने चित्र

रंगवावे तसे लाल, पिवळ्या, शेंदरी व हिरव्या रंगाने भरलेले असते. खाली पडलेल्या पानांचा जणु काही सुंदर रंगीत गालिचा सगळीकडे पसरला आहे असे वाटते. दोन ते तीन आठवडे ह्या पानांच्या रंगाची किमया दिसते. लोक मुद्दाम गाडीने प्रवास करून झाडांचे रंग पाहण्यासाठी जातात. खूप फोटो काढतात. मुले वहीमध्ये चिकटविण्यासाठी पाने गोळा करतात. टेबलावर रंगीत पानांची डहाळी शोभा आणते.



आणखी खूप थंडी वाढली अन वारा आला की हळूहळू मेपलची पाने गळायला सुरूवात होते. इतर झाडांची पण पाने झडतात. बर्फ पडायला लागला की झाडांच्या फक्त फांद्या व वाळलेल्या काटक्या उरतात. हिवाळ्यात सगळीकडे भुसभुशीत बर्फ पडतो. तेव्हा देखील ही झाडे सुंदर दिसतात. कधी कधी झाडांच्या काटक्यांवर गोठलेल्या हिमाच्या पुंगळ्या तयार होतात. सूर्य प्रकाशात ह्या हिम पुंगळ्या लखलख चमकतात. आपण एखाद्या जादूच्या नगरीत आहोत असे वाटते.





जेव्हा हिवाळा संपतो व तापमान वर जाते तेव्हा मधुर साखरी मेपलच्या खोडातून थेंब थेंब रस झिरपतो. झाडाच्या खोडाला खिटी ठोकून त्याला बादली किंवा नळी लावतात. त्या नळीतून गोळा झालेला रस एका मोठ्या पिंपात गोळा

करतात. ते पिंप चुलाण्यावर ठेवून खाली जाळ लावतात. तो रस उकळवून आटवतात. रस घट्ट होत आला की गाळून बाटलीत भरतात. त्या मेपलच्या काकवीला "मेपल सिरप" म्हणतात. सकाळच्या न्याहरीच्या वेळी मेपल सिरप पॅन केक वर किंवा फ्रेंच टोस्टवर घेतात.





मला मेपल सिरप खूप आवडते. त्या मेपलच्या पाकापासून खाऊच्या गोळ्या, बिस्किटे आणि केक तयार करतात. कॅनडाच्या झेंड्यावर मेपलचे लाल पान आहे. ह्या मधुर रसाचा शोध आदिवासी लोकांनी फार पूर्वी लावला आहे. असे आहे हे साखरी मेपलचे झाड.









**नवीन शब्द: (वाक्यात उपयोग करा.)**

- चुलाणे -- open fire
- सरसर -- swiftly
- काकवी -- molasses
- साखरी -- sweet like sugar
- पाक -- syrup
- हिम पुंगळ्या -- icicles
- झिरपणे -- dripping
- खिटी -- taps, tapping
- पिंप -- container, barrel

**स्वाध्याय:**

१) उत्तर अमेरिकेतल्या इतर झाडांची माहिती सांगा. लिहा.

२) पिंपळ, वड या झाडांची माहिती गोळा करा.

३) ऊसाचा रस काढून काय करतात?

४) झाडापासून कोणते फायदे होतात ते सांगा.

५) रबर आणि कॉर्क झाडे कोणत्या प्रदेशात आहेत ती माहिती गोळा करा.

**शिक्षकांसाठी ..**

- **समाविष्ट अभ्यासक्रम:**
  धडा वाचून दाखविणे
  वाचन गट अभ्यास
  वर्ग सहल –– मेपल सिरप कसे तयार करतात

# १८-झुळूक मी व्हावे

वाटते सानुली मंद झुळूक मी व्हावे
घेईल ओढ मन तिकडे स्वैर झुकावे

कधी बाजारी तर कधी नदीच्याकाठी
राईत कधी वा पडक्या वाडयापाठी
हळू थबकत जावे कुठे कानोसा घेत
कधी रमत गमत वा कधी भरारी थेट

लावून अंगुली कलिकेला हळुवार
ती फुलुनी बघे तो व्हावे पार पसार
परी जाता जाता सुगंध संगे न्यावा
तो दिशा दिशातुनी फिरता उधळुनि द्यावा





गाण्याची चुकली मुकली गोड लकेर
झुळझुळ झऱ्याची पसरावी चौफेर
शेतात पाचूच्या निळया नदीवर शांत
खुलवीत मखमली तरंग जावे गात

वेळूच्या कुंजी वाजवुनी अलगुज
कणसांच्या कानी सांगावे हितगुज
शिंपावी डोही फुले बकुळीची सारी
गाळुनी जांभळे पिकली भूळभुळ तीरी



दिनभरी राबुनी दमला दिसता कोणी
टवटवी मुखावर आणावी बिलगोनी
स्वच्छंद अशा या करुनी नाना मौजा
घ्यावया विसावा यावे मी तिन्ही सांजा

कवी: दामोदर अच्युत कारे

**नवीन शब्द: (वाक्यात उपयोग करा.)**
ओढ ,कानोसा ,भरारी ,विसावा ,तिन्ही सांजा ,स्वैर, हितगुज, स्वच्छंद

**स्वाध्याय:**

**१. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

अ) शेताचा रंग कोणता हे कोणत्या शब्दातून कळते?

आ) झुळूक खोडकर आहे हे कोणत्या ओळीतून कळते?

इ) झुळूक आली की कोणकोणते बदल होतात?

ई) झुळूक कशा स्वभावाची आहे?

उ) या कवितेतील कोणकोणते शब्द नाद व्यक्त करतात?

ऊ) 'मखमली तरंग' याचा अर्थ तुमच्या शब्दात लिहा.

२. नदीचे विशेषण ओळखा.
३. मंद हे कशाचे विशेषण आहे?
४. अनेक वचनासाठी शब्द पुन्हा पुन्हा वापरण्याची लकब लक्षात घ्या आणि असे शब्द लिहा.
उदा. दिशा दिशातुनि
५. जोडशब्द लिहा. उदा. चुकली मुकली
६. दोन अर्थ असणारे शब्द लिहा. उदा. राई - १) मोहरी २) बाग
७. चालण्याच्या तऱ्हा व्यक्त करणारे शब्द लिहा.

**शिक्षकांसाठी..**

- **समाविष्ट अभ्यासक्रम:**
  व्याकरण, शब्दसंपत्ती आणि निबंध लेखन, वाचन आणि प्रश्नोत्तरे.
- **सूचना:**
  यातील जोडशब्द शिकवा. (उदा. चुकली मुकली, रमतगमत)
  नादानुकारी शब्द आहे. (उदा. झुळझूळ)
  'झुळूक' शब्द शिकवताना मुळात मराठीत 'झ'चे दोन उच्चार असतात. उदा. १) झेप, २) झेंडा
  'थबकत' या शब्दाच्या उच्चारात 'थ'बकत' नाही तर 'थब' कत' आहे;
  योग्य ठिकाणी आघात देऊन व योग्य ठिकाणी विराम घेऊन बोला.

वाऱ्याची वेगवेगळी रूपे दाखवणारी चित्रे मिळवा.

वाऱ्याचे वर्णन करणाऱ्या कविता वाचा. उदा. शांता शेळके - 'वाऱ्याचा रंग' शंकर वैद्य - 'वाऱ्याची पोरं'

नवीन शब्दांचा अर्थ समजावून सांगा आणि हे शब्द वापरून वाक्ये बनवा. या विषयाचा वापर करून मुलांना लेखनासाठी प्रोत्साहन द्या.

मुलांना 'मी कोण होणार' या विषयावर निबंध लिहायला सांगा.

© BMM Marathi Shala eBook Team

# १९-एक श्लोकी रामायण

आदौ  रामतपोवनादिगमनं हत्वा मृगं काञ्चनं
वैदेहीहरणं जटायुमरणं सुग्रीवसम्भाषणम्।
बालीनिग्रहणं समुद्रतरणं लंकापुरी दाहनं
पश्चाद्रावण कुम्भकर्ण हनन मेतद्धि रामायणम्।।

श्रीराम जेंव्हा तपोवनात (जंगलात) गेले तेंव्हा त्यांनी एका सोनेरी हरणाची शिकार केली. (हरणाला बाणानी मारले) तेवढ्यात रावणाने सीतेला पळवले. जटायू नावाच्या पक्षाने सीतेला सोडवण्याचा प्रयत्न केला पण रावणाने ठार मारले. पुढे सीतेचा शोध घेताना राम आणि सुग्रीव यांची भेट झाली. वाली हा सुग्रीवाचा भाऊ होता, परंतु तो त्याच्या सेनेला त्रास देत असे. म्हणून रामाने वालीचा वध केला. राम आणि वानर सेनेने समुद्र ओलांडून लंकेला आग लावली, आणि रावण आणि कुंभकर्ण याचा वध केला.

Once Ram went to Forest (there) he chased and killed the Golden Deer. Meanwhile Sita (his wife) was abducted (by Ravana) and Jatayu (a bird) was killed. Ram spoke with Sugriva. Killed Bali (unrighteous brother of Sugriva). Crossed the ocean and burnt Lanka (Ravan’s city). (Ram) Later killed Ravan and (his brother) Kumbhkaran. This is the story of Ramayana.

## २०–पसायदान

आता विश्वात्मकें देवें । येणे वाग्यज्ञें तोषावें ।
तोषोनिं मज ज्ञावे । पसायदान हें ॥

जें खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी- रती वाढो ।
भूतां परस्परे पडो । मैत्र जीवाचें ॥

दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्ये पाहो ।
जो जे वांच्छिल तो तें लाहो । प्राणिजात ॥

वर्षत सकळ मंगळी । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ।
अनवरत भूमंडळी । भेटतु भूतां ॥

चलां कल्पतरूंचे आरव । चेतना चिंतामणींचें गाव ।
बोलते जे अर्णव । पीयूषाचे ॥

चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन ।
ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ॥

किंबहुना सर्व सुखी । पूर्ण होऊनि तिन्हीं लोकी ।
भजिजो आदिपुरुखी । अखंडित ॥

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं इयें ।
दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।

येथ ह्मणे श्री विश्वेशराओ । हा होईल दान पसावो ।
येणें वरें ज्ञानदेवो । सुखिया जाला ॥

\- संत ज्ञानेश्वर

- May the Self of the universe be pleased with this sacrifice of words and bestow His grace on me.
- May the sinners no longer commit evil deeds, may their desire to do good increase, and may all beings live in harmony with one another.
- May the darkness of sin disappear, may the world see the rising of the sun of righteousness, and may the desires of all creatures be satisfied.
- May everyone keep the company of saints devoted to God, who will shower their blessings on them.
- Saints are walking gardens filled with wish-fulfilling trees, and they are living villages of wishfulfilling gems. Their words are like oceans of nectar.
- They are moons without blemish and suns without heat. May these saints be the friends of all people.
- May all beings in all the worlds be filled with joy, and may they worship God forever.
- May all those for whom this book is their very life be blessed with success in this world and the next.
- Then, Nivrittinath, the great Master said that this blessing will be granted. This brought great joy to Dnyaneshwar.

Note: The English translation of the Pasayadan can be found in Dnyaneshwar's Gita as rendered by Swami Kripananda

# २१–संत ज्ञानेश्वर



## रेडा वेद म्हणतो

ज्ञानेश्वरांचे मोठे भाऊ निवृतीनाथ आपल्या आई-वडिलांच्या मृत्यूनंतर धाकट्या तिन्ही भावंडांना घेऊन आपेगावला आले. तेथील नातेवाईकांची काही मदत होईल असे त्यांना वाटले. परंतु विठठल पंतांनी संन्यास घेतला म्हणून सर्व नातेवाईकांनी या पोरक्या झालेल्या मुलांकडे पाठ फिरविली व मदत केली नाही. उदरनिर्वाहासाठी निवृत्तीनाथ व ज्ञानेश्वरांवर भिक्षा मागण्याची वेळ आली. या परिस्थितीमध्ये ते परत आळंदीला परतले, परंतु तेथील समाजाने त्यांना वाळीत टाकलेले होते त्यामुळे तेथेही त्यांचे हाल झाले. त्या काळी पैठण हे ज्ञान मिळविण्याचे आणि वेद शिकण्याचे एक महत्वाचे ठिकाण होते. म्हणून ते सर्व पैठणला गेले. तेथे ब्राह्मणांचे वर्चस्व होते. तेथील ब्राह्मणांनी त्यांचा धिक्कार केला. ज्ञानेश्वरांनी देव हा सर्व ठिकाणी असतो त्यामुळे कोणाचा ही अव्हेर करु नये असे सांगितले. वेद शिकण्याचा हक्क सर्वांना आहे. तेथील ब्राह्मणांनी त्यांना तेथून जाणा-या एका रेड्याच्या तोंडी वेद म्हणविण्याचे आव्हान दिले. ज्ञानेश्वरांनी त्या रेड्याच्या डोक्यावर हात ठेवताच तो रेडा एखाद्या ब्राह्मणाने म्हणावे तसे वेद म्हणू लागला. हा चमत्कार बघितल्यावर तेथील ब्राह्मणांनी हार मानली. ज्ञानेश्वरांच्या दैवी शक्तीला हात जोडले. तेथील ब्राह्मणांनी त्यांना पावित्र्याचे प्रमाणपत्र दिले.

- ज्ञानेश्वरांच्या वडिलांचे नाव विठ्ठलपंत व आईचे नाव रूक्मिणीबाई होते. त्यांना चार मुले होती. निवृती, ज्ञानदेव, सोपान आणि मुक्ताबाई.
- विठ्ठलपंत साधु झाले. ते घर, बायको, मुले सोडून मठात राहायला गेले. तेथे त्यांना शांती न मिळाल्यामुळे ते परत घरी आले. परंतु ब्राह्मण समाजाला ते मान्य नव्हते. संन्यास घेतलेल्या माणसाने परत संसार केला म्हणून तेव्हा सर्वांनी त्यांना व मुलांना समाजाबाहेर काढले. खूप वाईट वागविले. खूप त्रास दिला. मुलांना वेदाचा अभ्यास करायला बंदी केली.
- विठ्ठलपंतांनी मुलांना वेद आणि शास्त्र शिकविले होते. ब्राह्मण समाजाच्या त्रासाला कंटाळून आई वडिलांनी स्वतःला नदीत बुडवून प्राण सोडले. मुले पोरकी झाली. मुलांना भीक मागून पोट भरावे लागले. सर्व मुले अत्यंत हुषार होती.
- ज्ञानदेवाला वेद उत्तम येत होते. ज्ञानदेव सर्वांना सांगत असे की वेद म्हणायचा हक्क सर्वांना आहे मग तो कुणी शुद्र असो की ब्राह्मण, बाई असो वा पुरूष किंवा लहान असो वा मोठा.
- ज्ञानदेवाला देव रुपाने शक्ती मिळाली होती. एकदा तर त्यांनी सर्व ब्राह्मण सभेत रेड्याकडून वेद म्हणवून दाखविले. चांगदेव महाराजांना भेटण्यासाठी ज्ञानदेवाने भिंत हवेत चालविली. त्यांनी असे अनेक चमत्कार केले.

  सर्व लोक त्यांना ज्ञानेश्वर म्हणू लागली. ज्ञानेश्वरांनी संस्कृत मधील गीता सोप्या प्राकृत भाषेत लिहिली. तेंव्हा त्यांचे वय १७ वर्षाचे होते. प्राकृत भाषेची नंतर सोपी मराठी भाषा झाली. आज "ज्ञानेश्वरी" हा फार मोठा प्रसिध्द ग्रंथ आहे.
- सगळे लोक त्यांना "संत ज्ञानेश्वर" म्हणू लागले. ज्ञानेश्वरांनी प्रवचन करीत सर्व समाजाला जागे केले. त्यांनी २१ व्या वर्षी " आता माझे काम संपले आहे" असे म्हणून आळंदी येथे "समाधी" घेतली.

**नवीन शब्द: (वाक्यात उपयोग करा.)**

साधु, प्राण, भिक्षा, बंदी, पोरकी

| | |
|---|---|
| शुद्र | Untouchable |
| संन्यास | Priesthood life |
| वाळीत टाकणे | To ostracize/ Excommunicate |
| प्राकृत | Prior to Marathi |
| वेद आणि शास्त्र | Hindu philosophy contains hymns, scriptures and guidance on rituals |
| समाधी | Mausoleum, Place of worship,<br>(Spiritual state of consciousness, end of life, pure bliss) |

**स्वाध्याय:**

खालील योग्य क्रम लावून वाक्ये परत लिहा.

१) हवेत ज्ञानेश्वर यांनी चालविली भिंत. ____________________

२) हक्क वेद सर्वांना आहे म्हणायचा ____________________

३) ग्रंथ ज्ञानेश्वरी मोठा आहे सर्वात ____________________

रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.

१) विठ्ठलपंतानी मुलांना ____________ आणि शास्त्र शिकविले होते.

२) ज्ञानेश्वरी हा मोठा प्रसिध्द _____ आहे.

३) रेड्याने ____ म्हटले.

**शिक्षकांसाठी...**

**संत ज्ञानेश्वरांविषयी अधिक माहिती:**

**इथे क्लीक करा.** [संत ज्ञानेश्वर]

http://en.wikipedia.org/wiki/Dnyaneshwar

http://www.hindupedia.com/en/Sant_Dnyaneshwar

http://www.poemhunter.com/sant-dnyaneshwar/biography/

Born: 1275 AD.

Place: Apegaon, Taluka Paithan, Aurangabad, Maharashtra, India

Died: 1296 AD (age 21) in Alandi

Guru: Nivruttinath

Literary Works: Dnyaneshwari, Abhang poetry, Amrutanubhav, Haripath

- **समाविष्ट अभ्यासक्रम:**

  व्यक्ती परिचय, वाचन/श्रवण प्रश्न-उत्तरे, अव्यये, क्रियापद.

- **सूचना:**

  या धड्याच्या आधारे अव्यये शिकवा. क्रियापदे शिकवा. नवीन शब्द व क्रियापदे वापरून वाक्ये तयार करा.

# २२–संत तुकाराम



## गाथा नदीत बुडवल्या

तुकाराम महाराज विठ्ठलाचे भक्त होते. समाजात भेदभाव न करता सर्वांशी प्रेमाने वागावे आणि देवावर विश्वास ठेवून भक्ती करावी असे त्यांनी लिहिलेल्या अभंगात सांगितले आहे. तुकारामांनी संस्कृत भाषेतील वेदांचा अर्थ मराठी भाषेत सांगितला. त्यांच्या ह्या अभंग ग्रंथाला "गाथा" म्हणून ओळखतात.

त्यावेळी घडलेली अशी गोष्ट सांगतात की, संस्कृत भाषेतील वेदांचा अर्थ तुकारामांनी मराठी भाषेत सांगितला म्हणून पुण्याजवळच्या वाघोली गावात राहणाऱ्या रामेश्वर भट यांनी तुकारामांना शिक्षा दिली. “तुकारामांच्या अभंग- गाथा नदीत बुडवून टाका” अशी आज्ञा त्यांनी ब्राह्मणांना दिली.

तुकारामांनी सर्व गाथा एका कापडात गुंडाळल्या व त्यांना दिल्या. ब्राह्मणांनी त्या पोथीवर एक वीट बांधली आणि देहू गावातील इंद्रायणी नदीत गाथा बुडविल्या. सर्व लोक बघत होते. तुकारामांना अतिशय वाईट वाटले. ते झाडाखाली बसून विठ्ठलाचा धावा करीत होते. " माझी तुझ्यावर भक्ती आहे " असे देवाला विनवीत होते. तेरा दिवस त्यांनी अन्न पाणी घेतले नाही. दररोज लोक नदीवर यायचे व गाथेचे काय झाले म्हणून बघायचे. चौदाव्या दिवशी चमत्कार झाला. तुकारामांच्या गाथा नदीच्या पाण्यातून वर आल्या. सर्व कागद कोरडे राहिले व पाण्यावर तरंगू लागले. हा चमत्कार पाहून ब्राह्मण लोकांनी तुकारामांची माफी मागितली. रामेश्वर भटांना पश्चात्ताप झाला व त्यांनी तुकारामांचे शिष्यत्व पत्करले. सर्व लोक तुकारामांना "संत तुकाराम" म्हणू लागले.

- तुकारामाचे नाव तुकाराम बाळोबा आंबिले होते. वडील व्यापारी होते.
- तुकाराम हे संत कवी होते. त्यांनी लोकांना भक्तीचा मार्ग दाखविला. ते विठ्ठलाची (विठोबा, पांडुरंग ) भक्ती करायचे.
- अत्यंत साध्या सोप्या मराठी भाषेत त्यांनी विठोबाच्या भक्ती रचना लिहिल्या आहेत. त्यांचे सर्व अभंग असलेला ग्रंथ "तुकारामाची गाथा" म्हणून प्रसिध्द आहे.
- तुकाराम सांगत, देवाची भक्ती करायचा हक्क सर्वांना आहे. जात, धर्म, शुद्र, ब्राह्मण असा भेदभाव केला तर आपण देवाची भक्ती करू शकणार नाही.
- ब्राह्मण समाजाचे सांगणे असे की देवाची पूजा करणे, भजन म्हणणे हे फक्त ब्राह्मण लोकांचे काम आहे. हा हक्क शुद्र लोकांना नाही.
  तुकाराम देवाची प्रार्थना करणारी पदे लिहीत असत. हातात वीणा घेऊन झाडाखाली अभंग गाणी म्हणत.
- त्यांना सगळीकडे देव दिसत असे. प्राणी, पशु, पक्षी, झाडे या सर्वांत देव राहतो असे ते सांगत.
- शिवाजी महाराज तुकारामांचा खूप आदर करीत असत. तुकाराम शिवाजी राजांना उपदेश करीत असत.

**नवीन शब्द: (वाक्यात उपयोग करा.)**

व्यापारी, रचना, उपदेश, ध्यान

| | |
|---|---|
| वीणा | Musical instrument |
| अभंग | Poems |
| तुकारामाची गाथा | Ballads of Tukaram |
| अभंगाच्या पोथ्या | Collection of poems, volumes |

**स्वाध्याय:**

खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१) तुकाराम कोण होते?

२) तुकारामांच्या कवितेला काय म्हणतात?

३) तुकाराम कोणत्या देवाची भक्ती करायचे?

खालील शब्दांचे विरुध्द अर्थी शब्द लिहा.

| | | | |
|---|---|---|---|
| १) बुडविणे | २) ओली | ३) सोपे | ४) दु:ख |
| ५) खाली | ६) दिवस | ७) सगळे | ८) धर्म |

**शिक्षकांसाठी...**

**संत तुकारामांविषयी अधिक माहिती:**

**इथे क्लीक करा.** संत तुकाराम

http://www.marathimati.net/saint-tukaram/

http://en.wikipedia.org/wiki/Tukaram

http://www.iloveindia.com/spirituality/gurus/tukaram.html

| | |
|---|---|
| Born: | 1577, Dehu, India |
| Died: | 1650, Indrayani River |
| Spouse: | Rakhumaabai (died) married to second wife Jijaabai (Aavali) |


- **समाविष्ट अभ्यासक्रम:**

  व्यक्ती परिचय, वाचन/श्रवण प्रश्न-उत्तरे, अव्यये, क्रियापदे.

- **सूचना:**

  या धड्याच्या आधारे अव्यये शिकवा. क्रियापदे शिकवा. नवीन शब्द व क्रियापदे वापरून वाक्ये तयार करा.

# २३–रवींद्रनाथ टागोर



## साहित्य आणि पुरस्कार

रवींद्रनाथ टागोर हे भारतातील एक प्रसिद्ध कवी, चित्रकार आणि लेखक होते. त्यांचा जन्म भारतातील कोलकाता येथे १८६१ साली झाला. त्यांच्या घरात नेहमी संगीताचे कार्यक्रम, नाटकाच्या तालमी आणि मासिकांचे प्रकाशन इत्यादी होत असे.

रवींद्रनाथ ह्यांनी वयाच्या आठव्या वर्षी पहिली कविता लिहिली. वयाच्या सोळाव्या वर्षी पहिला कविता-संग्रह छापला. त्यानंतर त्यांनी खूप गोष्टी, कविता आणि नाटके लिहिली. रवींद्रनाथांचे "जन गण मन" हे गीत भारताने राष्ट्रगीत म्हणून स्वीकारले. १९१३ साली रवींद्रनाथ यांच्या "गीतांजली" या प्रसिध्द कविता संग्रहाला जग प्रसिध्द "नोबेल" पारितोषिक मिळाले. ब्रिटीश सरकारने त्यांना "सर" ही पदवी दिली. लोक त्यांना "गुरुदेव टागोर" म्हणून ओळखू लागले.

जिथे हिरवीगार झाडे आहेत, रंगीबेरंगी फुले आहेत, किलबिलणारे पक्षी आहेत आणि वर निळे निळे आकाश आहे अशा सुंदर ठिकाणी मुलांची शाळा का नसावी? अशी शाळा रवींद्रनाथ यांनी काढली. त्याचे नाव आहे "शांती निकेतन". तिथे मुले झाडाखाली जमतात आणि शिकतात. अशा शांत जागेतील भिंती नसलेली शाळा मुलांना खूप आवडते.
रवींदनाथांचा मृत्यु १९४१ मध्ये झाला.

**नवीन शब्द: (वाक्यात उपयोग करा. )**

किलबिलणारे पक्षी, चित्रकार, शांत ठिकाण, नाटक , रंगीबेरंगी

**स्वाध्याय:**

१) तुमची शाळा कशी असावी या विषयावर ५-१० वाक्ये बोला.

२) तुमचे आवडते नाटक कोणते व का? ते सांगा.

३) खालील व्हिडिओ बघा .

**प्रश्न -- योग्य पर्याय निवडा.**

१) रवींद्रनाथ यांच्या __________ या ग्रंथाला नोबेल पारितोषिक मिळाले.

(चित्रकला , गीतांजली, नाटक )

२) रवींद्रनाथ यांनी लिहिलेले "जन गण मन " हे भारताचे ____________ आहे.

( प्रतिक, प्रसिध्द शहर , राष्ट्रगीत )

३) मुलांना "शांतीनिकेतन " शाळा आवडते कारण ______________________

(तेथे अभ्यास नाही, शाळा झाडाखाली भरतात, दररोज खूप खायला खाऊ देतात)

https://www.youtube.com/watch?v=bohvzO9aqcs शांतिनिकेतन

https://www.youtube.com/watch?v=jnsF7uy8KPo जन गण मन

https://www.youtube.com/watch?v=-jHxfStngSU एकला चालो रे

https://www.youtube.com/watch?v=SwUNwXYIpcA बर्लिन स्पीच

**शिक्षकांसाठी...**

रवींद्रनाथ टागोरांविषयी अधिक माहिती: इथे क्लीक करा .रवींद्रनाथटागोर

https://mr.wikipedia.org/wiki/%E%0A%4B%0E%0A%4B%5E%0A%80%5E%0A%82%4E%0A%4A%6E%0A8%5D%E%0A%4B%0E%0A%4A%8E%0A%4BE%E%0A%4A5_%E%0A%4A%0E%0A%4BE%E%0A%95%4E%0A%82%5E%0A%4B0

| | |
|---|---|
| टोपणनाव | गुरुदेव |
| जन्म | मे ७, १८६१ कोलकाता, भारत |
| मृत्यू | ऑगस्ट ७, १९४१ कोलकाता, भारत |
| प्रसिद्ध साहित्य | जन गण मन, गीतांजली |
| वडील | देबेंद्रनाथ टागोर |
| आई | सरला देवी |
| पत्नी | मृणालिनी देवी (विवाहः डिसेंबर ९, १८८३) |
| पुरस्कार | साहित्यातील नोबेल पारितोषिक (१९१३) |

- **समाविष्ट अभ्यासक्रम:**

  वाचन/श्रवण प्रश्न-उत्तरे, अव्यये, कियापदे.

- **सूचना:**

  या धड्याच्या आधारे अव्यये शिकवा. क्रियापदे शिकवा. नवीन शब्द व क्रियापदे वापरून वाक्ये तयार करा.

## अवांतर वाचन

## २४-मतदान


"मी मुख्याध्यापक झाले तर सर्व मुलांना आयपॅड घेऊन देईन" जुईली टेबलावर मुठी आपटत सांगत होती.

"मी मुख्याध्यापक झालो तर अनेक प्रकारचे खेळ मुले शिकतील अशी सोय करीन. त्यामुळे पुढील ऑलिंपिक खेळाडू तयार होतील" अनुप जोरात सांगत होता.

आज वर्गात काय गंमत झाली ते अनुप आई बाबांना संध्याकाळी घरी जेवायच्या वेळी सांगत होता. "आज आम्हांला शिक्षकांनी निवड्णूक, मतदान कसे असते ते शिकविले." दोन गट केले होते. जुईली आणि मी वेगवेगळ्या पक्षाचे उमेदवार व नेते होतो. सर्व मुले ज्याला आवडेल त्या नेत्याला मदत करत होते. आम्ही चिन्हे तयार केली. माझे चिन्ह चित्ता होते. जुईलीचे चिन्ह हत्ती होते. आम्ही दोघांनी भाषणे केली. आम्ही शाळेत कोणते नवीन बदल करणार ते पटवून सांगत होतो. मतपत्रिका तयार केल्या. मतदानाची पेटी पण तयार केली.

चिन्ह घेऊन मिरवणूक काढली. "मला मते द्या," "कोणत्या कारणांसाठी मला मते द्या" असे प्रत्येक विद्यार्थ्याला सांगितले. दुपारी मतदान झाले. कोण निवडून येणार ते कळत नव्हते. सर्वांनी मते दिल्यानंतर मत मोजणी केली.

"आई, तुला माहित आहे, फक्त तीनच मतांनी जुईली जिंकली. मी हरलो म्हणून मला वाईट नाही वाटले. आम्ही एकमेकांचे अभिनंदन केले."
वर्गात खूपच मजा आली. शिक्षकांनी खूपच छान शिकविले. एकदम झकास दिवस गेला. या वर्षी अमेरिकेची पण निवडणूक आहे. "आई, बाबा तुम्ही कोणाला मत देणार?" अनुप विचारत होता.




**नवीन शब्द: (वाक्यात उपयोग करा. )**

| | | | |
|---|---|---|---|
| मुख्याध्यापक | Principal | निवडणुक | Election |
| मतदान | Voting | मत | Vote |
| मतपेटी | Voting Box | मतपत्रिका | Ballot |
| नेता | Leader | खेळाडू | Player |
| पक्ष | Party | उमेदवार | Candidate |
| मिरवणुक | Procession | मत मोजणी | Vote counting |

**स्वाध्याय:**

१) लोकशाही कोणत्या देशात आहे त्या देशांची नावे लिहा.

२) तुमच्या देशात कोणता पक्ष निवडून आला ते सांगा.

३) खालील विषयांवर चर्चा करा. तुमची मते सांगा.


- वाहतुकीसाठी खूप रस्ते व हायवे बांधावे का?
- उंच उंच इमारती चांगल्या का वाईट?
- भाज्या कच्च्या खाणे उत्तम का भाज्यांचा रस पिणे?
- घरी दिलेला अभ्यास वर्गात केला तर जास्त फायदा होईल का?
- टिव्ही वरील जाहिराती उपयोगी पडतात का?
- हॉकी, बॉस्केटबॉल, बेसबॉलच्या खेळाडूंना दिले जाणारे अति मानधन योग्य आहे का?

**शिक्षकांसाठी...**

- लोकशाही व हुकुमशाही या दोन राज्यपद्धतींबद्दल माहिती सांगावी.
- फार पूर्वी एखादा राजा स्वतःच्या विचारांनी किंवा निवडलेल्या साथीदारांच्या मदतीने राज्याचा कारभार चालवायचा.
- लोकशाहीमध्ये लोकांच्या जीवनाला आवश्यक तसेच राष्ट्राची सुरक्षा आणि प्रगतीसाठी योग्य असणाऱ्या विषयांवर चर्चा होतात. निवडून दिलेले नेते निर्णय घेतात व ते बदल घडवून आणतात.

# २५-भारत - प्रांत आणि भाषा

भारतातील वेगवेगळया राज्यात वेगळया भाषा बोलल्या जातात. राज्यांची नावे आणि तिथे बोलल्या जाणाऱ्या भाषा खाली दिल्या आहेत. परंतु हिंदी भाषा भारताच्या बऱ्याच भागात बोलली जाते म्हणून ती आपली राष्ट्र भाषा आहे.



**महाराष्ट्र – मराठी**



# मराठी असे अमुची मायबोली !
# लाभले आम्हास भाग्य, बोलतो मराठी !!

मराठी भाषा ही भारतातील २३ भाषांपैकी एक भाषा असून महाराष्ट्रातील प्रमुख भाषा आहे. भारतात सर्वात जास्त बोलल्या जाणाऱ्या भाषांमध्ये, मराठी भाषेचा क्रमांक ४ था असून, जगातील सर्वात जास्त बोलल्या जाणाऱ्या भाषांमध्ये, मराठी भाषेचा क्रमांक १९ वा आहे. २००१ साली नोंद केलेल्या सर्वेक्षणात, जगात ७३ मिलिअन लोक मराठी बोलणारे आढळून आले. मराठी भाषेमध्ये अनेक बोलीभाषा आहेत. उदा. वऱ्हाडी, खानदेशी, मालवणी, अहिराणी, डांगी, वदवली, सामवेदी इत्यादी.

मराठी भाषेचा उगम हा संस्कृत भाषेमधून झाला आहे. सुरवातीला ही भाषा मराठी प्राकृत नावाने ओळखली जायची. मराठी प्राकृत भाषा ही इ.स.८७५ पर्यंत प्रचारात होती. मराठी प्राकृत ही भाषा शतवाहन राज्यात प्रमुख भाषा होती. कालांतराने ही मराठी भाषा म्हणून ओळखली जाऊ लागली. ऐतिहासिक संदर्भ आणि साहित्यानुसार मराठी भाषा ही ८ व्या शतकापासून आढळून आली आहे.

मराठी साहित्य हे देवनागरीच्या यादव राज्याच्या कालापासून भरपूर उदयास आले. महानुभाव पंथ आणि वारकरी पंथाच्या लोकांनी मराठी साहित्याचा प्रचार केला. वेद, पुराण, इतिहास, आयुर्वेद, खगोलशास्त्र, अशा विविध विषयांवरील अनेक ग्रंथ, कविता, गोष्टी, पुस्तके प्रकाशित झाली. संत मुकुंदराज, संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत तुकाराम, संत रामदासस्वामी अशा अनेक संतांनी महाराष्ट्रातील लोकांना मराठी भाषेतून परमार्थाचे आणि व्यवहाराचे धडे शिकविले. इ.स. १६३० च्या काळात, छत्रपती शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीत मराठी भाषेचा प्रचार महाराष्ट्रा बाहेर सुद्धा पसरला.

मराठी भाषेतील लिपी ही दोन प्रकारची आहे. देवनागरी लिपी आणि मोडी लिपी. जुन्या काळी मोडी लिपी वापरात होती, तर आधुनिक काळात देवनागरी लिपी प्रचारात आहे.

देवनागरी लिपी : 


मोडी लिपी : 

मराठी भाषेत विविध प्रकारचे अलंकार, वृत्त, व्याकरण आहे.

१९ व्या शतकाच्या काळात मराठी साहित्यात भरपूर प्रमाणात वाढ झाली. मराठी नाटके, चित्रपट, पटकथा, आत्मचरित्र, कथा, कादंबऱ्या सारख्या माध्यमातून बरीच जनजागृती झाली. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात ह्याचा फार मोठा उपयोग झाला.

१९-२० व्या शतकात पु.ल. देशपांडे, ना.सी. फडके, वि.स. खांडेकर, प्र.के. अत्रे अशा नामवंत साहित्यकांनी साहित्याला भरपूर योगदान दिले.

आजच्या आधुनिक काळात मराठी भाषेचे महत्व सर्व ठिकाणी दिसून येते. महाराष्ट्रात सुमारे २५ दैनिक वर्तमानपत्रे, अनेक साप्ताहिके व मासिके आहेत. तसेच दूरदर्शन वाहिन्या वेगवेगळे मराठी कार्यक्रम प्रसारित करतात.
अशी ही सर्व अलंकारांनी मढलेली, उत्तम सांस्कृतिक वारसा लाभलेली मराठी भाषा सर्व मराठी बोलणाऱ्या लोकांसाठी फार अभिमानाची गोष्ट आहे.

**स्वाध्याय:**

**१. गाळलेल्या जागा भरा.**

अ) मराठी भाषेचा उगम हा____________ भाषेमधून झाला आहे.

आ) मराठी भाषेतील लिपीचे प्रकार म्हणजे_________________आणि __________असे आहेत.

इ) लाभले आम्हास_____________, बोलतो मराठी !!

ई) जगातील सर्वात जास्त बोलल्या जाणाऱ्या भाषांमध्ये, मराठी भाषेचा क्रमांक _____________वा आहे.

# २६-भारतीय खेळ - भारतीय कला

## भारतीय खेळ

खेळ हे भारतीय संस्कृतीत अति प्राचीन काळापासून वेगवेगळ्या रूपात खेळले जायचे व आज ही खेळले जातात. खेळांचे मैदानी आणि बैठे असे दोन प्रकार आहेत. प्रामुख्याने पुरुष कुस्ती, मल्लखांब इत्यादी जे युद्धात उपयोगी पडतात अशा खेळांच्या स्पर्धेत भाग घेत असत.

काळ बदलला आणि आज खेळाडू प्रमुख व्यवसाय म्हणून किंवा दुसरा व्यवसाय म्हणून खेळ खेळतात. काही खेळ जे भारताशी निगडित आहेत त्यांचे संक्षिप्त वर्णन खाली दिले आहे. तुम्ही हे खेळ आपल्या मित्र मैत्रिणींबरोबर खेळून बघा व अधिक माहिती मिळवा. (शिक्षकांनी वर्गात ह्या खेळांचे विस्तृत वर्णन करावे.)





**बुद्धीबळ --** हा बैठा खेळ जगात फार प्रसिद्ध आहे . ह्या खेळाचा उगम भारतीय राजदरबारात झाला असे म्हणतात. हा खेळ दोन खेळाडूंमध्ये खेळला जातो. इंग्रजीत ह्याला चेस म्हणतात.



**सापशिडी--** बुद्धीबळाप्रमाणे ह्या खेळाचे जन्मस्थान सुद्धा भारत आहे. हा खेळ सुद्धा बैठा खेळ असून, दोन किंवा अधिक खेळाडूत खेळला जातो. शिडीवरून आपण वर चढतो व सापाच्या तोंडातून आपण खाली घसरतो.



**लगोरी--**हा खेळ दोन गटात खेळला जातो. एक गट सात रचलेले दगड चेंडूने फोडतो व परत रचायचा प्रयत्न करतो. दुसरा गट त्यांच्या विरोधी पक्षाला लगोरीचे दगड रचू न देण्याचा प्रयत्न करतो.



**विटी दांडू -** हा खेळ दोन वस्तूने खेळला जातो १) दांडू म्हणजे लांब काठी २ ) विटी म्हणजे जाड लाकडाचा तुकडा. हा तुकडा दोन टोकांकडून टोकदार असतो. एक डाव देणारा खेळाडू दांडूने लांब जाईल तितकी विटी उडवतो. इतर खेळाडू विटी झेलायचा प्रयत्न करतात.

**खो-खो -** हा एक मैदानी खेळ आहे. ह्या खेळासाठी मैदानाच्या दोन टोकांना रोवलेले खांब सोडल्यास कोणत्याही साधनांची आवश्यकता नाही. हा खेळ खेळण्यास अतिशय सोपा आहे, तरीही हा खेळ गतिमान असल्यामुळे खेळात चपळतेचा, गतीचा कस लागतो व हा खेळ उत्कंठावर्धक होतो.

**कबड्डी -** हा मुळात भारतातला व आता आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळला जाणारा सांघिक मैदानी खेळ आहे. या खेळात दोन संघ मैदानाच्या दोन बाजू राखून आळीपाळीने प्रतिस्पर्धी संघावर चढाया करतात. महाराष्ट्रात हुतुतू या नावाने हा खेळ ओळखला जातो.

**हॉकी -** हा खेळ आधुनिक काळातला खेळ आहे. हा भारताचा राष्ट्रीय खेळ आहे. ह्या खेळात भारताला सर्वात जास्त ऑलम्पिक पदके मिळाली आहेत.

**क्रिकेट --** क्रिकेट भारतात अतिशय लोकप्रिय खेळ आहे. हा खेळ इंग्रजांच्या राज्यकाळात भारतात खेळला जाऊ लागला. प्रत्येक भारतीय पुरुषाने आपल्या आयुष्यात एकदा तरी क्रिकेटची बॅट हातात धरली असेलच.

## भारतीय कला

भारतीय कला सर्वसाधारणत: तीन प्रकारात विभागता येतील; नृत्य-गायन, चित्रकला आणि नाटक. आपण यांची थोडी माहिती करून घेऊया.

**नृत्य --** नृत्य (नर्तन) हे सुद्धा भारतीय कलांपैकी एक महत्त्वाचे अंग आहे. नृत्यांतून भारतीय संस्कृतींचे दर्शन जास्त ठळकपणे होते. भारतात सात शास्त्रीय नृत्यशैली आहेत. यातील कथक, भरतनाट्यम्, कुचिपुडी, ओडिसी, मणीपुरी, कथकली आणि मोहिनीअट्टम या प्रमुख नृत्य पद्धती आहेत. या शिवाय दोनशेहून अधिक लोकनृत्ये आहेत. महाराष्ट्र राज्यात मुख्यतः लोकनृत्यावर भर दिला गेला आहे.

### लावणी

लावणी ही नेहमी स्त्रिया, नऊवारी साडी नेसून सादर करतात. पुरुष मंडळींची साथ असते ती वाद्यवृंदात आणि समूह गायनात. लावणीच्या वाद्यवृंदात ढोलकी, पेटी आणि तुणतुणे अशी पारंपारिक वाद्ये असतात. आजही लावणी महाराष्ट्र, मध्य प्रदेश, तामिळनाडू आणि कर्नाटकात प्रसिद्ध आहे.

**कोळी नृत्य**

या नृत्यप्रकारात कोळी लोक त्यांचा पारंपारिक नाच करतात. सर्वसाधारणपणे, हा नाच विरंगुळा म्हणून केला जातो. यात एखादी गोष्ट सांगितली जाते किंवा समुद्र / मासे / पाणी याबद्दल सांगितले जाते.

**दिंडी**



ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव इत्यादी संत पंढरपूर येथील विठ्ठलाच्या दर्शनाला आपल्या सहकाऱ्यांसह निघत असत. त्यांच्या हाती ध्वज, पताका इत्यादी असायच्या. या मिरवणुकीस दिंडी असे म्हणत असत. आजही वारकऱ्यांची दिंडी पंढरपूरला विठ्ठलाच्या दर्शनाला अभंग अथवा भजने गात,नामस्मरण करीत जाते. दिंडी देहू आणि आळंदी या गावाहून पंढरपूरला जाते.



**नाटक--** भारतीय रंगभूमीचा इतिहास प्राचीन आहे. भास हा प्राचीन भारतातील एक संस्कृत नाटककार आणि कवी होता. हा इसवी सनपूर्व चौथ्या शतकात होऊन गेला. भासाने तेरा नाटके लिहिली असावीत. ही नाटके रामायण, महाभारत, श्रीकृष्ण चरित्रावर आधारित असत. भासाप्रमाणे कालिदास हा प्राचीन भारतातील एक संस्कृत नाटककार आणि कवी होता. मेघदूत, रघुवंशम्, कुमारसंभवम्, ऋतुसंहार अशी संस्कृत महाकाव्ये त्याने लिहिली. कालिदास हा गुप्त साम्राज्याच्या कालखंडात सुमारे चौथ्या ते सहाव्या शतकातला असावा. मराठी नाटकांना संगीत नाटकांची परंपरा आहे. मराठी नाटकाचे आद्य प्रवर्तक बळवंत पांडुरंग किर्लोस्कर, त्यांनी कालिदासाच्या शाकुंतलाचे मराठी रूपांतर केले. तसेच संगीत मानपमान, संशयकल्लोळ, शारदा आदि नाटके प्रचंड गाजली आहेत. पु ल देशपांडे, विजय तेंडुलकर यांच्या सारख्या लेखकांची ती फुलराणी, सुंदर मी होणार, घाशीराम कोतवाल अशी सामाजिक नाटके प्रसिध्द आहेत. नाटके लिहिणाऱ्या लेखकांमध्ये पुरुष नाटककारांची संख्या तीनशेहून अधिक आहे. प्रसिद्ध स्त्री नाटककारांची संख्या सुमारे साठ असावी.



**चित्रकला--** महाराष्ट्रातील प्राचीन अजिंठा-वेरूळची लेणी ही त्यांच्यातील स्थापत्यकला, शिल्पकला व चित्रकलेसाठी जगप्रसिद्ध आहेत. रविवर्मा हे भारतातील प्रसिद्ध चित्रकार होते. वारली कला ही डहाणू येथील आदिवासी समाजातील कला आहे. चित्रांमधे एक वर्तुळ, एक त्रिकोण आणि एक चौरस असतो. चित्रकाराच्या निसर्ग निरीक्षणातून सूर्य आणि चंद्र, पर्वत आणि झाडे असतात. पेंटिंगचा मध्यवर्ती भाग विशेषकरून शिकार, मासेमारी, शेती, उत्सव , नृत्य, झाडे आणि प्राणी अशा दृश्यांनी वेढला असतो.








**संगीत-गायन--** भारतीय संगीतात उत्तर हिंदुस्तानी आणि कर्नाटकी अशा दोन प्रमुख शैली अस्तित्त्वात आहेत. भारतीय संगीत हे प्राचीन काळापासून विकसित होत आले आहे. सामवेद हा प्राचीन हिंदू संस्कृतीतील चार वेदांपैकी एक वेद आहे. साम म्हणजे 'गायन' आणि वेद म्हणजे 'ज्ञान'. सामवेदाला भारतीय संगीताचा पाया म्हटले जाते. तसेच भारतात लोकसंगीत ही प्रसिद्ध आहे. महाराष्ट्रात नाट्यसंगीत लोकप्रिय आहे. बालगंधर्व हे मोठे गायक होऊन गेले.

# २७-महाराष्ट्र इतिहास-भूगोल

## इतिहास

महाराष्ट्र. महा म्हणजे मोठे राष्ट्र म्हणजे प्रदेश. रामायणाच्या काळात या प्रदेशाला दंडकारण्य म्हणत असत. राम, सीता व लक्ष्मण हे १२ वर्षाच्या वनवासात येथे राहात होते. शतक ३ आणि ४ या काळात मौर्य राज्य करत होते. शतक ६ – १२ या काळात चालुक्य आणि चौल राजे राज्य करत होते. १४ व्या शतका पासून इस्लाम धर्माचे "खिलजी" आणि "तुघलक" वंशाचे राजे यांनी भारतात ४०० वर्षे राज्य केले.

१७ व्या शतकात शिवाजी राजे यांनी मराठी राज्य परत मिळविले. मराठी भाषा, हिंदु धर्म व संस्कृती यांचे राज्य स्थापन केले. या काळात डच, पोर्तुगीज आणि ब्रिटिश लोकांनी भारतात वसाहती केल्या. ब्रिटिशांनी १५० वर्षे भारतावर राज्य केले. १८ व्या शतकापासून संपूर्ण भारतात "स्वतंत्र भारत" ही चळवळ सुरू झाली. महाराष्ट्रातील वीर सावरकर, लोकमान्य टिळक, वासुदेव बळवंत फडके हे स्वराज्यासाठी लढले. १५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला.



## भूगोल

### पर्वत व नद्या

महाराष्ट्राची राजधानी मुंबई आहे. महाराष्ट्रात पश्चिम किनाऱ्याला अरबी समुद्र आहे. किनारपट्टीला असलेला प्रदेश कोकण. नंतर सह्याद्री पर्वताच्या उंच आणि भव्य रांगा आहेत. याच पहाडांवर शिवाजी महाराजांनी बांधलेले व जिंकलेले रायगड, राजगड, सिंहगड, प्रतापगड, तोरणा इ. असे किल्ले आहेत. महाराष्ट्राच्या पूर्व भागास दख्खनचे पठार म्हणतात. याच पठारावर सातपुडा डोंगराच्या रांगा आहेत. अजिंठा, वेरूळ, घारापुरी, एलिफंटा अशी प्रसिध्द कोरलेली लेणी आहेत. गोदावरी, कृष्णा, कावेरी, कोयना, तापी, वैनगंगा अशा मोठ्या नद्या आहेत.

### मराठी भाषा

महाराष्ट्राची मुख्य भाषा मराठी भाषा आहे. जगात ७३ दशलक्ष लोक मराठी बोलतात. भारतीय भाषांमध्ये मराठीचा चौथा क्रमांक आहे. मराठी भाषेबद्दल अधिक माहिती "मराठी असे अमुची मायबोली" ह्या धड्यात वाचा.

### पिके व फळे

महाराष्ट्रात ज्वारी, बाजरी, गहू, तांदूळ, मका, कापूस, ऊस या पिकांची शेती करतात. फळांमध्ये कोकणात हापुस आंबे, नाशिकला द्राक्षे, नागपूरला संत्री
तसेच केळी, सिताफळे, चिकू, पपई, काजू यांच्या फळबागा आहेत.

---------------------------------------

**नवीन शब्द: (वाक्यात उपयोग करा. )**


| | | | |
|---|---|---|---|
| दंडकारण्य | Unknown forest | वनवास | Exile |
| शतक | Century | स्वतंत्र | Free |
| वंश | Dynasty | वसाहत | Living territories |
| स्थापन | Established | चळवळ | Movement |
| राज्य केले | Ruled the kingdom | किनारपट्टी | Shoreline |
| बोलीभाषा | Dialect | क्रमांक | Number |
| पठार | Plateau | किल्ले | Forts |

फळबागा Fruitland

भाषा, हिंदु धर्म व संस्कृती Language, Hindu religion and culture

http://en.wikipedia.org/wiki/History_of_Maharashtra
http://www.amazingmaharashtra.com/2012/12/history-of-maharashtra.html

# महाराष्ट्राची फळे



# २८-वाचन आणि श्रवण

मराठी भाषेचा अभ्यास करताना मुख्य चार प्रकारांचा वापर करून भाषा विकास साधता येतो. (श्रवण, संभाषण, वाचन, लेखन). यामुळे मराठीची आवड निर्माण होते. मराठी भाषेचे ज्ञान वाढते. या धड्यात पुढील पानी उतारे व प्रश्न दिले आहेत. ते कसे वापरावेत याबद्दल खाली सूचना दिल्या आहेत.

**शिक्षकांसाठी..**

- समाविष्ट अभ्यासक्रम
  - मुलांना गृहपाठासाठी वाचन उतारे द्यावे.
  - २,३,४ असे मुलांचे गट करून वर्गात २० मिनिटे वाचन सराव करावा.
  - श्रवण विकासासाठी शिक्षकाने उतारा सावकाश वाचून दाखवावा.
  - शुद्ध उच्चार, संपूर्ण शब्द किंवा वाक्य कसे म्हणावे ते शिकवावे.
  - शिक्षकाने वाक्य सांगून मुलांनी लिहिणे आणि शुद्ध लेखन सराव करावा.
  - उताऱ्यावर चर्चा करावी. अधिक माहिती सांगावी.
  - बोली भाषा वाढवावी (संभाषण, भाषण, वक्तृत्व स्पर्धा)

**नवीन शब्द**

- दिलेल्या उताऱ्यातील नवीन शब्द व अर्थ लिहा.
- त्या शब्दांचा वाक्यात उपयोग करा.
- समान अर्थी व विरुध्द अर्थी शब्द शोधून लिहा.
- विशेषणे लिहा व त्यांचा वाक्यात उपयोग करा / वाक्ये सांगा.

**स्वाध्यायः**

- तुम्हाला आवडणाऱ्या व्यक्ती, एखादा प्रसंग, घटनेबद्दल माहिती गोळा करा व वर्गात सर्वांना सांगा.
- घरी पालकांना उतारा वाचून दाखवा.
- दिलेल्या प्रश्नांची उत्तरे संपूर्ण वाक्यात लिहा.

# नवरात्र

बंगालमध्ये नवरात्र हा उत्सव फारच मोठा असतो. शाळा कॉलेजांना सुट्टी असते. आपला गणेशोत्सव जसा असतो ना तसेच ह्या उत्सवाचे स्वरूप असते. तिथे देवीला दुर्गा, कालिका म्हणतात आणि नवरात्रीला दुर्गापूजा म्हणतात. त्याला आता सार्वजनिक सणाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. बंगालमध्ये दुर्गापूजा धुमधडाक्याने साजरी होते.

उत्तर भारतात त्याची वेगळीच कथा मानली जाते. या नऊ दिवसात श्रीरामांनी रावणाशी युद्ध केले आणि त्यानी दहाव्या दिवशी रावणाचा वध केला, अशी गोष्ट सांगतात. रामाच्या ह्या विजयानिमित्त हा सण साजरा होतो. म्हणून रामलीला ह्या संगीत नाटका सारखे नृत्याचे कार्यक्रम ठिकठिकाणी होतात. दहाव्या दिवशी दहातोंडी रावणाची कागद व फटाक्याने भरलेली मूर्ती करुन ती पेटवून देतात.

प्रश्न.

१) बंगालमध्ये कोणता मोठ्ठा सण असतो?

२) देवीला काय म्हणतात?

३) उत्तर भारतात काय करतात?

४) कोणते नाटक करतात?

# माझे गाव

माझे गाव समुद्रकिनाऱ्यावर वसले आहे. माझ्या गावाचे नाव गुहागर असे आहे. एका बाजुला अफाट सागर व दुसऱ्या बाजुला उंचच उंच डोंगर आहेत. गावाची वस्ती अंदाजे एक हजार घरांची आहे.

गावातील माणसे शेती व मासेमारी करतात. गावात एक प्राथमिक व एक माध्यमिक शाळा आहेत. तेथे गावातील मुले शिकतात. गावातील सर्व माणसे उद्योगी आहेत. सर्वजण आपापसात प्रेमाने वागतात. कोणीही भांडत नाहीत.

गावात एक मोठे देऊळ आहे. गावाजवळून एक छोटीशी नदी वाहते. तिचा तेथे सागराशी संगम होतो. तेथे वर्षातून एकदा जत्रा भरते. बाजार दर गुरूवारी असतो.

माझ्या गावाला आता सरकारने "आदर्शगाव" म्हणून जाहीर केले आहे. मला माझे गाव फार आवडते.

प्रश्न

१) माझे गाव कुठे आहे?

२) गावात किती शाळा आहेत?

३) गावातील लोकांचा मुख्य धंदा काय?

४) सरकारने काय जाहीर केले?

# पावसाळा

पावसाळा हा माझा आवडता ऋतु आहे. पाऊस येण्यापूर्वी जोराने वारे वाहू लागतात. आकाशात काळे ढग जमू लागतात. विजा कडकड आवाज करून चमकू लागतात. मग पावसाचे मोठे मोठे थेंब जमिनीवर पडू लागतात.

पाऊस आल्यामुळे जिकडे तिकडे छान दृश्य तयार होते. मोर आनंदाने नाचू लागतात. नद्यांना पूर येतात. शेतकरी आपल्या शेतात धान्याची पेरणी करतो. शेते व जंगले हिरवी गार दिसू लागतात.

मुलांना पाऊस खूप आवडतो. ते पावसात भिजतात, नाचतात व "येरे येरे पावसा" अशी पावसाची गाणी म्हणतात.

पाऊस नसता तर? पाऊस नसला तर आपण जगूच शकणार नाही. कारण माणसाच्या जीवनात पाण्याला खूप महत्व आहे. म्हणूनच पाण्याला 'जीवन' असे म्हणतात. म्हणूनच जीवनदाता पाऊस हा मला खूप खूप प्रिय आहे.

प्रश्न

१) पाऊस येण्यापूर्वी काय होते?

२) पाऊस आल्यानंतर काय होते?

३) मुले कसा आनंद दाखवितात?

४) पावसाला कोणते नाव दिले? कां?

# लॉरेन्स ॲन्थनी

७ मार्च २०१२ ची बातमी. लॉरेन्स एँथनी याची. आफ्रिकेतील "थुला थुला" नावाच्या एका मोठ्या जंगलाचा तो मालक होता. त्याच्या जंगलात हरीण, झेब्रा, हत्ती, चित्ते, ऱ्हायनो असे सर्व प्राणी होते. तो हत्तींशी बोलायचा. हत्तींची शक्ती, बुध्दी व वागणूक याबद्दल त्याचा खूप अभ्यास होता. अत्यंत आश्चर्याची गोष्ट म्हणजे लॉरेन्स जेव्हा मेला तेव्हा रानटी हत्तींचे कळप रांगेत चालत येऊन त्याच्या घरासमोर आले. एकूण १३० हत्ती. ते हत्ती काहीही न खाता, पाणीही न पिता त्यांच्या प्रेमळ मित्राला निरोप देण्यासाठी जागच्या जागी दोन दिवस शांत उभे राहिले. लॉरेन्स गेला हे त्या हत्तींना कसे कळले?

प्रश्न. --

१) ही बातमी कोणाची आहे?

२) जंगलात कोणते कोणते प्राणी होते?

३) लॉरेन्सने कोणत्या प्राण्यांचा अभ्यास केला?

४) लॉरेन्स वारला तेव्हा काय घडले?

५) यावर तुमचे मत सांगा

# अजंठा लेणी

अजंठा येथील लेणी जगात प्रसिध्द आहेत. एकविसाव्या लेण्याचे नाव आहे "गंधकुटी". हे लेणे पाहायला पुष्कळ वेळ लागतो. तेथे
दगडांच्या कोरलेल्या मूर्ती आहेत. सगळे दगडी खांब गोल गोल आहेत. जिकडे पाहाल तिकडे रंगी बेरंगी चित्रेच चित्रे दिसतात.
त्यांचे रंग मनाला आनंद देणारे आहेत. हे रंग अजूनही इतक्या शेकडो वर्षानंतर देखील टिकून राहिले आहेत. यातील बहुतेक चित्रे बुध्द आणि त्याचा धर्म "बौध्द धर्म" या विषयाची आहेत. बुध्दाच्या आयुष्यातील या गोष्टींना "जातक कथा" म्हणतात.

प्रश्न. --

१) अजिंठा कुठे आहे?
२) येथील लेणी व चित्रे कशी आहेत ते सांगा.
३) एकविसाव्या लेण्याचे नाव काय आहे?
४) येथील मूर्ती व चित्रे कोणाची आहेत?
५) जातक कथा कशाला म्हणतात?

## पुस्तक

पुस्तका सारखा दुसरा मित्र किंवा मैत्रिण नाही. आपल्याला इतर खूप मित्र असतात. ते कधी रागावतात, भांडतात, अभ्यासात मदत करतात किंवा आपण आजारी असलो तर चौकशी पण करतात. कधी मजा करतात व एकत्र पण खेळतात. पुस्तक वाचण्यासाठी ते हातात घ्यावे लागते. आपण पुस्तक वाचायला सुरूवात केली की पुस्तके गोष्टी रंगवून सांगतात, शब्दांची आणि वाक्यांची जादू करतात. एक पान वाचून संपले की दुसरे पान तयार. पुस्तक संपल्याशिवाय खाली ठेवावेसे वाटत नाही. काही पुस्तके वाचताना जगाची माहिती होते. पुस्तकात लिहिलेली वर्णने जशीची तशी आपल्या डोळ्यासमोर उभी राहातात. पुस्तक कुठेही पळून जात नाही पण तुम्ही ठरवाल तेव्हा ते वाचण्यासाठी तयार असते.

प्रश्न. --

१) आपले मित्र/मैत्रीण कसे असतात?

२) पुस्तकाला मित्र का म्हटले आहे?

३) पुस्तक वाचण्याने काय होते?

४) पुस्तक कोणती जादू करते?

५) तुमचे आवडते पुस्तक कोणते? कां?

## म्हशींचा पलटवार

जंगलात सिंहाचे राज्य चालते आणि त्याच्या एका गर्जनेने अख्खे जंगल हादरून जाते. सिंह कोणत्याही प्राण्याची शिकार करतो, एवढी ताकद त्याच्यात असते. मात्र कधी कधी त्याला छोट्या छोट्या प्राण्यांपुढे पराभव स्वीकारावा लागतो. अशीच एक घटना केनियाच्या मसाई मारा या ठिकाणी घडली. झाले असे की सिंह आणि सिंहीण जंगली म्हशींची शिकार करण्यासाठी निघाले. सिंह आणि सिंहीण म्हशींच्या घोळक्यावर झेप मारणार, तोच म्हशींची नजर त्यांच्यावर पडली आणि म्हशींनी सिंहांवर धारदार शिंगांनी पलटवार केला.

म्हशींच्या पलटवारानंतर सिंहीण पळून गेली, परंतु सिंह शिकार करण्याचा प्रयत्न करत राहिला. मात्र म्हशींच्या घोळक्याने एकजुटीने त्याच्यावर जोरदार पलटवार केला. सिंहावरच संकट कोसळले.सिंहाला भीती वाटली आणि त्याने तिथून पळ काढला. म्हशींनी दूरपर्यंत त्याचा पाठलाग केला. सिंह झाडांमध्ये जाऊन लपला आणि म्हशींनी त्याचा पाठलाग सोडला.

प्र.१. सिंहाला जंगलाचा राजा का म्हणतात?

प्र.२. वरील घटना कुठे घडली?

प्र.३. घोळका म्हणजे काय?

प्र.४. म्हशींनी सिंहाला कसे पळवून लावले?

प्र.५. ह्या घटनेवरून काय शिकता येईल?

# भारतातील पावसाळा

भारताच्या दक्षिणेला श्रीलंका हा देश आहे. तसेच पश्चिम दिशेकडे आसपास अनेक लहान लहान बेटे आहेत. ती बेटे ओलांडून हिंदी महासागर पार केला की पलिकडे आफ्रिका खंड आहे. त्याच्या टोकाचा देश म्हणजे दक्षिण अफ्रिका. या देशाजवळ एक बेट आहे, त्याचं नाव मादागास्कर. भारतातील पावसाची सुरूवात या ठिकाणापासून होते. इथून मान्सूनचे वारे वाहायला सुरवात होते. ते भारतात येत असताना वाटेत भलामोठा हिंदी महासागर आहे. तिथे उन्हामुळे पाण्याचे बाष्प होते. ढग तयार होतात. मान्सूनचे वारे या ढगांना आपल्यासोबत भारतात आणतात मग भारतात धो धो पाऊस पडतो. काही महिन्यांनी हे वारे परत उलट दिशेने वाहायला लागतात तेव्हा भारतातील पावसाळा संपतो. मान्सूनचे वारे पुन्हा या मादागास्करच्या दिशेने परत येतात.

महाराष्ट्रात ‘पावश्या’ पक्षी दिसला, की पाऊस लवकरच येणार असल्याचे लोक मानतात आणि शेतकरी कामाला सुरवात करतात.

प्रश्न

१) आफ्रिका खंड भारताच्या कोणत्या दिशेला आहे?

२) भारतात पाऊस कसा पडतो?

३) भारतातला पावसाळा केव्हा संपतो?

४) भारताच्या दक्षिणेला कोणता सागर आहे?

५) कोणता पक्षी दिसला की पाऊस येणार असल्याचे लोक मानतात?

# पहिला पक्षी कोणता असावा?

१९६१ साली जर्मनीमध्ये डायनॉसॉरसचा अभ्यास करण्यासाठी जमिनीमध्ये खोदकाम सुरू झाले. त्यामध्ये एका दगडात खूप वेगळा ठसा दिसला. तो एखाद्या छोट्या डायनॉसॉरस सारखा होता. त्याच्या चोचीसारख्या तोंडात दात होते. शेपटीमध्ये हाडे होती. तो अंडी घालत असावा. ह्या सर्व गोष्टी सरपटणाऱ्या प्राण्यांसारख्या होत्या. पिसांमुळे तो पक्षी आहे हे समजले. त्याच्यामध्ये सरपटणारे प्राणी आणि पक्षी या दोघांचेही अवयव होते. त्याचे नाव ठेवले आर्किऑप्टरेक्स (Archaeopteryx). हा पक्षी साधारण पंधरा कोटी वर्षांपूर्वीचा असावा असा अंदाज केला गेला. ह्या पक्ष्याच्या दोन्ही पंखांना जोडणारे एक हाड होते. ते इंग्लिश 'यू' अक्षरा सारखे दिसत होते. पंख वर खाली हलविण्याठी ते हाड खूप महत्वाचे असावे. ह्या पक्ष्यापासून इतर पक्षी कसे निर्माण झाले असतील ते समजले.

प्रश्न

१) कोणाचा ठसा सापडला?

२) खोदकाम कुठे व कोणत्या साली झाले?

३) त्या प्राण्याचे वर्णन करा.

४) तो प्राणी किती वर्षापूर्वीचा असावा?

५) सरपटणारे प्राणी उडतात का? का नाही?

# उस्ताद झाकिर हुसैन

जगप्रसिद्ध तबला वाजविणारे झाकिर हुसैन यांचा जन्म ९ मार्च १९५१ या दिवशी झाला. वयाच्या १२ वर्षापासून त्यांनी तबला वादनामुळे लोकांची मने जिंकली. १९७३ साली त्यांनी "लिव्हिंग इन द वर्ल्ड" हा अल्बम काढला. त्यांच्या तबल्याची जादू जगभर पसरली. त्यांनी अनेक भारतीय आणि जागतिक समारंभात तबला वाजविला. अप्रतिम तबला वादनामुळे ते खूप लोकप्रिय झाले. सर्वजण त्यांना "उस्ताद झाकिर हुसैन" म्हणून ओळखू लागले.

भारत सरकारने त्यांना "पद्मश्री" व "पद्मविभूषण" या पदव्या देऊन सन्मान केला. तसेच त्यांना १९९९ व २००९ साली "ग्रॅमी" अवार्ड पण मिळाले. "भारतीय शास्त्रीय संगीत आणि ज्याझ फ्युजन" (Indian classical music and jazz fusion) यात त्यांचे नाव घेतले जाते.

प्रश्न

१) झाकिर हुसैन कशासाठी प्रसिध्द आहेत?
२) वयाच्या कितव्या वर्षापासून त्यांचे नाव लोकांना कळले?
३) त्यांनी पहिला अल्बम कधी काढला? व त्याचे नाव काय?
४) त्यांना कोणत्या पदव्या मिळाल्या?
५) सध्या ते कोणत्या संगीतामुळे प्रसिध्द आहेत?

# परिशिष्ट – मुळाक्षरे

| | | | | |
|---|---|---|---|---|
| क (ka) | ख (kha) | ग (ga) | घ (gha) | ङ )gna) |
| च (cha) | छ (cHa) | ज (ja) | झ (za) | ञ (yna) |
| ट (Ta) | ठ (tHa) | ड (Da) | ढ (dHa) | ण (Na) |
| त (ta) | थ (tHa) | द (da) | ध (dHa) | न (na) |
| प (pa) | फ (pHa) | ब (ba) | भ (bHa) | म (ma) |
| य (ya) | र (ra) | ल (la) | व (va) | श (sha) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ष (Sha) | स (sa) | ह (ha) | |
| | ळ (La) | क्ष (kSha) | ज्ञ (dnya) | |

अ(a) आ(aa) इ(e) ई(ee) उ(u) ऊ(oo) ए(a) ऐ(ai) ओ(o) औ(ou) अं(um) अ(aha)

क(ka) का(kaa) कि(ki) की(kee) कु(ku) कू(koo)

के(kay) कै(kai) को(ko) कौ(kou) कं(kum) कः(kaha)

# परिशिष्ट - बाराखडी

# अ आ इ ई उ ऊ ए ऐ ओ औ अं अः

| स्वर | | चिन्ह |
|---|---|---|
| अ | | |
| आ | काना | ◌ा |
| इ | ऱ्हस्व (पहिली) वेलांटी | ◌ि |
| ई | दीर्घ (दुसरी) वेलांटी | ◌ी |
| उ | ऱ्हस्व (पहिला) उकार | ◌ु |
| ऊ | दीर्घ (दुसरा) उकार | ◌ू |
| ए | एक मात्रा | ◌े |
| ऐ | दोन मात्रा | ◌ौ |
| ओ | काना आणि एक मात्रा | ◌ो |
| औ | काना आणि दोन मात्रा | ◌ौ |
| अं | अनुस्वार | ◌ं |
| अः | विसर्ग | ◌ः |

| अ | आ | इ | ई | उ | ऊ | ए | ऐ | ओ | औ | अं | अ: |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ◌ा | ◌ि | ◌ी | ◌ु | ◌ू | ◌े | ◌ौ | ◌ो | ◌ौ | ◌ं | ◌ः |
| क | का | कि | की | कु | कू | के | कै | को | कौ | कं | कः |
| ख | खा | खि | खी | खु | खू | खे | खै | खो | खौ | खं | खः |
| ग | गा | गि | गी | गु | गू | गे | गै | गो | गौ | गं | गः |
| घ | घा | घि | घी | घु | घू | घे | घै | घो | घौ | घं | घः |
| च | चा | चि | ची | चु | चू | चे | चै | चो | चौ | चं | चः |
| छ | छा | छि | छी | छु | छू | छे | छै | छो | छौ | छं | छः |
| ज | जा | जि | जी | जु | जू | जे | जै | जो | जौ | जं | जः |
| झ | झा | झि | झी | झु | झू | झे | झै | झो | झौ | झं | झः |
| ट | टा | टि | टी | टु | टू | टे | टै | टो | टौ | टं | टः |
| ठ | ठा | ठि | ठी | ठु | ठू | ठे | ठै | ठो | ठौ | ठं | ठः |
| ड | डा | डि | डी | डु | डू | डे | डै | डो | डौ | डं | डः |
| ढ | ढा | ढि | ढी | ढु | ढू | ढे | ढै | ढो | ढौ | ढं | ढः |
| ण | णा | णि | णी | णु | णू | णे | णै | णो | णौ | णं | णः |
| त | ता | ति | ती | तु | तू | ते | तै | तो | तौ | तं | तः |
| थ | था | थि | थी | थु | थू | थे | थै | थो | थौ | थं | थः |
| द | दा | दि | दी | दु | दू | दे | दै | दो | दौ | दं | दः |
| ध | धा | धि | धी | धु | धू | धे | धै | धो | धौ | धं | धः |
| न | ना | नि | नी | नु | नू | ने | नै | नो | नौ | नं | नः |
| प | पा | पि | पी | पु | पू | पे | पै | पो | पौ | पं | पः |

| अ | आ | इ | ई | उ | ऊ | ए | ऐ | ओ | औ | अं | अ: |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ◌ा | ◌ि | ◌ी | ◌ु | ◌ू | ◌े | ◌ौ | ◌ो | ◌ौ | ◌ं | ◌: |
| फ | फा | फि | फी | फु | फू | फे | फै | फो | फौ | फं | फः |
| ब | बा | बि | बी | बु | बू | बे | बै | बो | बौ | बं | बः |
| भ | भा | भि | भी | भु | भू | भे | भै | भो | भौ | भं | भः |
| म | मा | मि | मी | मु | मू | मे | मै | मो | मौ | मं | मः |
| य | या | यि | यी | यु | यू | ये | यै | यो | यौ | यं | यः |
| र | रा | रि | री | रु | रू | रे | रै | रो | रौ | रं | रः |
| ल | ला | लि | लि | लु | लू | ले | लै | लो | लौ | लं | लः |
| व | वा | वि | वी | वु | वू | वे | वै | वो | वौ | वं | वः |
| श | शा | शि | शी | शु | शू | शे | शै | शो | शौ | शं | शः |
| ष | षा | षि | षी | षु | षू | षे | षै | षो | षौ | षं | षः |
| स | सा | सि | सी | सु | सू | से | सै | सो | सौ | सं | सः |
| ह | हा | हि | ही | हु | हू | हे | है | हो | हौ | हं | हः |
| ळ | ळा | ळि | ळी | ळु | ळू | ळे | ळै | ळो | ळौ | ळं | ळः |
| क्ष | क्षा | क्षि | क्षी | क्षु | क्षू | क्षे | क्षै | क्षो | क्षौ | क्षं | क्षः |
| ज्ञ | ज्ञा | ज्ञि | ज्ञी | ज्ञु | ज्ञू | ज्ञे | ज्ञै | ज्ञो | ज्ञौ | ज्ञं | ज्ञ |

# परिशिष्ट - जोडाक्षरे

१) मूळ अक्षरास तेच अक्षर जोडणे

ट ठ न प च ल

ट्ट ठ्ठ न्न प्प च्च ल्ल

घट्ट, मठ्ठ, अन्न, गप्पा, चक्क, गल्ली

२) उभी अक्षरे नसलेले अक्षर + दुसरे मूळ अक्षर जोडणे

क ट ठ ड द ल ह ळ छ

रक्त, मोठ्याने, केल्याने, साड्या, गाड्या, ह्याने, काट्याने, गोळ्या

३) उभी रेघ असलेले अक्षर + दुसरे मूळ अक्षर जोडणे

मग्न, शब्द, अभ्यास, मिरच्या, म्हैस, अन्विता, अरण्य, पिशव्या, तथ्य, चष्मा, हास्य

४) र अक्षराची जोडाक्षरे

१. अक्षरावर रेफ (रफार)

सूर्य, वर्ष, गर्व, सर्दी, पर्व, हर्ष, निर्णय, पर्वत

२. अक्षराला तिरकी रेघ

वक्र, चक्र, पत्र, मित्र, समग्र, ग्राम, सर्वत्र, कुत्रा, छत्री, भित्रा, श्री, चंद्र, प्रकार

३. अक्षरापुढे अर्धचंद्र

कु-हाड, दुस-याला, पु-या, त-हा, गु-हाळ, पाय-या, हि-यांची

४. अक्षराखाली दोन पाय

ट्रंक, ट्राम, ट्रे ,राष्ट्र, ड्रील, ड्रायव्हर

५. अक्षरावर अर्ध चंद्र

टॉम, टोमॅटो, डॉक्टर, मॉनिटर, हॅट

६. संस्कृत शब्द

कृष्ण, मृग, संस्कृत, वृत्त, गृह, पृथ्वी, कृती, कृपा, तृषा

# परिशिष्ट - विभक्ती प्रत्यय

वाक्य तयार होण्यासाठी त्यात येणाऱ्या मूळ शब्दात अनेकदा बदल होतो.
उदाः " तो पक्षी पंख हाड होते " याऐवजी
"त्या पक्ष्याच्या पंखात हाड होते" असे म्हटले तरच वाक्याचा अर्थ कळतो.
वाक्यात क्रियापद सर्वात महत्वाचे. वाक्यातील नाम, सर्वनाम इ. शब्दांचा क्रियापदाशी किंवा इतर शब्दांशी असणारा संबंध दाखवण्यासाठी शब्दात जे बदल केले जातात त्या बदलांना (किंवा विकारांना) विभक्ती म्हणतात. हे बदल करण्यासाठी शब्दांना जी अक्षरे जोडली जातात त्यांना विभक्ती प्रत्यय म्हणतात. वरील वाक्यात "च्या, त" हे विभक्ती प्रत्यय आहेत. हे विभक्ती प्रत्यय आठ प्रकारचे असून त्यांची नावे अशीः

**विभक्तीची आठ नावे**
१) प्रथमा २) द्वितीया ३) तृतीया ४) चतुर्थी ५) पंचमी ६) षष्ठी ७) सप्तमी ८) संबोधन

**विभक्तीचे प्रत्यय -**
**विभक्ती** - (एकवचन) - (अनेकवचन)

१) प्रथमा - प्रत्यय नाही - प्रत्यय नाही
२) द्वितीया - स, ला, ते - स, ला, ना, ते
३) तृतीया - ने, ए, शी - नी, शी, ही
४) चतुर्थी - स, ला, ते - स, ला, ना, ते
५) पंचमी - ऊन, हून - ऊन, हून
६) षष्ठी - चा, ची, चे - चे, च्या, ची
७) सप्तमी - त, ई, आ - त, ई, आ
८) संबोधन - प्रत्यय नाही - नो

विभक्तीतील रूपे

विभक्ती - (एकवचन) - (अनेकवचन)

| विभक्ती | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथमा | मुंगी | मुंग्या |
| द्वितीया | मुंगीस, मुंगीला, मुंगीते | मुंग्यांस, मुंग्यांना, मुंग्यांते |
| तृतीया | मुंगीने, मुंगीशी | मुंग्यांनी, मुंग्यांशी |
| चतुर्थी | मुंगीस, मुंगीला, मुंगीते | मुंग्यांस, मुंग्यांना, मुंग्यांते |
| पंचमी | मुंगीहून | मुंग्यांहून |
| षष्ठी | मुंगीचा, मुंगीची, मुंगीचे | मुंग्यांचा, मुंग्यांची, मुंग्यांचे |
| सप्तमी | मुंगीत | मुंग्यांत |
| संबोधन | मुंगे | मुंग्यांनो |

**अ) खालील वाक्यातील अधोरेखित शब्द, दिलेल्या कंसातील योग्य विभक्ती प्रत्यय लावून पुन्हा लिहा.**

१) झाडे पाणी घातलेस कां?

(झाडाला, झाडांना, झाडांला)

२) तनया आई स्वयंपाक करायला खूप आवडतो.

(तनयाने, तनयाला, तनयाच्या) (आईचे, आईला, आईच्या)

३)अमेरिका लठ्ठ माणसे प्रमाण किती आहे?

(अमेरिका, अमेरिकेच्या, अमेरिकेत) (माणसाच्या, माणसांचे, माणसाचे)

४) मी रामदास २५ मनाचे श्लोक पाठ आहेत.

(माझा, मला, माझी) ( रामदासने, रामदासांचे, रामदासांना)

५) झांशी राणी मुलाचे नाव काय?

(झांशीच्या, झांशीची, झांशीला) (राणीने, राणीच्या, राणीचे)

६) महात्मा ज्योतिबा फुले या मुली पहिली शाळा सुरू केली

(यांची, यांनी, यांना) ( मुलीनी, मुलीची, मुलींची)

७)शिवाजी महाराज आई नाव जिजाबाई होते
(महाराजाचे, महाराजांचे, महाराजांच्या) (आईला, आईच्या, आईचे)
८) पिझ्झा, कुकीज हे मी आवडीचे पदार्थ आहेत.
(माझे, मला, मीचे)
९) लहान मुले पाणी खेळायला फार आवडते.
(मुलाला, मुलांना, मुली) (पाण्याची, पाण्याला, पाण्यात)
१०) आम्ही गवत लोळायला खूपच मजा येते.
(आम्ही, आम्हाला, आमच्या) (गवताला, गवताचे, गवतात)
११) तुम्ही घर किती खुर्च्या आहेत?
(तुम्हाला, तुमची, तुमच्या) (घरला, घरात, घराच्या)
१२) ते मराठी शिकायला का आवडत नाही हे मी कळत नाही.
(त्याला, त्यांना, त्यांच्या) (मला, मी, मीला)
१३) तू सगळा अभ्यास झाला का?
(तुझा, तुमचा, तूला)
१४) बाग वेगवेगळया रंग फुले फुलली आहेत.
(बागत, बागेला, बागेत) (रंगानी, रंगांची रंगी)
१५) अनय अंधार भीती वाटते
(अनयला, अनयची, अनय) ( अंधाराला, अंधाराची, अंधारात)
१६) तो रस्ता जाणे धोकादायक आहे
(त्या, त्यात, ती) (रस्त्यात, रस्त्याने, रस्त्याची)
१७) आज आपण सर्व नातेवाईक समारंभ भेटले
(आपल्या, आपले, आपणले) (समारंभत, समारंभात, समारंभाचे)
१८) रविवार पाऊस अंदाज काय आहे?
(रविवारी, रविवारला, रविवारचा) (पाऊसचा, पावसाचा, पावसाला)
१९) तू काच बशी फोडलीस, त्या काचा तू पाय लागतील.
(काचेची, काचची, काच) (तुझी, तुला, तुझ्या) (पायात, पायला, पायाला)
२०) विभक्ती प्रत्यय उपयोग वाक्ये कसा कराल ते सांगा.
(प्रत्ययाला, प्रत्ययांचा, प्रत्ययचा) (वाक्यांना, वाक्ये, वाक्यात)

**आ) अधोरेखित शब्दांना योग्य विभक्ती प्रत्यय लावून खालील परिच्छेद परत लिहा.**

आम्ही घर एक मांजरी आहे. ती नाव बनू आहे. बनू डोळे हिरवे आहेत. बनू पेढे फार आवडतात. मी बनू खेळतो. बनू मी अंगावर उड्या मारते. बनू आई स्वेटर कुरतडते मग आई ती एक फटका मारते.

# परिशिष्ट – जोडशब्द

## जोडशब्द

शब्दाचा अर्थ अधिक स्पष्ट व्हावा म्हणून काही शब्दांची पुनरावृत्ती केली जाते. त्यामुळे बोलणे-लिहिणे डौलदार वाटते. एकाच अर्थाने दोन शब्द जोडून हे तयार होणारे जोडशब्द मराठी भाषेत आगळीच गंमत आणतात. नमुना म्हणून पुढील जोड शब्द पाहा

अक्कलहुशारी अचकटविचकट

मराठीत चार प्रकारचे असे जोडशब्द दिसतात.

१) एक शब्द दोनदा येणे- कटकट, लालेलाल, जवळजवळ

२) पहिल्या शब्दाच्या अर्थाचाच दुसरा शब्द - जवळपास, अक्राळविक्राळ, गाठभेट

३) पहिल्या शब्दाच्या उलट अर्थाचा दुसरा शब्द - चढउतार, एकटादुकटा, बरेवाईट

४) दुसऱ्या शब्दातील एखादे अक्षर बदलून जोडशब्द तयार होतो - अर्धामुर्धा, साधासुधा, अघळपघळ

| | |
|---|---|
| १ | कटकट |
| २ | पटापटा |
| ३ | लालेलाल |
| ४ | भसाभस |
| ५ | समोरासमोर |
| ६ | कुरकुर |
| ७ | धडधड |
| ८ | थुईथुई |
| ९ | धावपळ |
| १० | धडपड |
| ११ | वादळवारा |
| १२ | धक्काबुक्की |
| १३ | अधूनमधून |
| १४ | केरकचरा |
| १५ | नवाकोरा |

| | |
|---|---|
| १६ | वादविवाद |
| १७ | लहानमोठे |
| १८ | उठबस |
| १९ | आईवडील |
| २० | पुढेमागे |
| २१ | उलटसुलट |
| २२ | आतबाहेर |
| २३ | इकडेतिकडे |
| २४ | चटकमटक |
| २५ | अबरचबर |
| २६ | अर्धामुर्धा |
| २७ | अक्राळविक्राळ |
| २८ | ऐसपैस |
| २९ | थाटमाट |
| ३० | भाजीबिजी |

# परिशिष्ट-समानार्थी आणि विरुद्धार्थी शब्द

| विरुद्धार्थी शब्द |
|---|
| आवडता x नावडता |
| ओळखीचे x अनोळखी |
| अपेक्षित x अनपेक्षित |
| जिंकणे x हरणे |
| जय x पराजय |
| थोडे x पुष्कळ |
| कमी x जास्त |
| प्रिय x अप्रिय |
| मान x अपमान |
| मित्र x शत्रू |
| यश x अपयश<br>व्यवस्थित x अव्यवस्थित |
| शक्य x अशक्य |
| न्याय x अन्याय |
| ज्ञान x अज्ञान |
| स्वच्छ x अस्वच्छ |
| पूर्ण x अपूर्ण |
| चवदार x बेचव |
| शिस्त x बेशिस्त |
| जबाबदार x बेजबाबदार |
| नवे x जुने |
| ओले x कोरडे |
| सुख x दु:ख |
| संशय x नि:संशय |
| अवघड x सोपे |
| पटपट x हळूहळू |
| विसर x आठव |
| लक्ष x दुर्लक्ष |
| उपयोगी x निरुपयोगी |

| समानार्थी शब्द |
|---|
| आकाश - आभाळ |
| दिवस - वार |
| पाणी - जल |
| समुद्र - सागर |
| तलाव - सरोवर |
| कहाणी - कथा |
| वादविवाद - भांडण |
| पण - परंतु |
| सावकाश - संथ |
| धावत - दौडत |
| लगेच - ताबडतोब |
| हेवा - द्वेष |
| चिंता - काळजी |
| इवले - लहान |
| दु:ख - खेद |
| भिजणे - ओले होणे |
| अवघड - कठीण |
| अवघे - सगळे |
| शाळा - विद्यालय |
| विश्वास - भरवसा |
| प्रकाश - उजेड |
| घाई - धांदल |
| अचूक - बिनचूक |
| विख्यात - सुप्रसिद्ध |
| विदेश - परदेश |
| निराळी - वेगळी |
| स्तुती - प्रशंसा |
| अशक्त - दुबळा |
| अकारण- विनाकारण |

# परिशिष्ट – विरामचिन्हे

विराम चिन्हांचा वापर कसा करावा ?

पुर्ण विराम (.) वाक्याच्या शेवटी असतो. उदा. मी पुस्तक वाचतो.

अर्ध विराम (;) संयुक्त वाक्यात असतो.

| | |
|---|---|
| अल्प विराम (,) | उदा. टिळक, नेहरू ही थोर माणसे होती. |
| प्रश्न चिन्ह (?) | उदा. तू कधी येणार आहेस? |
| उदगारवाचक (!) | उदा. व्वा! काय छान चित्र आहे. |
| अवतरण चिन्ह (" ")(' ') | उदा. दादा म्हणाला, "मी आज उशिरा येईन". |
| बिंदू / विसर्ग ( : ) | उदा. मोर : आपला राष्ट्रीय पक्षी आहे. |

आपण एकमेकांशी बोलताना मधूनमधून काही वेळा थांबतो. या थांबण्याला विराम असे म्हणतात. अधिक चांगला अर्थ समजावा याकरता लेखनात विराम देतात. त्यासाठी ज्या चिन्हांचा उपयोग करतात त्यांना विरामचिन्हे म्हणतात. थोडक्यात वाक्ये कुठे सुरु झाले व कुठे संपले, कुठे थांबायचे याकरता विरामचिन्हे उपयुक्त आहेत.

विरामचिन्हे दोन प्रकारची असतात. एक विराम दर्शवणारी व दुसरी अर्थ समजावणारी. वाक्यात वापरली जाणारी काही विरामचिन्हे व त्यांची उदाहरणे पुढे दिली आहेत.

१. . पूर्ण विराम १. विधान पूर्ण झाले हे दाखवण्यासाठी
उदा. तो घरी गेला.

२. ; अर्धविराम दोन छोटी वाक्ये उभयान्वयी अव्ययाने जोडलेली असतात
उदा. ढग खूप गर्जत होते; पण पाऊस पडला नाही.

३. , स्वल्पविराम
उदा. एका जातीचे अनेक शब्द आंबा, पेरू, केळी

४. संबोधन दर्शवताना
उदा. विनू, इकडे ये.

५. : अपूर्ण विराम वाक्याच्या शेवटी तपशील द्यायचा असल्यास
उदा. ही पाने वाचा: १,५

६. ? प्रश्नचिन्ह प्रश्नार्थक वाक्याच्या शेवटी

उदा. विनू, कुठे आहेस?

७. ! उद् गार चिन्ह उत्कट भावना व्यक्त करताना ती दाखवणाऱ्या शब्दाच्या शेवटी

उदा. व्वा! छान लेख आहे.

८. " " अवतरण चिन्हे (दुहेरी) बोलणाऱ्या तोंडचे शब्द दर्शवण्याकरता

उदा. ती म्हणाली, " जा."

९. संयोगचिन्हे

अ) दोन शब्द जोडताना

उदा. प्रेम-विवाह

आ) ओळीच्या शेवटी शब्द अपुरा राहिल्यास

उदा. उद्या तुमच्या-

-पैकी कोण येणार आहे?

# परिशिष्ट – उच्चार

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ<br>a<br>America | | आ<br>aa<br>Art | | इ<br>i<br>it | | ई<br>ii/ee<br>Hawaii | | उ<br>U<br>Put |
| | | | | | | | | |
| ऊ<br>OO<br>Moon | | ए<br>E<br>Egg | | ऐ<br>Ai<br>Aik | | ओ<br>O<br>Go | | औ<br>Au<br>Gautam |
| | | | | | | | | |
| अं<br>An/um<br>Number | | अः<br>Aha<br>Aha | | ऋ<br>Ru<br>Rutu | | | | |
| क<br>Ka<br>Karate | | ख<br>Kha<br>Khaki | | ग<br>Ga<br>Gum | | घ<br>Gha<br>Ghost | | ङ<br>(‘n)<br>Va’ngmay |
| | | | | | | | | |
| च<br>Cha<br>Chicken | | छ<br>Chha<br>Chhatri | | ज<br>Ja<br>Jug | | झ<br>Za<br>Zebra | | ञ<br>(˜n)<br>Krou˜nch |
| | | | | | | | | |
| ट<br>Ta<br>Tub | | ठ<br>Tha<br>Thasa | | ड<br>Da<br>Duck | | ढ<br>Dha<br>Adhere | | ण<br>yNa<br>Paani |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| त<br>Ta<br>Tamale | | थ<br>Tha<br>Thai | | द<br>Da<br>The | | ध<br>Dha<br>Dhoom | | न<br>Na<br>Nut |
| | | | | | | | | |
| प<br>Pa<br>Pot | | फ<br>Fa<br>Fun | | ब<br>Ba<br>But | | भ<br>Bha<br>Bhaat | | म<br>Ma<br>Mug |
| | | | | | | | | |
| य<br>Ya<br>Yes | | र<br>Ra<br>Run | | ल<br>La<br>Luck | | व<br>Va/Wa<br>Van | | श<br>Sha<br>Shut |
| ष<br>Shha<br>Fashion | | स<br>Sa<br>Some | | ह<br>Ha<br>Hut | | ळ<br>yLa<br>Baal | | क्ष<br>Ksha<br>Rikshaw |
| | | | | | | | | |
| ज्ञ<br>Dnya<br>Dnyan | | | | | | | | |

## परिशिष्ट – आकडे

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ११ | २१ | ३१ | ४१ | ५१ | ६१ | ७१ | ८१ | ९१ |
| २ | १२ | २२ | ३२ | ४२ | ५२ | ६२ | ७२ | ८२ | ९२ |
| ३ | १३ | २३ | ३३ | ४३ | ५३ | ६३ | ७३ | ८३ | ९३ |
| ४ | १४ | २४ | ३४ | ४४ | ५४ | ६४ | ७४ | ८४ | ९४ |
| ५ | १५ | २५ | ३५ | ४५ | ५५ | ६५ | ७५ | ८५ | ९५ |
| ६ | १६ | २६ | ३६ | ४६ | ५६ | ६६ | ७६ | ८६ | ९६ |
| ७ | १७ | २७ | ३७ | ४७ | ५७ | ६७ | ७७ | ८७ | ९७ |
| ८ | १८ | २८ | ३८ | ४८ | ५८ | ६८ | ७८ | ८८ | ९८ |
| ९ | १९ | २९ | ३९ | ४९ | ५९ | ६९ | ७९ | ८९ | ९९ |
| १० | २० | ३० | ४० | ५० | ६० | ७० | ८० | ९० | १०० |

| | |
|---|---|
| १ | एक |
| २ | दोन |
| ३ | तीन |
| ४ | चार |
| ५ | पाच |
| ६ | सहा |
| ७ | सात |
| ८ | आठ |
| ९ | नऊ |
| १० | दहा |
| ११ | अकरा |
| १२ | बारा |
| १३ | तेरा |
| १४ | चौदा |
| १५ | पंधरा |
| १६ | सोळा |
| १७ | सतरा |
| १८ | अठरा |
| १९ | एकोणीस |
| २० | वीस |
| २१ | एकवीस |
| २२ | बावीस |
| २३ | तेवीस |
| २४ | चोवीस |
| २५ | पंचवीस |


| | |
|---|---|
| २६ | सव्वीस |
| २७ | सत्तावीस |
| २८ | अठ्ठावीस |
| २९ | एकोणतीस |
| ३० | तीस |
| ३१ | एकतीस |
| ३२ | बत्तीस |
| ३३ | तेहेतीस |
| ३४ | चौतीस |
| ३५ | पस्तीस |
| ३६ | छत्तीस |
| ३७ | सदतीस |
| ३८ | अडतीस |
| ३९ | एकोणचाळीस |
| ४० | चाळीस |
| ४१ | एकेचाळीस |
| ४२ | बेचाळीस |
| ४३ | त्रेचाळीस |
| ४४ | चव्वेचाळीस |
| ४५ | पंचेचाळीस |
| ४६ | सेहेचाळीस |
| ४७ | सत्तेचाळीस |
| ४८ | अठ्ठेचाळीस |
| ४९ | एकोणपन्नास |
| ५० | पन्नास |

| | |
|---|---|
| ५१ | एकावन्न |
| ५२ | बावन्न |
| ५३ | त्रेपन्न |
| ५४ | चौपन्न |
| ५५ | पंचावन्न |
| ५६ | छप्पन्न |
| ५७ | सत्तावन्न |
| ५८ | अठ्ठावन्न |
| ५९ | एकोणसाठ |
| ६० | साठ |
| ६१ | एकसष्ट |
| ६२ | बासष्ट |
| ६३ | त्रेसष्ट |
| ६४ | चौसष्ट |
| ६५ | पासष्ट |
| ६६ | सहासष्ट |
| ६७ | सदुसष्ट |
| ६८ | अडुसष्ट |
| ६९ | एकोणसत्तर |
| ७० | सत्तर |
| ७१ | एकाहत्तर |
| ७२ | बाहत्तर |
| ७३ | त्र्याहत्तर |
| ७४ | चौऱ्याहत्तर |
| ७५ | पंचाहत्तर |

| | |
|---|---|
| ७६ | शाहत्तर |
| ७७ | सत्त्याहत्तर |
| ७८ | अठ्ठ्याहत्तर |
| ७९ | एकोणऐंशी |
| ८० | ऐंशी |
| ८१ | एक्याऐंशी |
| ८२ | ब्याऐंशी |
| ८३ | त्र्याऐंशी |
| ८४ | चौऱ्याऐंशी |
| ८५ | पंचाऐंशी |
| ८६ | शहाऐंशी |
| ८७ | सत्त्याऐंशी |
| ८८ | अठ्ठ्याऐंशी |
| ८९ | एकोणनव्वद |
| ९० | नव्वद |
| ९१ | एक्याण्णव |
| ९२ | ब्याण्णव |
| ९३ | त्र्याण्णव |
| ९४ | चौऱ्याण्णव |
| ९५ | पंचाण्णव |
| ९६ | शहाण्णव |
| ९७ | सत्त्याण्णव |
| ९८ | अठ्ठ्याण्णव |
| ९९ | नव्याण्णव |
| १०० | शंभर |

| | |
|---|---|
| २०० | दोनशे |
| ३०० | तीनशे |
| ४०० | चारशे |
| ५०० | पाचशे |
| ६०० | सहाशे |
| ७०० | सातशे |
| ८०० | आठशे |
| ९०० | नऊशे |
| १००० | हजार |
| १०,००० | दहा हजार |
| १००,००० | लाख |
| १०,००,००० | दहा लाख |

# नियमित व्यायाम

| | |
|---|---|
|  | **सर्वांगासन करण्याची पद्धत:**<br>१. जमिनीवर पाठीवर सरळ झोपा..<br>२. दोन्ही हात शरीराला मागून समांतर ठेवा.<br>३. हळूहळू पाय वर करा.<br>४. दोन्ही हातांनी कमरेला आधार द्या, ही कृती करतांना दोन्ही हाताचे कोपरे जमिनीवर टेकले पाहिजे.<br>५.पाठीचा कणा आणि पाय दोन्ही सरळ एका रेषेत ठेवा. खांदे आणि मान जमिनीवर टेकलेली असू द्या.<br>६. हळूहळू श्वासोश्वास चालू ठेवा.<br>७. काही सेकंदात ह्या स्थितीत राहिल्यावर हळूहळू पाय खाली आणून पाठ जमिनीला टेकवा.<br>**सर्वांगासन करण्याचे फायदे:**<br>१. या आसनामुळे थॉयरॉईड ग्रंथीला चांगला व्यायाम मिळतो त्यामुळे रक्ताभिसरण,श्वसनक्रिया, पाचनक्रिया, उत्सर्गक्रिया आणि नाडीतंत्र कार्यक्षम राहते.<br>२. या आसनात खाली डोके वर पाय असल्यामुळे मेंदूला भरपूर प्रमाणात रक्त पुरवठा होतो.<br>३. पाठीचा मणका मजबूत बनतो. |
|  | **वीरभद्रासन ३ करण्याची पद्धत:**<br>१. पर्वतासनाची स्थिती घ्या.<br>२. श्वास घेत उजवा पाय पुढे घ्यावा जेणेकरून उजवा पाय दोन्ही हातांच्या मध्ये येईल.<br>३. आता उजव्या पायावर वजन टाकून डावा पाय वर उचलावा.<br>४. दोन्ही हात वर उचलावे.<br>५. दोन्ही हात आणि डावा पाय जमिनीला समांतर ठेवावे.<br>६. दृष्टी जमिनीवर स्थिर ठेवावी.<br>७. श्वास घेऊन ६-८ सेकंद स्थिर ठेवावे.<br>८. श्वास सोडत डावा पाय आणि हात खाली टेकवून पूर्वस्थितीत या<br>दुसऱ्या बाजूने असं करा.<br>**वीरभद्रासन ३ करण्याचे फायदे:**<br>१. पाय आणि गुढघ्यामध्ये बळकटी येते.<br>२. मांडीचे स्नायू लवचिक होतात.<br>३. शरीराचे संतुलन सुधारते. |

| | |
|---|---|
|  | **चक्रासन करण्याची पद्धत:**<br>१. जमिनीवर पाठीवर सरळ झोपा.<br>२. पाय दुमडून नितंबाजवळ आणा जेणेकरून हाताची बोटे टाचेला स्पर्श करतील.<br>३. दोन्ही हात वर करा आणि दोन्ही कोपर एकाच वेळी वाकवा.<br>४. खांद्याच्या वर, हाताचे तळवे जमिनीवर ठेवा.<br>५. दीर्घ श्वास घ्या आणि हळूहळू तुमच्या शरीराचा मध्यभाग उंच करा.<br>६. श्वास रोखून ८-१० सेकंद या स्थितीत राहा.<br>७. हळूहळू श्वास सोडत कंबर जमिनीला टेकवून पाय सरळ करा<br>**चक्रासन करण्याचे फायदे:**<br>१. पाठीचा कणा लवचिक बनवण्यास मदत होते.<br>२, पोटाची चरबी कमी होते.<br>३. पाय आणि हाताचे स्नायू बळकट होतात.. |

| | |
|---|---|
|  | **नटराजासन करण्याची पद्धत:**<br>१. ताडासनात सरळ ताठ उभे रहा.<br>२. हळूहळू श्वास घेत, शरीराचे वजन सावकाश डाव्या पायावर तोलत उजवा पाय गुडघ्यामध्ये अशा पद्धतीने दुमडावा की, उजव्या पायाची टाच नितंबाच्या दिशेला असेल.<br>३. आता उजव्या हाताने उजव्या पायाचा घोटा पकडावा आणि पाय नितंबापासून दूर न्यावा, ज्यामुळे नितंबाचा भाग वर उचलला जाईल.<br>४. डावा हात खांद्याच्या समोरील दिशेत सरळ ठेवा.<br>५. दृष्टी समोर स्थिर ठेवा,<br>६. श्वासोश्वास चालू ठेवत ८-१० सेकंद या स्थितीत रहा.<br>७. याच पद्धतीने डावा पायही मागील बाजूने वर उचलत आसन पूर्ण करावे.<br>८.आसन सोडताना सावकाश खांद्यासमोरील हात मांडीच्या बाजूला घ्यावा. वरच्या दिशेला घेतलेला पाय नितंबाच्या मागे घेत खाली जमिनीवर सरळ ठेवावा.<br><br>**नटराजासन करण्याचे फायदे:**<br><br>१. पाय, मांड्या, घोटे, गुडघे, खांदे यांचा व्यायाम होऊन स्नायूंना बळकटी मिळते.<br>२. मेरुदंडाचा लवचिकपणा वाढतो.<br>३. पायातील रक्तवाहिन्यांचे कार्य सुधारते.<br>४. शरीर व मनाची एकाग्रता होऊन मानसिक स्वास्थ्य लाभते. |

| | |
|---|---|
|  | **कुर्मासन करण्याची पद्धत:**<br>१. दंडासनात सरळ ताठ बसा.<br>२. दोन्ही पाय शक्य तितके पसरवा, म्हणजेच त्यांना एकमेकांपासून दूर ठेवा.<br>३. दोन्ही पाय गुडघ्यावर थोडेसे वाकवा आणि पायाची टाच जमिनीवर ठेवा.<br>४. श्वास सोडत कमरेपासून पुढे वाकत दोन्ही हात गुडघे आणि जमिनीच्या फटीतून बाहेत काढा.<br>५. आपले खांदे आणि हनुवटी जमिनीला लागेपर्यंत समोर वाकत राहा सोबतच आपले दोन्ही हात सरळ बाहेर लांबवत राहा.<br>६. दोन्ही पाय शक्य तितके सरळ करण्याचा प्रयत्न करा.<br>७. श्वासोश्वासावर लक्ष केंद्रित करून थोडा वेळ या आसनात रहा.<br>८. पूर्व स्थितीत येण्यासाठी, तुमचे दोन्ही हात गुडघ्यातून बाहेर काढा आणि सरळ करा.<br>**कुर्मासन करण्याचे फायदे १. मांड्यांच्या आणि पाठीच्या स्नायूत लवचिकता येते.**<br>२. पोटावर ताण पडल्यामुळे पोटातील सर्व इंद्रियांना व्यायाम मिळतो.<br>३. पोटाची चरबी कमी होते. |
|  | **काकासन करण्याची पद्धत:**<br>१. ताडासनात ताठ सरळ उभे राहावे.<br>२. पाय वाकवून हाताचे पंजे पुढे जमिनीवर ठेवावेत, हाताची सगळी बोटे पसरावी.<br>३. आता कोपर वाकवून गुडघे दंडांवर ठेवा.<br>४. संतुलन साधण्यासाठी डोके थोडे पुढे नेत हळू हळू आपले पाय जमिनीवरून उचला.<br>५. शरीराचे वजन हळूहळू हातावर आणा. हाताच्या पंजावर शरीराचा भार तोलून धरा.<br>६. काही सेकंद या आसनात राहा.<br>**काकासन करण्याचे फायदे:**<br>१. मनगट आणि हाताचे स्नायू बळकट होतात.<br>२. शरीराचे संतुलन आणि मनाची एकाग्रता सुधारते.<br>३. पोटाचे स्नायू मजबूत होतात आणि पचनक्रिया सुधारते. |

| | |
|---|---|
|  | **एक पाद कपोतासन करण्याची पद्धत:**<br>१. मार्जारासनात दोन्ही हात आणि गुढघ्यांवर स्थिर करा<br>२. श्वास घेत उजवा पाय सरळ मागे घ्या<br>३. श्वास सोडत उजवा पाय दुमडून पुढे जमिनीवर आणा जेणेकरून उजवा गुडघा उजव्या मनगटापाशी आणि उजवा घोट डाव्या मनगटापाशी येईल.<br>४ दोन्ही मांड्या जमिनीवर टेकण्याचा प्रयत्न करा.<br>५ श्वास घेऊन हात बाजूला जमिनीवर दाबून पाठ ताठ करत समोर बघा.<br>६. थोडा वेळ या स्थितीत राहून श्वास सोडत उजवा पाय मागे घेऊन मार्जारासनात पूर्व स्थितीत या.<br>७. आता दुसऱ्या बाजूने हे असं करा.<br>**एक पाद कपोतासन करण्याचे फायदे:**<br>१. पाठीचा कणा मजबूत होतो<br>२. मांड्यांच्या स्नायूंना लवचिकता येते<br>३. छातीचा विस्तार आणि रुंदीकरण होण्यास मदत होते |
|  | **धनुरासन करण्याची पद्धत:**<br>१. जमिनीवर पोटावर पालथे झोपा .<br>२. दोन्ही हात शरीराला मागून समांतर ठेवा.<br>३. दोन्ही पाय गुढग्यापासून दुमडून घ्या<br>४. उजव्या हाताने उजव्या पायाचा घोटा पकडा आणि डाव्या हाताने डाव्या पायाचा घोटा पकडा.<br>५. छाती, डोके आणि पाय वर उचला जेणेकरून फक्त पोटाचा भाग जमिनीला टेकेल.<br>६. या स्थितीत आल्यावर श्वास काही सेकंद रोखून ठेवा आणि हळूहळू बाहेर सोडा<br>७. हळूहळू छाती आणि गुडघे जमिनीवर टेकवा आणि पूर्वस्थितीत या.<br>**धनुरासन करण्याचे फायदे:**<br>१. पाठीचा कणा लवचिक बनवण्यास मदत होते.<br>२, शरीराची अतिरिक्त चरबी कमी होते.<br>३. पचनशक्ती सुधारते..<br>४. बद्धकोष्ठता आणि जठराचे आजार दूर व्हायला मदत होते. |

# १ आकडेमोड

नवीन शब्द

आकडेमोड - बेरीज, वजाबाकी , गणित

अवशेष -

खगोलशास्त्रज्ञ

दररोज -

जवळपास

कोणत्याही पाच शब्दांचे वाक्यात उपयोग करा.

## २. मोठ्या संख्या

अंकात लिहा:

एक लाख दोनशे त्रेसष्ट - ____________________

बारा हजार पाचशे अडुसष्ट - ____________________

नऊ हजार पाचशे अठ्याण्णव - ____________________

एका गावात सर्कस आली होती. खेळ बघायला रोज १५० लोक असायचे. शनिवार त्यात ६०% वाढ होत असे आणि रविवारी ९०%. तर शनिवार आणि रविवारी किती लोक खेळ बघायला जायचे?

आमला गावात ह्या वर्षी मतदान करायला खूप लोक आले होते. केंद्राबाहेर मोठ्या रांगा होत्या. त्यात स्त्रियांची संख्या पुरुषांपेक्षा ४०% जास्त होती. पुरुषांचे मतदान एकूण १०२०० होते तर किती स्त्रियांनी मतदान केले?

## ३-वाक्प्रचार


तुम्हाला माहिती असलेले अवयवांवर आधारित वाक्प्रचार लिहा.

उदा: कान फुंकणे

## ४- पाऊस

## ५- प्रदूषण

चित्र बघून ते कोणत्या प्रकाराचे प्रदूषण आहे ते लिहा.



————————————



————————————



—-------------------

## ६ - प्रदूषण निवारण

प्रदूषण निवारणासाठी तुमच्या घरात तुम्ही करत असलेले प्रयत्न ( ८-१० वाक्यात लिहा.)

## ७ - श्रावण मासी हर्ष मानसी

कवीला जसा भारतात श्रावण दिसतो तसा तुम्ही पहिलेला अमेरिकेतील ऋतु तुमच्या शब्दात लिहा.

# ८. सुपरमॅन राहुल

**“मला पंख असते तर “ या विषयावर तुमचे विचार १० वाक्यात लिहा.**

## ९. मराठी महिने

मराठी महिने लिहा. प्रत्येक महिन्यासाठी एक एक वाक्य लिहा.-

## १०. मंगल देशा

नवीन शब्द: (वाक्यात उपयोग करा.)

राकट, कणखर, ध्येय, ललाट

स्वाध्याय:

१. महाराष्ट्र देशासाठी कोणकोणती विशेषणे वापरली आहेत ?

२. वरील कवितेत कोणकोणत्या नद्या आणि पर्वताचे वर्णन आहे ? त्यांना नकाशात शोधा.

३. वरील कवितेत कोणकोणत्या फुलांचे वर्णन आहे ? त्यांची चित्रे गोळा करा.११

## ११.- जैसलमेर -सोनेरी वाळवंटाचे गाव

स्वाध्याय:

१. खालील प्रश्न सोडवा:

अ) तुमच्या आवडत्या प्रवासाचे वर्णन वर्गात तुमच्या मित्र-मैत्रिणींना सांगा.

आ) प्रवासात काय विसरलात व कशी फजिती झाली ते ५-१० वाक्यात लिहा.

## १२. - आजारपणातील मौज - (लघुनिबंध)

# निबंध- माझी मराठी शाळा

# निबंध-मी कोण होणार

# निबंध- माझा आवडता विषय

## १३.सायंकाळची शोभा

कवितेतील यमक जुळणारी शब्दांची जोडी लिहा -

उदा. चौफेर - दूर

खालील शब्द वापरून २ ओळींच्या कविता लिहा;
आई , बाबा, घड्याळ , सुट्टी

## १४. खजिना

आजी आजोबांना तुम्ही येणार असल्याचे पत्र लिहा.

तुमच्या शिक्षकांना तुम्ही कार्यक्रमाला येणार नसल्याचे कळवा

## १५. सारांश लेखन

फुले कोणाला आवडत नाहीत ? ती सर्वांनाच आवडतात. कोणाला ती पूजेसाठी हवी असतात. कोणाला ती हारतुरे, गजरे किंवा वेणीसाठी हवी असतात. पण "फुलांसाठी फुले " या भावनेने त्यांच्याकडे कोणी पाहत नाही.

फुले शक्यतो वेलीवर किंवा फुलझाडांवर राहू द्यावीत. ती गळून पडली तर गोळा करावीत. पारिजातकाचा सडा आपण सतत पाहतच असतो. वेलीवरची फुले कोमेजण्याची वेळ जाणून घेतली व त्यापूर्वी काही तास ती तोडली तर फुलांच्या दृष्टीने ते न्यायाचे होईल. फुलांचा विचार असा भावनात्मक पातळीवरून करू नये, असे अनेकांना वाटेल; पण फुलांची कोमलता भावनांना स्पर्श करणारी असते. फुले म्हणजे निसर्गाचे भावकाव्यच जणू!

अशी ही फुले तशी कोणाचीच नसतात आणि तरीही ती सर्वाची असतात. रंग, रूप, गंध याची अखं उधळण करून आपले जीवन रसपूर्ण, अर्थपूर्ण, भावपूर्ण करण्याचे काम ती मूकपणे करीत राहतात. या फुलांचे उतराई कसे व्हावे ? जड वस्तूची पूजा फुलांनी करण्याऐवजी फुलांची पूजा भावनांनी केली तर ? ती अधिक फुलतील आणि जगाचे नंदनवन करतील. गावागावांत फुलांसाठी मंदिरे असावीत. घराघरात केवळ फुलांसाठी स्वतंत्र चौरंग असावा.

## १६.वृत्तपत्र बातमी

एखाद्या सांस्कृतिक कार्यक्रमावर आधारित बातमी लिहा.

मराठी मंडळाचा गणपती उत्सव बातमी लिहा.

**१७.-मपेलचे झाड**

**प्र. १ झाडांच्या अवयवांची नावे लिहा**

प्र. २ झाडांपासून आणखी काय मिळते?

## १८-झुळुक मी व्हावे

मी पाहिलेले निसर्गरम्य स्थळ

## २५. भारत - प्रांत आणि भाषा

भारताची राजधानी - दिल्ली ( Capital of India)
महाराष्ट्राची राजधानी- मुंबई ( Capital of Maharashtra)
भारताचा राष्ट्रीय पक्षी - मोर ( National bird)
भारताचा राष्ट्रीय प्राणी -वाघ (National Animal)
भारताचे राष्ट्रगीत - जन गण मन ( National Anthem)
भारताची राष्ट्रभाषा - हिंदी ( National Language)
भारताचे राष्ट्रीय फूल - कमळ ( National Flower)
भारताचा राष्ट्रीय वेष - स्त्री - साडी , पुरुष - धोती कुर्ता टोपी ( National Dress)
मराठीची लिपी - देवनागरी
भारताचे राष्ट्रीय फळ - आंबा

## शाहिस्तेखानाला धडा शिकवला

## (महाराष्ट्राच्या इतिहासातील शिवाजी महाराजांची एक गोष्ट )

शिवाजी महाराज पन्हाळगडाच्या वेढ्यात अडकले असताना, मुघल बादशहा, औरंगजेबाने शाहिस्तेखानाला स्वराज्यावर आक्रमण करण्यास पाठविले. शाहिस्तेखान हा औरंगजेबाचा मामा होता. तब्बल एक लाख सैन्य आणि तोफखाना बरोबर घेऊन शाहिस्तेखान स्वराज्यावर चालून आला. १९६० च्या मेमहिन्यात शाहिस्तेखान आपल्या सैन्यासह पुण्यात पोहोचला आणि त्याने लाल महालावर ताबा मिळवला.

शिवाजी महाराजांच्या जन्मानंतर जिजाबाईंनी हा लाल महाल पुण्यात बांधून घेतला होता. लाल महालात महाराजांचे बालपण गेले होते. ज्या वेळी शाहिस्तेखान लाल महालात तळ ठोकून होता त्यावेळी महाराज पन्हाळगडावर अडकले होते आणि जिजाबाई राजगडावर होत्या. जवळजवळ तीन वर्ष शाहिस्तेखान लाल महालात मुक्काम करून होता. त्याची फौज पुणे प्रांतातील प्रजेला खूप छळत होती आणि लूटमार करत होती. प्रजेचे होणारे हाल पाहून महाराज अस्वस्थ झाले होते. खानाला धडा शिकवण्यासाठी त्यांनी एक धाडसी बेत आखला - स्वतःच लाल महालात घुसण्याचा.

महाराजांचे बालपण लाल महालात गेलेले असल्यामुळे त्यांना त्या जागेची खडानखडा माहिती होती. तरीही आपले हेर पाठवून महाराजांनी खानाची लालमहालातली दिनचर्या जाणून घेतली आणि मगच आपला बेत पक्का केला.

५ एप्रिल १६६३ च्या रात्री, जेव्हा शाहिस्ते खान आणि त्याचा परिवार गाढ झोपेत होते तेव्हा, एका लग्नाच्या वरातीतले वराती बनून आलेले महाराज आणि त्याचे २०० सहकारी दबक्या पावलांनी लाल महालात घुसले. अंधारातून चालत असलेल्या मावळ्यांची चाहूल खानाच्या माणसांना लागली आणि एकच गडबड उडाली. सर्वजण जागे झाले आणि सगळीकडे पळापळ सुरु झाली. जो तो आपला जीव वाचवण्यासाठी इकडे तिकडे पळू लागला. त्या हल्ल्यात खानाची काही माणसे कापली गेली, तर काही निसटली. स्वतः खानापर्यंत बातमी पोहोचली की शिवाजी त्याच्या मावळ्यांसह महालात घुसला आहे आणि तो खानाला शोधतो आहे. जीव वाचवण्यासाठी खानाने पळून जाण्याचा प्रयत्न केला. पण महाराजांनी त्याला गाठून त्याच्यावर तलवारीचा वार केला. त्याचवेळी खानाने जिवाच्या आकांताने खिडकीतून बाहेर उडी मारली. तलवारीचा घाव त्याच्या बोटांवर बसला आणि त्याची तीन बोटे तुटून पडली. त्यानंतर महाराज आणि त्यांचे सहकारी 'दगा... दगा... गनीम कुठे गेला...' असे ओरडत गर्दीत मिसळून गेले आणि जसे आले होते तसेच गुप्तपणे महालाबाहेर पडले.

तीन बोटे तुटून पडली. त्यानंतर महाराज आणि त्यांचे सहकारी 'दगा... दगा... गनीम कुठे गेला...' असे ओरडत गर्दीत मिसळून गेले आणि जसे आले होते तसेच गुप्तपणे महालाबाहेर पडले.

घडलेल्या घटनेचा शाहिस्तेखानाने एवढा धसका घेतला की त्यानंतर काही दिवसातच तो पुणे सोडून औरंगाबादला निघून गेला. या घटनेची बातमी दिल्लीत पोहोचली आणि मुघल सरदारांच्या मनात राजांबद्दल दहशत निर्माण झाली. आपल्या मामाच्या दुर्दशेची बातमी ऐकून औरंगजेब मनातल्या मनात तडफ़डला. संतापून त्याने शाहिस्तेखानाची बदली बंगाल सुभ्यावर केली. शक्तीपेक्षा युक्ती श्रेष्ठ हे महाराजांनी पुन्हा एकदा सिद्ध केले.

कथा - सौ. कादंबिनी धारप



P

१. मुघल बादशहाचे नाव सांगा. ______________________________

२. मुघल बादशहाने स्वराज्यावर आक्रमण करण्यासाठी कोणाला पाठवले?

______________________________

______________________________

३. खान पुण्यात कधी पोहोचला व त्याने कुठे मुक्काम केला?

______________________________

६. खान लाल महालात किती काळ राहिला?

७. - --- ---- रोजी महाराज लाल महालात घुसले.

८. लाल महालात घुसण्यासाठी महाराज व त्यांच्या सहकाऱ्यांनी कुठले सोंग घेतले?

९. महाराजांनी खानाला धडा कसा शिकवला?

१०. संतापलेल्या औरंगजेबाने शाहिस्तेखानाला काय शिक्षा दिली?

BMM

बृहन्महाराष्ट्र मंडळ

2.0

BMM
मराठी
शाळा